मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

» मुंबई कार्यालय
बोरा बजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
फोन : ०२२ ३१८५ ०७३५

» पालघर कार्यालय
२०८/बी, लोकमान्य बिल्डींग, तालुका पंचायत समिती कार्यालयासमोर, पालघर, ४०१४०४ मो. ९८९२९६८७२५

» नाशिक कार्यालय
'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२. मो. ९८९०१०९९७८

» वितरण
मो. नं. ८४२४९३६४३६

नाशिक » शुक्रवार, १८ एप्रिल २०२५ » वर्ष: ६ » अंक:१२० » पाने-८ » किंमत रू. २ + वितरण खर्च रू. १ एकूण रू.३

## स्वारगेट बलात्कार प्रकरणात आरोपपत्र

**पुणे, दि. १७ प्रतिनिधी**
पुण्यात खळबळ उडवून देणाऱ्या स्वारगेट बलात्कार प्रकरणात गुन्हे शाखेकडून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले आहे. हे दोषारोपपत्र ८९३ पानांचे आहे. या प्रकरणात पोलिसांच्या ताब्यात असलेला आरोपी दत्तात्रय गाडे याच्या विरुद्ध शिवाजनगर येथील सत्र न्यायालयात हे दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. गुन्हे शाखेच्या खंडणी विरोधी पथकाने ५२ दिवसात हा तपास पूर्ण केला आहे. या प्रकरणात एकूण ८२ साक्षीदार तपासले. त्यातील पाच साक्षीदारांचे कोर्टासमोर जबाब नोंदविण्यात आले आहेत. तसेत १२ पंचनामे करण्यात आले आहेत. गुगल सर्च हिस्ट्री पंचनामा, ध्वनीचा तुलनात्मक तीव्रता पंचनामा करण्यात आला आहे. या घटनेदरम्यान तरुणी ओरडली का नाही असा सवाल उपस्थित करण्यात आला होता. मात्र ती मोठ्याने ओरडली होती. परंतु गाडीच्या काचामुळे तिचा आवाज बाहेर आला नसल्याचे पुढे आले आहे. गाडे हा सराईत गुन्हेगार असून, त्याच्या विरुद्ध सात गुन्हे दाखल आहेत.

अग्राग्रलेख
**खरीखरी**

## न्यायाधीश रोखठोक खन्ना

सर्वोच्च न्यायालय कालपासून वक्फ विधेयकांच्या मुद्द्यांवर वेगवेगळ्या प्रकारे विचार करण्याच्या मनस्थितीत आहे. सर्वोच्च न्यायालयाचे खन्ना साहेब यांनी संविधानाच्या कलमान्वये हे विधेयक मंजूर झालेले नाही, असे स्पष्टपणे नमूद केलेले आहे. लोकशाहीत जनता सर्वोपरी म्हणजेच सर्व काही असते. जनतेने नेमलेले सरकार जनतेलाही बांधील असते आणि संसद हीच या देशाची सर्वोच्च अधिकार शक्ती असलेली संवैधानिक सत्ता आहे. संसदेत हे विधेयक मंजूर केल्यावर त्यावर राष्ट्रपतींची सही झाल्याबरोबर कायद्याचे रूप धारण करते. संसदेने नुकत्याच मंजूर केलेल्या वक्फ विधेयकाविरोधात अनेक मुस्लिम संघटनांनी याचिका दाखल केलेल्या आहेत. सरकारतर्फे सॉलिसिटर जनरल मेहता कालपासून बचावाच्या भूमिकेत दिसले. मग विरोधी पक्षांच्या वकिलांची आणि त्यांच्या भूमिकेची गोष्ट तर सोडाच. खुद्द सरन्यायाधीशच आक्रमक दिसले. आता आज जवळजवळ शंभर याचिका आता सर्वोच्च न्यायालयात युक्तीवादासाठी दाखल झालेल्या आहेत. वक्फ कायद्यात बिगर मुस्लिमांचा समावेश, जुन्या झालेल्या मालमत्तेची नोंदणी तसेच दीर्घ काळापासून धार्मिक किंवा धर्मादाय हेतूसाठी वापरल्या जाणाऱ्या मालमत्ता यावरही चर्चा झाली. अनेक अतिशय जुन्या मालमत्तेसाठी अधिकृत कागदपत्रे नसतात. कारण दीड -200 ते 300 वर्षांपूर्वी नोंदणी वगैरे होत नव्हती. अशा प्रकारे आता सर्वोच्च न्यायालयाने एका कलमाच्या आधारे त्यात असलेल्या अधिकाराचा वापर करून, या विधेयकाने संमत केलेल्या अनेक बाबींवर सध्या तरी तात्पुरता स्थगन आदेश दिलेला आहे. याचा सरळ अर्थ असा आहे की, संसदेने पारित केलेल्या विधेयकावरील अनेक तरतुदी लागू करता येणे अजिबात शक्य नाही. कारण सर्वोच्च न्यायालयाने परिस्थिती 'जैसे थे' ठेवण्याचा आदेश दिलेला आहे. आज माननीय सर्वोच्च न्यायालयाला सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी सरकारतर्फे उत्तरे देण्यासाठी सात दिवसांचा कालावधी किंवा वेळ मागितलेला आहे. तो त्या बेंचने मान्य केला. त्यानंतर पाच दिवस याचिकाकर्त्यांना उत्तर देण्यासाठी दिलेले आहेत. म्हणजे उत्तर येईपर्यंत एप्रिल महिना निघून जाईल. न्यायालयाने पुढील सुनावणी पाच मे रोजी ठेवलेली आहे. त्यातच पुढील सात दिवसात सरन्यायाधीशांचा कार्यकाळ संपणार आहे. म्हणजे पाच मे ते बारा मे या कालावधीत सरन्यायाधीशांचे बेंच जे जे आदेश देईल. ते अंतिम निकालापर्यंत कायमच राहतील. या विधेयकातील तरतुदी लागू करण्यास किती काळ लागेल. हे कोणालाच ठाऊक नाही. संसदेने पारित केलेल्या एका विधेयकाची आज तरी संविधानाचा आधार घेऊन सर्वोच्च न्यायालयाने बरीच काटछाट केलेली दिसते. आता जर आपले जुने न्यायाधीश चंद्रचूड असते. तर त्यांनी कोणता निर्णय दिला असता किंवा निर्णय दिला नसता. हे त्यांचे त्यांना ठाऊक असेल. पण सध्याचे सरन्यायाधीश मा. न्या. खन्ना यांनी राज्यपाल आणि राष्ट्रपती यांनाही हे विधेयक कायदा मंजुरी म्हणून रूपांतरित होण्यासाठी विशिष्ट अवधी देण्याचे आदेश दिलेले आहेत. आता बारा मे पर्यंत या विधेयकातील कोणत्या कलमांचे बारा वाजतात. त्याची प्रतीक्षा संपूर्ण भारत देशाला आहे. जय हिंद!

nagpurpost@gmail.com
Mob.No.9922970023

# पहिलीपासून हिंदीच्या सक्तीवरून राज ठाकरे आक्रमक

**मुंबई, दि. १७ प्रतिनिधी**
केंद्र सरकारच्या नव्या त्रिभाषा सूत्रानुसार महाराष्ट्रात इयत्ता पहिलीपासून हिंदी भाषा अनिवार्य करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयाविरोधात तीव्र प्रतिक्रिया उमटत असून, आता मनसेप्रमुख राज ठाकरे यांनीही पहिलीपासून मराठी भाषेच्या सक्तीविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. राज्य शालेय अभ्यासक्रम आराखडा २०२४ नुसार महाराष्ट्रात पहिलीपासूनच हिंदी ही भाषा अनिवार्य करण्यात आली आहे. मी स्वच्छ शब्दांत सांगतो की ही सक्ती महाराष्ट्र नवनिर्माण सेना खपवून घेणार नाही, असा इशारा राज ठाकरे यांनी दिला आहे. आज भाषा सक्ती करत आहेत, उद्या इतर सक्तीचे फतवे काढतील. म्हातारी मेल्याचे दुःख नाही पण काळ सोकावतो, अशा शब्दात या निर्णयाविरोधात शंका उपस्थित केली आहे.

या संदर्भात सोशल मीडियावर शेअर केलेल्या पोस्टमध्ये राज ठाकरे म्हणाले की, राज्य शालेय अभ्यासक्रम आराखडा २०२४ नुसार महाराष्ट्रात पहिलीपासूनच हिंदी ही भाषा अनिवार्य करण्यात आली आहे. मी स्वच्छ शब्दांत सांगतो की ही सक्ती महाराष्ट्र नवनिर्माण सेना खपवून घेणार नाही. सरकारचे सध्या जे सर्वत्र 'हिंदीकरण' करण्याचे प्रयत्न सुरू आहेत, ते या राज्यात आम्ही यशस्वी होऊ देणार नाही. हिंदी ही काही राष्ट्रभाषा नाही. ती देशातील इतर भाषांसारखी एक राज्यभाषा आहे. ती महाराष्ट्रात का म्हणून पहिलीपासून शिकायची? तुमचं त्रिभाषेचं सूत्र जे काही आहे, ते सरकारी व्यवहारांपुरतंच मर्यादित ठेवा, त्याला शिक्षणापर्यंत आणू नका. या देशात भाषावार प्रांतरचना झाली, आणि ती इतकी वर्ष टिकली. पण आत्ताच ही दुसऱ्या प्रांताची भाषा इथे महाराष्ट्रावर लादण्याचे का प्रकार सुरु झालेत? भाषावार प्रांतरचनेच्या तत्वालाच



हरताळ फासला जात आहे, अशी टीका राज ठाकरे यांनी केली.

राज ठाकरे यांनी पुढे लिहिले की, आम्ही हिंदू आहोत पण हिंदी नाही आहोत ! महाराष्ट्रावर हिंदीकरणाचा मुलामा द्यायचा प्रयत्न कराल तर महाराष्ट्रात संघर्ष अटळ आहे. या सगळ्याकडे पाहिलं तर लक्षात येतं की सरकार हा संघर्ष मुद्दामून घडवत आहे. येणाऱ्या आगामी निवडणुकांमध्ये मराठी विरुद्ध मराठीतर असा संघर्ष घडवून स्वतःचा फायदा काढून घेण्यासाठी हा सगळा अट्टाहास सुरु आहे? या राज्यातील मराठीतर भाषिकांनी पण सरकारचा हा डाव समजून घ्यावा. त्यांना तुमच्या भाषेबद्दल विशेष प्रेम आहे असं काही नाही. त्यांना तुमची माथी भडकवून स्वतःची राजकीय पोळी भाजून घ्यायची आहे, अशी शंकाही राज ठाकरे यानी उपस्थित केली. आज राज्याची आर्थिक अवस्था बिकट आहे, सरकारकडे योजनांसाठी पैसाच शिल्लक नाही. मराठी तरुण-तरुणी नोकरीच्या प्रतीक्षेत आहेत. कर्जमाफी करू असं निवडणुकीच्या आधी सांगितलं, पण पुढे ती केलीच नाही. त्यामुळे कर्जमाफीच्या आशेवर असलेला शेतकरी निराश आहे. आणि उद्योग जगताने महाराष्ट्राकडे पाठ फिरवल्यासारखी परिस्थिती आहे. जेंव्हा सांगण्यासारखं किंवा ठोस दाखवण्यासारखं काहीच नसतं, तेंव्हा फोडा आणि राज्य करा हा ब्रिटिशांचा मंत्र इथे वापरला जातोय, अशी शंका यावी अशीच पाऊलं सरकारकडून उचलली जात आहेत, असा आरोपही राज ठाकरे यांनी केला.

बरं हिंदी भाषेची सक्ती महाराष्ट्रातच का? ही अशी हिंदीची सक्ती दक्षिणेच्या राज्यात कराल का? आणि करून तर बघा, तिथली सरकारंच पेटून उठतील. इथलं राज्यातील सरकार आणि त्यातील घटक पक्ष निमूटपणे हे सगळं खपवून घेतात म्हणून इथे ही सक्ती केली जात आहे. बाकीच्यांचं आम्हाला माहीत नाही आणि आम्हाला देणंघेणं पण नाही, पण महाराष्ट्र नवनिर्माण सेना हे खपवून घेणार नाही. महाराष्ट्रात पहिलीपासून हिंदी भाषा शिकण्याची सक्ती इथे खपवून घेतली जाणार नाही. शालेय अभ्यासक्रमातील हिंदीची पुस्तकं दुकानांमध्ये विकू दिली जाणार नाहीत आणि शाळांना देखील ती पुस्तकं विद्यार्थ्यांना वाटू दिली जाणार नाहीत, याची नोंद शाळा प्रशासनाने घ्यावी, असा इशारा राज ठाकरे यांनी दिला.

प्रत्येक राज्यात फक्त त्यांच्या राजभाषेचाच मान राखला गेला पाहीजे ! उद्या सर्व राज्यांमध्ये मराठी भाषा पहिली पासून शिकवाल का ? नाही ना ? मग ही जबरदस्ती इथेच का ? हा मुद्दा ताणू नये असं माझं सरकारला आवाहन आहे. पण या आवाहनाला आव्हान देणार असाल आणि हिंदी लादणार असाल तर मात्र संघर्ष अटळ आहे आणि ज्याला फक्त सरकारच जबाबदार राहील. त्यामुळे सरकारने लोकभावनेचा आदर करत हा निर्णय मागे तात्काळ घेण्याचे आदेश द्यावेत, असे आवाहन राज ठाकरे यांनी केले.

त्यांनी पुढे लिहिले की, माझ्या महाराष्ट्रातील तमाम मराठी मातांना, भगिनींना आणि बांधवांना तसेच माझ्या मराठी वर्तमानपत्रात आणि मराठी वृत्तवाहिन्यांमध्ये काम करणाऱ्या सर्व बांधवांना आणि भगिनींना देखील विनंती आहे की यात कोणताही वादविवाद न करता याचा निषेध आणि विरोध करावा ! आणि हो महाराष्ट्रातील इतर राजकीय पक्षांना जर थोडं जरी मराठी भाषेबद्दल प्रेम असेल तर ते देखील याला विरोध करतील.आज भाषा सक्ती करत आहेत, उद्या इतर सक्तीचे फतवे काढतील. म्हातारी मेल्याचे दुःख नाही पण काळ सोकावतो, अशी भीतीही राज ठाकरे यांनी या पोस्टच्या माध्यमातून व्यक्त केली आहे.

### हिंदी देखील शिकली पाहिजे - फडणवीस

**मुंबई, दि. १७ प्रतिनिधी**
महाराष्ट्रात इयत्ता पहिलीपासूनच हिंदी भाषा शिकण्याच्या अनिवार्यतेवर नुकतंच शिक्कामोर्तब करण्यात आलं आहे. 'राज्य शालेय अभ्यासक्रम आराखडा २०२४'नुसार, मराठी व इंग्रजी माध्यमांच्या शाळांमधील पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांना मराठी आणि इंग्रजीसह हिंदी ही तृतीय भाषा म्हणून शिकावी लागणार आहे. अन्य माध्यमांच्या शाळांमध्ये पहिली ते पाचवीसाठी माध्यम भाषा, मराठी आणि इंग्रजी अशा तीन भाषा असणार आहेत. येत्या जून महिन्यापासून नवं शैक्षणिक वर्ष सुरू होत असून या वर्षापासूनच नव्या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी केली जाणार आहे. मात्र, या नव्या शैक्षणिक धोरणाला विरोध होऊ लागला आहे.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेसह मराठी भाषेसाठी लढणाऱ्या संघटनांनी या शैक्षणिक धोरणावर आक्षेप घेतला आहे. दरम्यान, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या धोरणाचं समर्थन केलं आहे. फडणवीस म्हणाले, "महाराष्ट्रात मराठी भाषा ही प्रत्येकाला आली पाहिजे. त्याचप्रमाणे देशात एक संपर्कसूत्र तयार करण्यासाठी हिदी भाषेचा पर्याय आहे. संपर्कसुत्राची भाषा म्हणून लोकांनी हिदी भाषा शिकली पाहिजे."

देवेंद्र फडणवीस म्हणाले, "आपण यापूर्वीच नवीन शैक्षणिक धोरण लागू केलं आहे. त्यामुळे यात कुठलेही नवीन निर्णय घेतलेले नाहीत. महाराष्ट्रात प्रत्येकाला मराठी आलीच पाहिजे, हा आपला आग्रह आहे. तसेच देशात एक संपर्कसुत्र तयार करण्यासाठी हिंदी ही एक भाषा आहे जी संपर्कसुत्राची भाषा होऊ शकते. त्यामुळे हिंदी देखील लोकांनी शिकली पाहिजे, अशा प्रकारचा यात आमचा प्रयत्न आहे. लमुख्यमंत्री म्हणाले, "कोणाला इंग्रजी भाषा शिकायची असेल तर त्यांना इंग्रजी शिकता येईल. अन्य कुठल्या भाषा शिकायच्या असतील तर इतर भाषा शिकण्यापासून कोणलाही मनाई नाही. सर्वांना मराठी आली पाहिजे. तसेच आपल्या देशातील इतर भाषासुद्धा आल्या पाहिजेत. याबाबत केंद्र सरकारने विचार केला आहे. आपल्या देशात संपर्काची एक भाषा असावी असा केंद्र सरकारचा विचार आहे. त्यासाठी हा प्रयत्न केला आहे.

## मेट्रो मार्ग ७ अ मधील भुयारी बोगद्याचे ' ब्रेक थ्रू ' यशस्वीरित्या पूर्ण





**मुंबई, दि. १७ प्रतिनिधी**
मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत प्रस्तावित छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ (टी २) ते अंधेरी पूर्व या मेट्रो मार्ग ७ अ मधील १.६५ किलोमीटर लांबीच्या भुयारी बोगद्याचे ' ब्रेक थ्रू ' मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत यशस्वीरित्या पूर्ण करण्यात आले. यावेळी कौशल,रोजगार, उद्योजकता व नावीन्यता विभागाचे मंत्री मंगल प्रभात लोढा, आमदार पराग अळवणी, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे महानगर आयुक्त संजय मुखर्जी, अतिरिक्त महानगर आयुक्त अश्विन मुदगल आदी उपस्थित होते.


मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सुरुवातीला संबंधित अधिकाऱ्यांकडून प्रकल्पाविषयी माहिती जाणून घेतली. तसेच कळ दाबून 'ब्रेक थ्रू' कामाला सुरुवात केली. यानंतर या कामाची पाहणी केली. हा भुयारी बोगदा मेट्रो ७ अ वर डाऊनलाईन वर आहे. छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ स्टेशन ते एअरपोर्ट कॉलनी स्टेशन दरम्यान हा बोगदा असणार आहे. ही मेट्रो जोडणे मुंबई महानगर प्रदेशातील एकूण मेट्रो जाळ्यासाठी महत्त्वाचा टप्पा असणार आहे. या मेट्रो मार्गामुळे मुंबई महानगर क्षेत्रातील मीरा-भाईंदर व पुढे वसई - विरार हा भाग छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळासोबत मेट्रोने जोडले जातील. तसेच ठाणे व नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सुद्धा मेट्रो ने जोडण्यात येईल. या मेट्रो मार्गाचे ५९ टक्के काम पूर्ण झाले आहे. या मेट्रो मार्गाची लांबी ३.४ किलोमीटर असून त्यापैकी उन्नत मार्ग ०.९४ किलोमीटर आणि भूमिगत २.५० किलोमीटर आहे. या मार्गावर दोन स्थानके असणार आहेत. एक स्थानक उन्नत मार्गावर एअरपोर्ट कॉलनी तर दुसरे स्थानक भूमिगत छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ येथे असणार आहे. उन्नत मेट्रो मार्ग ०.५७ किलोमीटर असेल दुहेरी बोगद्याची लांबी २.०३५ किलोमीटर आहे. १ सप्टेंबर २०२३ रोजी डाउनलाईन बोगद्याचे पहिले ड्राईव्ह सुरू झाले. या बोगद्याची लांबी १.६५ किलोमीटर असून लाइनिंगसाठी ११८० रिंग्स बसविण्यात आल्या आहेत. बोगद्याचा व्यास ६.३५ मीटर एवढा असून सहा भागात विशेष डिझाईन असलेल्या प्रिकास्ट रिंग वापरण्यात आल्या आहेत.

सप्टेंबर २०२३ मध्ये टीबीएम मशीन जमिनीपासून ३० मीटर खाली भूगर्भात उतरवण्यात आली. मेट्रो मार्ग तीनच्या वरून, सहार उन्नत रस्त्यांच्या पायाखालून, मोठ्या सांडपाणी वाहिन्या व जलवाहिन्यांना क्रॉस करून विविध अडचणींवर मात करून या बोगद्याचा ब्रेक थ्रू पूर्ण करण्यात आला. या मेट्रो मार्गामुळे मुंबईकरांना कुलाबा ते वसई विरार, मीरा भाईंदर पर्यंत आरामदायी प्रवास अनुभवता येणार आहे. या मार्गामुळे मुंबई महानगर प्रदेशातील विविध मेट्रोमार्ग थेट विमानतळापर्यंत मेट्रोने जोडले जातील. मेट्रोमार्ग ३ (कुलाबा-वांद्रे-सीप्झ) च्या छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ या भूमिगत स्थानक मार्गासोबत सुलभ संलग्न करणे शक्य होईल. प्रवाशांसाठी सुरक्षित आरामदायी व सुलभ प्रवास शक्य होणार आहे. दाटीवाटीच्या नागरी परिसरातून मेट्रोसाठी उन्नत व भूमिगत मार्गाची रचना केल्यामुळे विमानतळ परिसरात मेट्रो बांधकामासाठी कमी जागा व्यापली जाणार आहे.

## खैरेंबद्दल विचारले अन् दानवे भडकले

**छ.संभाजीनगर, दि. १७ प्रतिनिधी**
छत्रपती संभाजीनगरातील उद्धव ठाकरे यांच्या शिवसेना पक्षात सर्वकाही आलबेल नसल्याचं बोललं जातं. माजी खासदार चंद्रकांत खैरे यांनी विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्यावर जाहीर नाराजी व्यक्त केली होती. हा वाद घेऊन खैरे थेट मातोश्रीपर्यंत गेले होते. दरम्यान, आता हा वाद मिटला असल्याचं खैरेंनीच स्पष्टीकरण दिलं होतं. तरीदेखील या दोन्ही नेत्यांमध्ये पूर्मपणे समेट घडून आली नसल्याचा दावा केला जातो. असे असतानाच आता अंबादास दानवे यांनी खैरेंबद्दल प्रश्न विचारताच संताप व्यक्त केलाय. त्यांनी आम्ही आमच्या पक्षाला पाहण्यास सक्षम आहोत. कृपया काड्या करणं बंद करावं, असं संतापून म्हटलंय. अंबादास दानवे यांनी छत्रपती संभाजीनगरात एक पत्रकार परिषद बोलावली होती. यावेळी चंद्रकांत खैरे या पत्रकार परिषदेसाठी का उपस्थित नाहीत, असा प्रश्न त्यांना विचारण्यात आला. यावर उत्तर देताना दानवे चांगलेच संतापले.

## धनंजय मुंडेंसाठी प्रार्थना करा नामदेव शास्त्री यांचे आवाहन



**बीड, दि. १७ प्रतिनिधी**
भगवान गडाचे महंत नामदेवशास्त्री यांनी पुन्हा एकदा माजी मंत्री धनंजय मुंडेंची पाठराखण केली आहे. धनंजय मुंडे यांच्यासाठी सर्वांनी मिळून प्रार्थना करा, असं महंत नामदेव शास्त्री यांनी म्हटलं आहे. धनंजय मुंडेंच्या गालावरून वारं गेलं आहे. चांगली वाणी बंद पडली आहे. पहिल्या पदावर येऊन धनंजय मुंडे यांच्या हातून समाजाची सेवा घडावी असं नामदेव शास्त्री यांनी म्हटलं आहे. तसेच भगवान गडासोबत छेडछाड करू नका असंही ते यावेळी म्हणाले आहेत. त्यामुळे आता नामदेव शास्त्री यांचा रोख नेमका कोणाकडे आहे? अशी चर्चा आता सुरू झाली आहे. भगवान बाबा जेव्हा मारतात. तेव्हा त्या काठीचा आवाज येत नाही, असंही नामदेव शास्त्री यांनी यावेळी म्हटलं आहे.

## नव्या वक्फ कायद्यातील दोन तरतुदींना सुप्रीम कोर्टाची स्थगिती; सरकारकडून मागितले उत्तर!

**नवी दिल्ली, दि. १७ वृत्तसंस्था**
वक्फ सुधारणा कायद्याबाबत सुप्रीम कोर्टात सुरू असलेल्या सुनावणीदरम्यान आज कोर्टाने केंद्र सरकारला महत्त्वपूर्ण निर्देश दिले आहेत. केंद्र सरकारने पारित केलेल्या वक्फ सुधारणा कायद्यातील नव्या दोन तरतुदींना कोर्टाने अंतरिम स्थगिती दिली असून यावर सरकारचं म्हणणं मांडण्यासाठी सात दिवसांचा कालावधी देण्यात आलेला आहे. तसंच याप्रकरणी पुढील सुनावणी ५ मे रोजी होणार आहे.




कोर्टाने वक्फ म्हणून घोषित केलेल्या मालमत्तांचा तो दर्जा काढून घेण्याचा अधिकार आणि केंद्रीय वक्फ परिषद व राज्य वक्फ मंडळांमध्ये बिगरमुस्लीम सदस्यांचा समावेश अशा वादग्रस्त तरतुदींबद्दल कोर्टाने यापूर्वीच तीव्र नाराजी व्यक्त केली होती. आज सुप्रीम कोर्टाने याबाबतच्या दोन्ही तरतुदींना अंतरिम स्थगिती दिली आहे. त्यामुळे तूर्तास तरी सरकार केंद्रीय वक्फ परिषद किंवा राज्य वक्फ मंडळांमध्ये बिगरमुस्लीम सदस्यांचा समावेश करू शकणार नाही.

दरम्यान, नव्या वक्फ कायद्यातील दोन महत्त्वपूर्ण तरतुदींना सुप्रीम कोर्टाकडून अंतरिम स्थगिती देण्यात आल्याने सरकारला हा धक्का मानला जात आहे. याप्रकरणी सरकारकडून पुढील सात दिवसांत कोर्टासमोर काय उत्तर दिलं जातं, हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

## वक्फ कायद्यात एक जरी चूक निघाली तरी खासदारकीचा राजीनामा देणार; जेपीसी अध्यक्षांची मोठी घोषणा

**नवी दिल्ली, दि. १७ वृत्तसंस्था**
वक्फ सुधारणा कायद्याला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले आहे. आज दुसऱ्या दिवशी सुनावणी झाली. या कायद्यातील नव्या दोन तरतुदींना अंतरिम स्थगिती देण्यात आली आहे. हा केंद्र सरकारला मोठा धक्का मानला जात आहे. अशातच वक्फ सुधारणा विधेयकावर काम करणाऱ्या जेपीसीचे अध्यक्ष जगदंबिका पाल यांचे महत्वाचे वक्तव्य आले आहे.



वक्फ सुधारणा कायद्यात एक जरी चूक आढळली तर मी माझ्या खासदारकीचा राजीनामा देईन असे त्यांनी म्हटले आहे. विरोधकांनी याचिकेद्वारे वक्फ कायद्यातील तरतुदींवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. याबाबत सरकारचं म्हणणं मांडण्यासाठी सात दिवसांचा कालावधी देण्यात आला आहे. पुढील सुनावणी ५ मे रोजी होणार आहे.

राजकीय पक्ष त्यांच्या व्होट बँकेसाठी राजकारण करत आहेत. मुस्लिम तुष्टीकरणाचे राजकारण योग्य नाही. मी कोणत्याही प्रकारच्या राजकारणाने प्रेरित नाहीय. पूर्ण निष्पक्षपणे काम करत आहे. जेपीसीने या मुद्द्यावर ३८ बैठका घेतल्या आहेत. काही राजकीय पक्ष स्वतःच्या फायद्यासाठी जनतेची दिशाभूल करत आहेत. सर्व प्रश्न निराधार असल्याचे पाल यांनी म्हटले आहे.

वक्फ बोर्डात बिगर-मुस्लिमांची उपस्थिती असावी असे सर्वोच्च न्यायालयानेच आधीच्या निर्णयात म्हटले होते. याच न्यायालयाच्या मते वक्फ बोर्ड ही एक कायदेशीर संस्था आहे, ती धार्मिक संस्था नाही, असाही दावा पाल यांनी केला आहे.

## महेश मांजरेकरांना व्ही. शांताराम जीवनगौरव पुरस्कार जाहीर

**मुंबई, दि. १७ प्रतिनिधी**
महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागातर्फे दिल्या जाणाऱ्या मानाच्या चित्रपट पुरस्कारांची घोषणा सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड.आशिष शेलार यांनी आज केली. यामध्ये चित्रपती व्ही. शांताराम जीवन गौरव पुरस्कार, चित्रपती व्ही.शांताराम विशेष योगदान पुरस्कार, स्व.राज कपूर जीवन गौरव पुरस्कार, स्व. राज कपूर विशेष योगदान पुरस्कार तसेच गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार अशा पाच महत्त्वाच्या पुरस्कारांची घोषणा ॲड.शेलार यांनी मंत्रालयात झालेल्या पत्रकार परिषदेतून दिली.

या वर्षीचा चित्रपती व्ही.शांताराम जीवन गौरव पुरस्कार नामवंत अभिनेते, दिग्दर्शक व निर्माते महेश मांजरेकर यांना जाहीर झाला आहे. हा पुरस्कार ₹१० लाख रोख रक्कम, स्मृतीचिन्ह, मानपत्र व चांदीचे पदक यासह दिला जातो.

चित्रपती व्ही.शांताराम विशेष योगदान पुरस्कार यंदा प्रसिद्ध अभिनेत्री मुक्ता बर्वे यांना प्रदान करण्यात येणार असून, या पुरस्काराचे स्वरूप ₹६ लाख, स्मृतीचिन्ह, मानपत्र व चांदीचे पदक असे आहे.



हिंदी चित्रपट सृष्टीतील मानाचा स्व. राज कपूर जीवन गौरव पुरस्कार प्रख्यात अभिनेते अनुपम खेर यांना देण्यात येणार आहे. तर स्व.राज कपूर विशेष योगदान पुरस्कार यंदा अष्टपैलू अभिनेत्री काजोल देवगण यांना मिळणार आहे. या दोन्ही पुरस्कारांचे अनुक्रमे ₹१० लाख व ₹६ लाखांचे स्वरूप आहे.

तसेच, १९९३ पासून देण्यात येणारा गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार यावर्षी मराठीतील ज्येष्ठ गझल गायक भीमराव पांचाळे यांना प्रदान करण्यात येणार आहे. हा पुरस्कार ₹१० लाख रोख रक्कम, मानचिन्हे, मानपत्र व शाल यांसह दिला जातो.

सर्व पुरस्कारांचे वितरण २५ एप्रिल २०२५ रोजी एन.एस.सी.आय. डोम, मुंबई येथे एका भव्य समारंभात होणार आहे. या सोहळ्याशिवाय, संविधान अमृत महोत्सव आणि भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्ताने महाराष्ट्र शासन सांस्कृतिक कार्य विभागातर्फे २० एप्रिल २०२५ रोजी सायंकाळी ६:३० वाजता गेटवे ऑफ इंडिया, मुंबई येथे एक खास सांगीतिक मानवंदना कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

या कार्यक्रमात सुरेश वाडकर, आदर्श शिंदे, वैशाली सामंत, उर्मिला धनगर, नंदेश उमक आदी कलाकार सहभागी होणार असून, संचालन सुबोध भावे करणार आहेत. कार्यक्रमात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित गीतं, नाट्यप्रवेश व नृत्य सादर केले जातील. हा कार्यक्रम सर्वांसाठी खुला असून, सन्मानिका प्रवेशपत्रे शिवाजी नाट्य मंदिर व रवींद्र नाट्य मंदिर येथे 'प्रथम येणाऱ्यास प्राधान्य' या तत्त्वावर वितरित केली जातील, अशी माहिती सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड.शेलार यांनी या पत्रकार परिषदेतून दिली.

## भोरच्या संग्राम थोपटेंचा भाजप प्रवेश निश्चित

**पुणे, दि. १७ प्रतिनिधी**
राज्याच्या आणि पुण्याच्या राजकारणात मोठी उलथापालथ होणार असून भोरचे माजी आमदार संग्राम थोपटे हे काँग्रेसला सोडचिठ्ठी देणार आहेत. त्यांचा भाजप प्रवेश निश्चित झाला असून रविवारी ते पक्ष प्रवेश करणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. भाजपचे कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या पुढाकाराने संग्राम थोपटे भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याची माहिती आहे. संग्राम थोपटे हे काँग्रेसचे बडे नेते असून ते तीन वेळा आमदार होते. तर त्यांचे वडील अनंतराव थोपटे हे सहा वेळा भोर विधानसभेचे आमदार होते.

नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे उमेदवार शंकर मांडेकर यांनी संग्राम थोपटे यांचा पराभव केला होता. संग्राम थोपटे यांनी आता काँग्रेसला रामराम करुन भाजपमध्ये प्रवेश करण्याचं निश्चित केल्याची माहिती आहे. त्यासाठी त्यांनी केंद्रीय मंत्री अमित शाह यांचीही भेट घेतल्याची माहिती आहे.

संग्राम थोपटे यांनी अद्याप काँग्रेसचा राजीनामा दिला नाही. ते त्यांच्या कार्यकर्त्यांशी चर्चा करत असल्याची



माहिती आहे. त्यानंतर रविवारी ते काँग्रेसच्या सदस्यत्वाचा राजीनामा देणार असल्याची माहिती आहे.

संग्राम थोपटे अध्यक्ष असलेला राजगड सहकारी साखर कारखाना हा अडचणीत असल्याची माहिती आहे. या कारखान्याला राज्य सरकारने ८० कोटींचे मार्जिन लोन मंजूर केलं होतं. पण लोकसभेत संग्राम थोपटे यांनी सुप्रिया सुळे यांना मदत केली आणि सुनेत्रा पवार यांचा पराभव झाला. त्यानंतर अजित पवारांच्या विरोधाने त्यांच्या कारखान्याला जाहीर करण्यात आलेली मदत मागे घेण्यात आली होती.

आता या कारखान्याला मदत मिळावी यासाठी संग्राम थोपटे भाजपमध्ये जाणार असल्याची राजकीय चर्चा सुरू आहे.

## मी 22 व्या वर्षी सफारी गाडीतून फिरायचो चोऱ्या - माऱ्या करायची गरज नाही - गोपीचंद पडळकर

**सोलापूर, दि. १७ प्रतिनिधी**
पुण्यात अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त होणाऱ्या धनगरी नाद कार्यक्रमावरुन आता वाद निर्माण झाला आहे. कारण, या कार्यक्रमासाठी खास गृहमंत्री अमित शाह यांना निमंत्रण देणाऱ्या गोपीचंद पडळकर यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना या कार्यक्रमास बोलवणार नसल्याचे म्हटले. त्यावरुन, वाद सुरू झाला असून राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे युवक प्रदेशाध्यक्ष सूरज चव्हाण यांनी गोपीचंद पडळकरांवर टीका केली होती. ते शेखचिल्ली असल्याचे सूरज चव्हाण यांनी म्हटलं. आता, गोपीचंद पडळकर यांनी सूरज चव्हाण यांच्यावर पलटवार केला आहे. या बिनडोक लोकांना माहिती नाही मी २२ व्या वर्षीपासून सफारी गाडीतून फिरतो, तेव्हा तुम्हाला चड्डी पण नीट घालता येत नव्हती, अशा शब्दात पडळकरांनी पलटवार केला आहे.

चोरी, दरोडे याचा उल्लेख करत सूरज चव्हाण यांनी गोपीचंद पडळकरांना डिवचले होते. स्वतःच्या राजकीय पार्श्वभूमीमुळे अजितदादांना कार्यक्रमाला बोलवण्याची हिंमत गोपीचंद पडळकरांनी केली नसावी, असा टोला सूरज चव्हाण यांनी लगावला होता. त्यावरून, आता पडळकरांनी जशास तसे उत्तर दिलं आहे. हे मला दरोडेखोर म्हणतात, मी आजपर्यंत कधी या विषयावर बोललो नाही, पण हे सगळ राष्ट्रवादीचेच काम आहे. माझ्यावर मंगळसूत्र चोरीचा आरोप केला त्यावेळी त्यांच्या अपक्ष आमदार २००९ साली विधानपरिषदेत दोन अडीच हजार मतांनी पडला. मेलेल्या माणसांबद्दल बोलू नये पण त्यावेळेसचे गृहमंत्री आर आर आबा पाटील यांचा तो एकदम जवळचा व्यक्ती होता, मानस बंधू होते. ज्या लग्नाच्या लग्नपत्रिकेत माझा उल्लेख प्रमुख पाहुणा म्हणून होता, त्या लग्नात भांडण झाली तेव्हा मी तिथे उपस्थित नव्हतो. तरी देखील माझ्यावर केस टाकण्यात आली, हे राष्ट्रवादीचेच पाप आहे, असा इतिहास पडळकरांनी सांगितला. तर, या बिनडोक लोकांना माहिती नाही मी २२ व्या वर्षीपासून सफारी गाडीतून फिरतो, तेव्हा तुम्हाला चड्डी पण नीट घालता येतं नव्हती, असे म्हणत सूरज चव्हाण यांच्या टीकेवर पलटवार केला आहे.



मी धनगराचा पोरगा आहे, मला असल्या चोऱ्या माऱ्या करायची गरज नाही. प्रस्थापित व्यवस्थेच्या विरोधात जेव्हा मी बोलतो तेव्हा पोलीस, तहसीलदार असे प्रशासन वापरण्याशिवाय यांच्याकडे पर्याय नसतो. कार्यक्रमाला कोणाला बोलवायचं हा आमचा विषय आहे, आम्ही ठरवू काय करायचं ते. तुमचे एवढे कार्यक्रम होतात आम्ही बोलतो का? हा समाजाचा विषय आहे, समाजाला वाटलं तुम्हाला बोलवावं तर तुम्हाला पण बोलवू, असेही पडळकर यांनी म्हटले.

गोपीचंद पडळकर हा शेखचिल्ली माणूस आहे. जसा शेखचिल्ली फांदी कापताना तुटायचा बाजूने बसून स्वतःच झाडावरून पडला होता, तसा हा शेखचिल्ली महायुतीतल्या नेत्यांवर बोलून स्वतःची राजकीय फांदी कापून घेतोय. या शेखचिल्लीला माहित आहे की, पवारांना विरोध केला तरचं राजकीय जिवंत राहू शकतो. पवारांशिवाय या शेखचिल्लीची मार्केट किंमत झिरो आहे, अशी टीका सूरज चव्हाण यांनी केली होती.

# नाशिक एज्युकेशन सोसायटी गुणवत्तेची खाण : उद्योजक हेमंत राठी




**नाशिक ।** नाशिक एज्युकेशन सोसायटी गुणवत्तेची खाण असून त्यामुळेच १०३ वर्षांची अखंडित शिक्षणाचा गौरवशाली इतिहास संस्थेने पूर्ण केला असल्याचे मत पेटी हायस्कूलचे माजी विद्यार्थी तथा नामवंत उद्योजक हेमंत राठी यांनी व्यक्त केले.

नाशिक एज्युकेशन सोसायटी आयोजित सेवानिवृत्त पदाधिकारी शिक्षक- शिक्षकेतर यांच्या कृतज्ञता सोहळ्याप्रसंगी त्यांनी वरील गौरवोद्गार काढले.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्था अध्यक्ष प्रा. दिलीप फडके उपस्थित होते.शासकीय नियमानुसार तथा स्वेच्छेनुसार सेवानिवृत्त झालेल्या पदाधिकारी शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांचा कृतज्ञता सत्कार सोहळा प.सा नाट्यगृह येथे आयोजित करण्यात आला.संस्थेच्या वतीने सेवानिवृत्तांचा यथोचित सत्कार करण्यात आला.आपल्या भाषणातून उद्योजक हेमंत राठी यांनी सेवानिवृत्तांना आपली भूमिका बदलण्याचे आवाहन करून सामाजिक,कौटुंबिक, शैक्षणिक क्षेत्रात आवडीने काम करण्याचे, आपले छंद जोपासण्याचे आवाहन केले. अध्यक्षीय भाषणातून प्रा. दिलीप फडके यांनी सेवानिवृत्तांनी पुढील आयुष्यात संस्थेच्या विविध शैक्षणिक उपक्रमात सहभाग घ्यावा असे आवाहन केले. पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी व्यासपीठावर कांता राठी, उपाध्यक्ष चंद्रशेखर मोंढे, ॲड. जयदीप वैशंपायन, कार्यवाह राजेंद्र निकम, शिक्षक मंडळ अध्यक्ष नंदा पेटकर,कार्यकारी मंडळाचे सदस्य सरोजिनी तारापूर कर, राजा वर्टी,रंजना परदेशी,मैथिली गोखले, देवदत्त जोशी, मोहन रानडे,सहकार्यवाह शैलेश पाटोळे, उमेश कुलकर्णी,पंढरीनाथ बिरारी, प्राजक्ता क्षीरसागर आदी उपस्थित होते. याप्रसंगी ३० सेवानिवृत्त पदाधिकारी शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा प्रमुख मान्यवरांच्या हस्ते सन्मान, सत्कार करण्यात आला. सेवानिवृत्तांमधून माजी मुख्याध्यापक कैलास पाटील, सुरेखा सोनवणे यांनी संस्थेविषयी ऋण व्यक्त केले.कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक कार्यवाह राजेंद्र निकम यांनी केले. सत्कारार्थी यादीचे वाचन प्रशांत साबळे,अमोल जोशी, अतुल भालेराव, हर्षल कोठावदे,प्रशांत केंदळे, चारुशीला पत्की यांनी केले. अतिथींचा परिचय मधुवंती देशपांडे यांनी करून दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राजक्ता क्षीरसागर यांनी केले. उपाध्यक्षॲड. जयदीप वैशंपायन यांनी आभार मानले. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली. या कृतज्ञ ता सोहळ्याप्रसंगी संस्था सभासद, विविध शाळांचे पदाधिकारी व शिक्षक शिक्षकेतर, सत्कारार्थी कुटुंबीय मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ➤ महत्त्वाचे

### सिडकोत चारचाकी वाहनावर हल्ला; चार जणांविरोधात गुन्हा दाखल

**सिडको ।** सिडको परिसरात मध्यरात्रीच्या



सुमारास एका युवकाच्या गाडीवर चार जणांच्या टोळक्याने हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली. या हल्ल्यात इरटिगा गाडीच्या दोन्ही बाजूच्या काचा फोडण्यात आल्या असून धारदार शस्त्राने गाडीवर हल्ला करून गंभीर दहशत निर्माण करण्यात आली. याप्रकरणी अंबड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी निशांत संजय गुंडे (वय २५, रा. समता चौक, राजवाडा, कामठवाडे, नाशिक) हे दि. १५ एप्रिल रोजी रात्री १२.३० च्या सुमारास स्वतःच्या एम.एच. ०५-एक्स. एक्स. ५०५० क्रमांकाच्या इरटिगा गाडीने घरी जात होते. ते सिडकोतील सुलभ शौचालय जवळ आले असताना राजा वाकळे, अर्जुन वाकळे आणि त्यांच्या दोन साथीदारांनी त्यांची गाडी अडवली. रस्त्यात गाडी अडवून गार्ड करत त्यांनी गाडीच्या दोन्ही बाजूच्या काचा फोडल्या. इतक्यावरच न थांबता, त्यांनी गाडीच्या आत दगड फेकून जीवघेणा हल्ला करण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर धारदार शस्त्राने गाडीच्या बोनटवर वार करण्यात आला आणि गंभीर स्वरूपाची शिवीगाळ करत दमदाटी करण्यात आली. घटनेनंतर निशांत गुंडे यांनी अंबड पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक राकेश हांडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक उंडे आणि पोहवा बनतोडे तपास करत आहेत. पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फूटेज तपासण्यास सुरुवात केली आहे. या घटनेमुळे सिडको परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, नागरिकांनी रात्रो उशिरा प्रवास करताना सावधगिरी बाळगण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे.

### अति लघुकथा घेतात मनाचा ठाव : उमरकर

**नाशिक ।** जीवन जगत असताना अनेक




अनुभवांनी माणूस शिकत असतो. यातूनच कथानकाचा जन्म होतो. अशाच माणसाला अंतर्मुख करणाऱ्या अनेक अति लघुकथा (अलक) माणसाच्या मनाचा ठाव घेतात, असे प्रतिपादन सुप्रसिद्ध 'अलक'कार सुभाष उमरकर यांनी केले. गिरणा गौरव प्रतिष्ठानच्या वतीने हुतात्मा स्मारकात आयोजित 'पुस्तकावर बोलू काही' उपक्रमात 'अंतर्मनातील अंतरंग' या पुस्तकावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक तु.सी. ढिकले होते. उमरकर पुढे म्हणाले की, आजचे जग हे धावपळीचे आहे. त्यामुळे मोठी कथा लघुकथेत रूपांतर करून अलक हा प्रकार वापरून संक्षिप्त वाचन आपल्याला करता यावे, म्हणून या कथांची निर्मिती केली. कपाळावरच्या रेषा आणि पायाला पडलेल्या भेगा जाणून घेतल्याशिवाय आयुष्य बदलता येत नाही. यासाठी आपल्या भोवताली असलेल्या व्यक्तीच्या विचारांचा आणि वागण्या-बोलण्याचा मोठा प्रभाव पडू शकतो. सकारात्मक विचारच आपल्याला पुढे नेऊन जगण्याला बळ देऊ शकतात, असेही ते म्हणाले. प्रभावती चव्हाण आणि सुभाष पवार यांना ग्रंथभेट देऊन सन्मानित करण्यात आले. कवी सोमनाथ साखरे यांनी केले. योगाचार्य अशोक पाटील यांनी आभार मानले. दरम्यान येत्या शुक्रवारी (दि.१८) सुजाता येवले या 'एक्स्चेंज ऑफर' या पुस्तकावर ऐसपैस गप्पा करणार आहेत.

### कुसुमाग्रजातील संगीत मैफलीत श्रोते झाले दंग

**नाशिक ।** फार्मा मित्रमंडळाच्या वतीने



आयोजित हिंदी चित्रपटातील गीतांची मैफल रविवारी (दि.१३) सायंकाळी ६ वाजता कुसुमाग्रज प्रतिष्ठानातील विशाखा सभागृहात पार पडला. मैफलीत सादर झालेल्या जुन्या-नव्या हिंदी चित्रपटातील गीतांनी श्रोते दंग झाले होते. सर्वांसाठी प्रवेश नि:शुल्क असलेल्या या कार्यक्रमात गायक अजय पाटील, राज अक्कर, संतोष देहूकर, किशोर शिरूडे, जयदीप जाधव, दिनेश गोविल, मयुरी मुरडेश्वर, स्मिता पांडे, भाग्यश्री गायधनी, वैष्णवी पगारे, सारिका शिरूडे, सुरेश कापरे यांनी हिंदी चित्रपटांतील विविध गीते सादर करून रसिक श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. कार्यक्रमात 'एक लडकी को देखा, काटे नही कटते, कभी तू छलिया, माना हो तूम, शोखियो मे घोला, हद करदी आपने, चांद सिफारिश, बिन तेरे सनम, तुमसा कोई प्यारा, खिलते है गुल यहा, नाम गुम जायेंगा, सुरज हुवा मध्यम, लेकर हम दिवाना दिल' अशी वीस विविध गीते कलाकारांनी सादर केली.

# पंचवटी एक्सप्रेसमध्ये देशातील पहिल्या ऑनबोर्ड एटीएमसाठी भुसावळ विभागाकडून चाचण्या सुरु

## प्रवाशांच्या सोयीसाठी, नाविन्यपूर्ण गैर-भाडे महसूलासाठी महत्त्वपूर्ण पाऊल

**देवळाली कॅम्प ।** मध्य रेल्वेच्या भुसावळ विभागाने प्रवाशांच्या सोयीसाठी आणि नाविन्यपूर्ण गैर-भाडे महसूल (Non-Fare Revenue) संधींचा शोध घेण्यासाठी एक क्रांतिकारी उपक्रम सुरू करत नव्या युगाची सुरुवात केली आहे. रेल्वे प्रवास अधिक आधुनिक आणि सुलभ करण्याच्या दृष्टीने, भुसावळ विभागाने महाराष्ट्र बँकेच्या समन्वयाने धावत्या गाडीत देशातील पहिली ऑनबोर्ड एटीएम सेवा सुरू करण्यासाठी चाचण्या सुरू केल्या आहेत.



गाड्यांमध्ये एटीएम बसवण्याचा विचार प्रथम भुसावळ विभागाने आयोजित केलेल्या नाविन्यपूर्ण गैर-भाडे महसूल ग्राहक संवाद बैठकीत मांडण्यात आला होता. या दूरदृष्टीपूर्ण कल्पनेला प्रतिसाद देत, प्रमुख राष्ट्रीयीकृत बँक असलेल्या बँक ऑफ महाराष्ट्रने "नवीन, नाविन्यपूर्ण गैर-भाडे महसूल कल्पना योजना" (NINFRIS) अंतर्गत औपचारिक प्रस्ताव सादर केला. सध्या गाडी क्रमांक 12110 मनमाड–मुंबई सीएसएमटी पंचवटी एक्सप्रेसमध्ये या सेवेच्या व्यवहार्यता व कार्यक्षमतेची चाचणी सुरू आहे. ही गाडी दररोज मनमाड ते मुंबई सीएसएमटीदरम्यान धावते. एकूण 22 डब्यांच्या या गाडीची आसन क्षमता 2,032 असून दररोज सुमारे 2,200 प्रवासी मुंबई सीएसएमटीकडे प्रवास करतात. संपूर्ण गाडी वेस्टिब्यूल कनेक्टेड असल्यामुळे सर्व श्रेणीतील प्रवाशांना या एटीएमचा सहज लाभ घेता येणार आहे. या सेवेसाठी प्रवाशांच्या आसनव्यवस्थेवर किंवा सुविधांवर कोणताही परिणाम होणार नाही, कारण एटीएम कोचमधील पूर्वी न वापरलेल्या जागेत बसवण्यात येत आहे. ही संपूर्ण उपक्रम योजना भारतीय रेल्वेच्या विद्युत व यांत्रिक विभागांच्या समन्वयातून राबवली जात आहे. ही ऑनबोर्ड एटीएम सेवा प्रत्यक्षात अंमलात आल्यावर, प्रवाशांना प्रवासादरम्यान सहज आर्थिक व्यवहार करता येणार आहेत. विशेषतः ज्येष्ठ नागरिक, महिला आणि आकस्मिक गरज असलेल्या प्रवाशांसाठी ही सुविधा अत्यंत उपयुक्त ठरेल. ही एटीएम सेवा मोबाईल नेटवर्कद्वारे सतत जोडलेली राहणार असून, गाडी सुरू असतानाही खऱ्या वेळेत व्यवहार शक्य होतील. भारतीय रेल्वेच्या प्रवासी अनुभवात सातत्याने सुधारणा आणि पारंपरिक महसूल पद्धतींपलीकडे जाऊन नवकल्पना राबवण्याच्या वचनबद्धतेचा हा एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे. भुसावळ विभागाला या उपक्रमाचे नेतृत्व करत असल्याचा अभिमान असून लवकरच इतर महत्वाच्या गाड्यांमध्येही ही सुविधा देण्याच्या शक्यतेचा विचार केला जात आहे, जेणेकरून रेल्वे प्रवास अधिक सोयीस्कर, सुरक्षित आणि प्रवाशी हितकारी होईल.

# गुड फ्रायडे : पवित्र बलिदानाची आठवण; मानवतेसाठी दिलेलं बलिदान

गुड फ्रायडे हा ख्रिश्चन धर्मीयांचा एक अत्यंत पवित्र आणि भावनिकदृष्ट्या महत्त्वाचा दिवस आहे. येशू ख्रिस्तांनी मानवजातीच्या पापांपासून तारण मिळवण्यासाठी दिलेलं बलिदान या दिवशी स्मरणात ठेवलं जातं. गुड फ्रायडे हा ईस्टर संडेच्या दोन दिवस आधी येतो. बायबलनुसार येशू ख्रिस्ताला या दिवशी रोमन साम्राज्याच्या सैनिकांनी अटक केली. खोट्या आरोपाखाली शिक्षा दिली आणि शेवटी क्रुसावर खिळून ठार मारलं.




जरी हा दिवस दुःखद घटनांनी भरलेला आहे तरी ख्रिश्चन धर्मीयांच्या मते येशूंच्या मृत्यूमुळे मानवजातीला मोक्ष मिळाला. म्हणूनच हा दिवस 'गुड' – म्हणजे पवित्र किंवा शुभ – मानला जातो. गुड फ्रायडेचे धार्मिक महत्त्व येशू ख्रिस्ताचा त्याग, सहनशीलता आणि क्षमाशीलता यांचं प्रतीक आहे. प्रेम, क्षमा आणि मानवतेचे सर्वोच्च आदर्श. प्रत्येक ख्रिश्चनाच्या श्रद्धेचा आधार. गुड फ्रायडे या दिवशी चर्चमध्ये प्रार्थना: विशेष सभा, बायबल पठण, स्तुतीगीते. उपवास व संयम: अनेक ख्रिश्चन गुड फ्रायडेला उपवास करतात. धार्मिक नाटके: येशूंच्या जीवनावर आधारित कार्यक्रम. शांती आणि मौन: एकात्मतेने दिवस म्हणून साजरा केला जातो. समाजाला दिलेला संदेश. गुड फ्रायडे केवळ धार्मिक दिवस नाही, तर तो निःस्वार्थ प्रेम, सत्यासाठी लढा, आणि क्षमाशीलतेचा विजय या सार्वत्रिक मूल्यांचा संदेश देतो. आजच्या काळात हे मूल्यं अधिकच महत्त्वाची ठरतात. म्हणून: बलिदानातून प्रेरणा. गुड फ्रायडे आपल्याला शिकवतो की आत्मत्याग आणि प्रेम हेच खऱ्या धर्माचे सार आहे. येशू ख्रिस्तांनी दिलेला संदेश आजही मानवतेसाठी प्रेरणादायी आहे. आजच्या या पवित्र दिवशी, आपण फक्त येशूंच्या बलिदानाचे स्मरण न करता, त्यांची शिकवण आपल्या आचरणात आणण्याचा संकल्प करूया. क्षमाशीलता, प्रेम, आणि सेवा या मूल्यांना आपल्या आयुष्यात जागा देऊया. कारण खरेतर, गुड फ्रायडे ही एक 'घटना' नसून एक 'आवाज' आहे! जो आपल्याला अंतर्मनातून सांगतो की माणुसकी अजूनही जिवंत आहे... आणि ती आपल्यातूनच प्रकट होणार आहे.

**– नितीन ओस्तवाल, नाशिक**

# एसटीच्या अस्वच्छ हॉटेल थांब्यांवर गंडांतर






**परिवहन-मंत्र्यांचे आदेश जारी**

**(किरण घायदार यांजकडून)**

**नाशिक ।** हॉटेल - मोटेल थांबे यावरून एसटीला मिळणारे उत्पन्न एक वेळ बुडाले तरी चालेल; परंतु प्रवाशांना मिळणाऱ्या सुविधा बाबत कोणतीही तडजोड केली जाणार नाही, असे परिवहनमंत्री आणि महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी म्हटले आहे.

एसटीच्या प्रवासादरम्यान एसटी बसेसना ठराविक थांबे दिलेले असतात. या थांब्यातील हॉटेलात अगदी बेचव आणि महागडे जेवण प्रवाशांच्या माथी मारले जात असते. महिला प्रवाशांच्या दृष्टीने गैरसोयीचे ठिकाण देखील असते. त्यामुळे अशा सर्व हॉटेल आणि मॉटेलची झाडाझडती होणार आहे. प्रवाशांना सकस आणि किफायतशीर जेवण मिळत नसेल तर अशा थांब्यांची तपासणी करुन ती रद्द करावेत, असे आदेश परिवहनमंत्री आणि एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिले आहेत. एस टी बस थांबत असलेल्या हॉटेल-मोटेल थांब्यावर प्रवाशांना आरोग्यदायी आणि किफायतशीर सुविधा मिळत नसतील तर असे थांबे रद्द करण्याचे निर्देश परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी एसटी प्रशासनाला दिले आहेत. या संदर्भात सध्या सुरू असलेल्या सर्व थांब्याचे सर्वेक्षण करून त्याचा अहवाल पुढील १५ दिवसात सादर करण्याच्या सूचना देखील त्यांनी एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक यांना केल्या आहेत.

लांब पल्ल्याच्या प्रवासादरम्यान एसटी बसेस विविध हॉटेल-मोटेल थांब्यावर थांबतात. तेथे प्रवाशांना चहा -नाष्टा अथवा जेवण तसेच नैसर्गिक विधीसाठी वेळ दिला जातो. परंतु अनेक हॉटेलमधील थांब्या बाबत प्रवाशांच्या तक्रारी येत असून प्रामुख्याने प्रसाधनगृहे अस्वच्छ असणे, फराळाचे जिन्नस शिळे, अशुद्ध व महाग असणे, याचबरोबर संबंधित हॉटेल वरील कर्मचारी व मालकांची वर्तणूक एस टी प्रवासांच्या सोबत अत्यंत वाईट असणे अशा प्रकारच्या तक्रारी येत आहेत.

# 'झापुक झुपूक' सिनेमाचा रोमांचक ट्रेलर अभिनेता रितेश देशमुखच्या हस्ते रिलीज

**नाशिक ।** 'बाईपण भारी देवा' चित्रपटाच्या भरघोस यशानंतर जिओ स्टुडिओज् आणि केदार शिंदे ही सुपरहीट जोडी २५ एप्रिल २०२५ रोजी 'झापुक झुपूक' हा कौटुंबीक मनोरंजन करणारा सिनेमा घेऊन पुन्हा एकदा प्रेक्षकांना भेटण्यास येत आहेत. नुकतच या सिनेमाचा धमाल ट्रेलर रितेश देशमुख ने रिलीज केला आहे. आणि रिलीझ होताच हा ट्रेलर सोशल मीडियावर धुमाकूळ घालत आहे. विशेष म्हणजे अभिनेता रितेश देशमुखचा सूरज चव्हाण खूप मोठा चाहता आहे आणि आज बिग बॉस सीजन ५ च्या यशानंतर रितेश सूरजच्या या खास क्षणी सामील झाला आहे. दिग्दर्शक केदार शिंदे ह्यांनी बिग बॉस च्या वेळीच सूरज सोबत एक चित्रपट बनवण्याचं ठरवलं होतं आणि आता ते अमलात आणून २५ एप्रिल रोजी फिल्म रिलीज ही होतेय.

सूरज चव्हाण अभिनित 'झापुक झुपूक' ह्या सिनेमाचं ट्रेलर आनंदाची मेजवानी घेऊन आलाय. रोमांस, ॲक्शन , ड्रामा या सर्व गोष्टींवर प्रकाशझोत टाकणारा हा चित्रपट आहे. हा ट्रेलर अनेकांचं लक्ष वेधून घेत आहे. विशेष म्हणजे तरुणांमध्ये या सिनेमाची क्रेज जास्त पहायला मिळते. सूरज चव्हाणची स्टाईल आणि धमकेदार डायलॉग्स अख्ख्या महाराष्ट्रात आता गाजणार आहे. ट्रेलर मध्ये दोन कमाल गाण्यांची झलक सुद्धा पहायला मिळते. त्यातील एक गाणं नक्कीच ह्या पुढे हळद गाजवणार. त्याचसोबत सुरज आणि जुई भागवत ची छान जोडी अजून आकर्षक करते. फॅमिली एंटरटेनमेंटचा जबरदस्त तडका असलेल्या "झापुक झुपूक" चित्रपटाची टीम संपूर्ण महाराष्ट्राचं मनोरंजन करायला सज्ज आहे. ट्रेलर लॉंचच्यावेळी अभिनेता रितेश देशमुख ह्यांनी 'झापुक झुपूक' च्या प्रवासाबद्दल सांगितलं ते म्हणाले "बिग बॉसची जेव्हा सुरुवात झाली तेव्हा माझा आणि सूरज साठी तो पहिला प्रवास होता. केदार भाऊंसाठी सुद्धा तो पहिला प्रवास होता. सूरज जेव्हा बॉग बॉसच्या घरात तिसऱ्या आठवड्यात होता तेव्हाच केदार भाऊंनी सूरजवर सिनेमा बनवण्याचं ठरवलं होतं. त्यांनी त्यावेळी मला म्हंटलं होतं कि विजेता कोण पण असू दे मी सूरजवर चित्रपट




बनवणार आणि ह्या गोष्टीचा मी साक्षीदार आहे. असं नाही आहे कि सूरज जिंकल्यावर सिनेमा बनवण्यात आलाय. त्यामुळे केदार भाऊंच्या हिम्मत आणि कंमिटमेंटला माझा सलाम आहे. ह्या सिनेमाचं संगीत, एडिटिंग, स्टोरी सगळंच अप्रतिम आहे. हा चित्रपट ब्लॉकबस्टर आहे. सूरज आणि संपूर्ण टीमला खूप शुभेच्छा. महाराष्ट्रतील प्रेक्षक आणि सूरजचे चाहते नक्कीच सिनेमागृहात जाणार आहे ह्यात मला काहीच शंका नाही. मला सूरजचा खूप अभिमान आहे. जिओ स्टुडिओजचं सुद्धा खूप अभिनंदन की ते वेगवेगळे प्रयोग करुन नवीन नवीन विषय प्रेक्षकांसमोर आणतात.

यावेळी दिग्दर्शक केदार शिंदे म्हणाले 'झापुक झुपूक'ची कल्पना जेव्हा मला आली सूरज चव्हाणला घेऊन त्यावेळेस बिग बॉस मराठी सुरु होतं. मी कलर्स मराठीचा प्रोग्रामिंग हेड असल्या कारणामुळे बिग बॉसची जबाबदारी माझ्यावर होती. त्यावेळी माझं आणि रितेशचं खूप बोलणं सुरु असायचं तेव्हाच मी ती कल्पना रितेश ला सांगितली. रितेश भाऊंना ही कल्पना भयंकर आवडली आणि त्यांनी सुद्धा मला सांगितलं कि जर माझ्याकडे उत्तम गोष्ट आहे तर मी ती पुढे आणावी. आज या ट्रेलरच्या माध्यमातून मी एक सुंदर गोष्ट प्रेक्षकांसमोर आणतोय आणि ह्या वेळेस सुद्धा रितेश भाऊ माझ्या सोबत उभे आहेत ह्याचा मला आनंद आहे."

'झापुक झुपूक' चित्रपटात सूरज सोबत जुई भागवत, इंद्रनील कामत, हेमंत फरांदे,पायल जाधव,दीपाली पानसरे, तसेच पुष्कराज चिरपुटकर, मिलिंद गवळी हे मुख्य भूमिकेत झळकणार आहेत. प्रत्येकाला आपलीशी वाटणारी ही गोष्ट आहे. एका लव्हस्टोरी सोबतच वेग वेगळ्या भावनांचा मिश्रण या सिनेमात पहायला मिळणार आहे. जिओ स्टुडिओज् प्रस्तुत, केदार शिंदे प्रोडक्शन्स निर्मित, निर्माती ज्योती देशपांडे, निर्माती सौ. बेला केदार शिंदे ,केदार शिंदे दिग्दर्शित "झापुक झुपूक" सिनेमाचा मजेशीर ट्रेलर नक्कीच प्रेक्षकांच्या पसंतीस उतरला आहे.

## महत्त्वाचे

### भगूर येथे मेनरोड फ्रेंड्स सर्कलतर्फे पाणपोई सुरू

**देवळाली कॅम्प ।** उन्हाच्या तीव्रतेमुळे नागरिकांना पिण्याच्या पाण्याची गैरसोय होऊ नये, यासाठी भगूर येथील मेनरोड फ्रेंड्स सर्कलच्या वतीने पाणपोई सुरू करण्यात आली. हा उपक्रम अनिल मेडिकलसमोर जेष्ठ नागरिक नारायण कुलकर्णी यांच्या हस्ते पार पडला. या उपक्रमाद्वारे उन्हाळ्यात होणारी पाण्याची टंचाई लक्षात घेऊन नागरिकांना



थंड पाणी पुरवण्याचे कार्य केले जात आहे. मेनरोड फ्रेंड्स सर्कलने गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक हिताच्या कामात पुढाकार घेतला आहे. उन्हाळ्यात उष्माघाता सारख्या समस्यांवर तोडगा काढण्यासाठी हा प्रकल्प राबवला जातो. कार्यक्रमाचे संचालन संभाजी देशमुख यांनी केले. यावेळी अनेक भगूरवासीयांनी या पाणपोई उपक्रमाचे कौतुक केले व या प्रकल्पाचा लाभ घेण्यासाठी उपस्थित राहिले. पाणपोईमुळे नागरिकांना उन्हाच्या काहिलीत मोठा दिलासा मिळाला आहे. यावेळी दादासाहेब देशमुख, संजूशेठ गणोरे, काकासाहेब देशमुख, मनोहर आंबेकर, विक्रम सोनवणे, मोहम्मद मन्सुरी, राजेंद्र मगर, अंबादास सूर्यवंशी, किशोर पवार, शेरीफ मन्सूरी, प्रविण वाघ, राजेश मानधणे, संतोष मोजाड, महेश वाघचौरे, राहुल थोरात, अमोल गणोरे, शरद शिवले, शंभु थोरात, ओम देशमुख आदी उपस्थित होते.

### अ. भा. आंतर विद्यापीठ पॉवर लिफ्टिंग स्पर्धेत मुक्त विद्यापीठाला रौप्यपदक

**नाशिक ।** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने अखिल भारतीय आंतर विद्यापीठ पॉवर लिफ्टिंग स्पर्धेत रौप्य पदक प्राप्त केले आहे. गेल्या दिनांक ४ ते ०७ एप्रिल २०२५ दरम्यान जम्मू काश्मीरच्या श्रीनगर येथील काश्मीर विद्यापीठ येथे सदर स्पर्धा संपन्न झाली. त्यात विद्यापीठाच्या कु. सेजल विश्वनाथ मोईकर या विद्यार्थिनीने ७६ किलो वजनी गटात विद्यापीठास हे यश मिळवून दिले. ती विद्यापीठाच्या पुणे विभागीय केंद्रांतर्गत असलेल्या तळेगाव दाभाडे येथील इंद्रायणी महाविद्यालयाची प्रथम वर्ष बी. ए. ची विद्यार्थिनी आहे. तिला विद्यापीठ क्रीडा समन्वयक श्री. सिध्दांत टाक यांचे मार्गदर्शन लाभले. सदर यशाबद्दल कु. सेजल मोईकर या विद्यार्थिनीचे विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे, प्र-कुलगुरू प्रा. जोगेन्द्रसिंह बिसेन, कुलसचिव श्री. दिलीप भरड, विद्यापीठ व्यवस्थापन मंडळ सदस्य डॉ. संजीवनी महाले, वित्त अधिकारी डॉ. गोविंद कतलाकुटे, परीक्षा नियंत्रक भटूप्रसाद पाटील, सिका संचालक डॉ. मधुकर शेवाळे यांनी अभिनंदन केले आहे.



# महापालिकेच्या महिला प्रशिक्षण कार्यक्रमाची सखोल चौकशी करा

**प्रहार जनशक्ती पक्षाची मागणी**

**बच्चू कडूंच्या उपस्थितीत आयुक्तांची घेणार भेट**

**नाशिक ।** महापालिकेच्या महिला व बालकल्याण विभागातर्फे राबविण्यात आलेल्या महिला प्रशिक्षण कार्यक्रमात गैर व्यवहार झाले आहेत. याबाबत संपूर्ण प्रशिक्षण कार्यक्रमाची चौकशी करण्याची आग्रही मागणी प्रहार जनशक्ती पक्ष्याच्यावतीने करण्यात आली आहे. या प्रकरणाबाबत मनपा आयुक्तांना पत्र देऊन त्यांनी मागितलेले पुरावे सादर करूनही आयुक्तांनी अद्याप चौकशी समिती नेमलेली नाही किंवा कारवाई प्यादे पुढे सरकवलेले नाही.

या प्रशिक्षण कार्यक्रमाची सर्वत्र कुचर्चा सुरू आहे. त्यामुळे 'दूध का दूध आणि पानी का पानी' हे सिद्ध करण्यासाठी महापालिकेच्या अतितत्पर आणि कर्तव्यदक्ष (?) आयुक्तांनी या संपूर्ण कार्यक्रमाची सखोल चौकशी करण्याची मागणी प्रहार जनशक्ती पक्षाने केली आहे. याबाबत अनेकदा पाठपुरावाही केलेला आहे. शहरातील गरजू आणि सामान्य-गरीब महिलांसाठी महापालिकेच्या महिला व बालकल्याण विभागाच्यावतीने महिला प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात आला आहे. महिलांना विविध कोर्सेसचे प्रशिक्षण देऊन त्यांना स्वतःच्या पायावर उभे करण्यासाठी मोलाची भूमिका निभावणाचा गोमटा प्रयत्न



महापालिका करीत आहे यात शंका नाही; परंतु गैरकारभार आणि टक्केवारीत अडकल्याने या प्रशिक्षण कार्यक्रमाची पार रया गेली. या प्रशिक्षण कार्यक्रमाची सर्वत्र कुचर्चा झाली. काही सामाजिक कार्यकर्ते, संस्था-मंडळांनी आयुक्तांकडे तक्रारी केल्या होत्या. तरीही ढिम्म प्रशासनाने काहीच हालचाल केली नाही.

आयुक्त मनीषा खत्री यांनी आयुक्तपदाची सूत्रे स्वीकारली त्यावेळेला त्यांनी या संपूर्ण प्रकरणाची सविस्तर चौकशी करण्याचे ठोस आश्वासन दिले होते; परंतु तीन-चार महिने उलटूनही अद्याप आयुक्तांनी दिलेल्या आश्वासनाची पूर्तता केली नाही. त्यामुळे हे कथित प्रकरण पुन्हा चर्चेत आले आहे. कार्यतत्पर आयुक्तांकडून या कथित प्रकरणाची सखोल चौकशी होऊन दोषींना शास्ती होईल, अशी बाळगलेली मनीषा अखेर फोल ठरली आहे. गेल्या वर्षात महापालिकेचा महिला प्रशिक्षणाचा विषय यामध्ये झालेल्या गैरकारभारामुळे खूपच गाजला होता. टक्केवारीभोवती पिंगा घालणारे हे प्रकरण संबंधित ठेकेदार संस्था आणि अधिकाऱ्यांच्या हितसंबंधामुळे चांगलेच वलयांकित झाले होते, आहे. या विषयावर शहरात सर्वदूर चर्चा झडत होत्या. तरीही सारे काही नियमाप्रमाणेच झाले आहे, चौकटीतच झाले आहे, पारदर्शकप्रमाणेच झाले आहे, असे भरभक्कम समर्थन करीत संबंधितांनी वेळ मारून नेली. महापालिकेच्या आयुक्तपदी मनीषा खत्री यांची नियुक्ती झाल्यावर या प्रकरणाची सविस्तर चौकशी करण्याच्या मागणीने जोर धरला. प्रहार जनशक्ती पक्ष, नाशिक शाखेनेही वेळोवेळी पाठपुरावा करून महिला प्रशिक्षण कार्यक्रमाची चौकशी करण्याची मागणी केली होती. आयुक्त मनीषा खत्री यांनी या प्रकरणाची सविस्तर व सखोलपणे चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याचा शब्दही दिला होता; पण त्यांनी तो शब्द पाळला नाही. महिला प्रशिक्षणाचा हा कार्यक्रम कितीही स्तुत्य असला तरी टक्केवारीच्यात गर्तेत अडकल्याने तो गैरप्रकरणाच्या रांगेत अग्रणी जाऊन बसला आहे. महापालिकेच्या महिला व बालकल्याण विभागातील संबंधितांपासून तर त्यावर नियंत्रण ठेवणाऱ्या घटकांपर्यंत साऱ्यांकडेच संशयाची सुई फिरते. या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कडक शास्ती करावी, अशी मागणी होत आहे.

**बच्चू कडू याप्रकरणी जाब विचारणार**



महिला प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्याचे दायित्व स्वीकारलेल्या संबंधित संस्थेच्या एकूणच कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित झालेले आहे. याबाबत मनपा आयक्तांकडून अद्याप काहीच कारवाई होत नसल्यानेही प्रहार पक्षाचे प्रमुख बच्चू कडू यांना महापालिकेत पाचारण करून महिला प्रशिक्षण कार्यक्रमातील गैरकारभार तथा घोटाळा उघडकीस आणू.

**- अनिल कोंडाजी भडांगे**
नाशिक जिल्हाप्रमुख, प्रहार जनशक्ती पक्ष

## वडांगळीत दावल मलिक बाबांचा संदल उत्सव साजरा



**सिन्नर ।** वडांगळी (ता. सिन्नर) येथे सालाबाद प्रमाणे या वर्षी सुद्धा दावल मलिक बाबांचा संदल आयोजित करण्यात आला.

इंडिया सिक्युरिटी प्रेस मजदूर संघांचे जनरल सेक्रेटरी जगदीश गोडसे, माजी नगरसेवक देवानंद बिरारी, राष्ट्रवादी काँग्रेसचे डॉ. झाकीर शेख, वडांगळीचे सरपंच नानासाहेब खुळे, तंटामुक्तीचे अध्यक्ष सुदेश खुळे, नवनाथ मुरडनर, राजाभाऊ लहांगे, पंचाळ्याचे सरपंच महेश थोरात इत्यादीच्या हस्ते चादर अर्पण करण्यात आली. वैजापूर येथील चाऊस ब्रास बँड आणि मुखेड येथील गुरुमाऊली ब्रास बँड यांच्या प्रमुख उपस्थितीत सजावलेल्या रथातुन भव्य चादर मिरवणूक काढण्यात आली. संध्याकाळी संजय वाघमारे यांच्यातर्फे महाप्रसादाचा कार्यक्रम ठेवण्यात आला होता. गांव आणि परिसरातील असंख्य भाविकांनी महाप्रसादाचा आणि दर्शनाचा लाभ घेतला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संजय वाघमारे, विकास बकरे, मुन्ना शेख, पंकज कुलथे, आवेश शेख, पापामिया शेख, अमन शेख, गणेश कडवे, पप्पू बकरे, सचिन कुलथे, राजू खुळे, राहुल पगार, अल्ताफ शेख, लियाकत शेख, फारूक शेख, जगन वाघमारे, मंगेश देसाई, सिद्धेश कोकाटे यांच्यासह वडांगळी ग्रामस्थांनी विशेष परिश्रम घेतले.

# प्रस्तावित एमआयडीसी पोलिस स्टेशनला तातडीने मान्यता द्यावी

## आ. सीमा हिरे यांचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांना साकडे

**सिडको ।** सिंहस्थ काळात परराज्यांमधून शहरात रोज लाखो भाविक येणार असल्याने शहर आणि परिसरातील प्रशासनावर अधिकचा मोठा भार पडणार असल्याने कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे. यातूनच सिडकोवासियांना दिलासा देण्यासाठी सातपूर आणि अंबड पोलिस ठाण्याचे विभाजन करावे. तसेच प्रस्तावित असलेल्या एमआयडीसी पोलिस स्टेशनला लवकरात लवकर मान्यता देवून इमारत उभारणीकामी निधी उपलब्ध करून देण्याचे साकडे आमदार सीमाताई हिरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना घातले आहे.

पश्चिम विधानसभा मतदार संघात अंबड आणि सातपूर अशा दोन मोठया औद्यागिक वसाहती आहेत.आजमितीस अंबड,सातपूर हे दोन मोठे पोलिस स्टेशन कार्यरत असून या पोलिस ठाण्यांवरील कार्यभार कमी करण्यासाठी गेल्या काही महिन्यांपासून एमआयडीसी पोलिस चौकी कार्यरत केलेली आहे.आजमितीस चौकीवर सक्षम





पोलिस अधिकाऱ्याची नियुक्ती करून चौकीला तात्तपुरते पोलिस स्टेशनचे स्वारूप देण्यात आलेले आहे.सदर चौकीला पोलिस ठाण्याचा अधिकृत दर्जा देवून पोलिस ठाण्याची उभारणी करण्याची मागणी उद्योजकांसह नागरिकांकडून होत आहे.या विषयीचा स्थानिक पोलिस प्रशासनाकडून राज्य शासनासकडे पाठविलेला प्रस्ताव गेल्या काही वर्षांपासून प्रलंबित आहे. आ. सीमा हिरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मंत्रालयात भेट घेत पोलिस ठाण्याच्या मान्यतेसाठी विशेष पत्र दिले.शहरातील इतर पोलिस ठाण्यांच्या हद्दीत घडणाऱ्या गुन्हयांइतकेच गुन्हे एमआयडीसी पोलिस चौकीच्या हद्दीत घडत असल्याचे यावेळी आ.हिरेंनी मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिले. परंतू अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची अपूरी संख्या तसेच इमारतीचा अभाव यामुळे पोलिस प्रभावीपणे काम करू शकत नसल्याची व्यथा आ.हिरेंनी मुख्यमंत्र्यांसमोर मांडली.आगामी सिहंस्थ काळात भाविकांची वाहने याच चौकीच्या हद्दीतून जाणाऱ्या गरवारे -चिंचोळे मार्गे नाशिक -त्र्यंबकेश्वर रस्त्याला जोडली जात असल्याने सिंहस्थ काळात वाहतूक कोंडीची मोठी समस्या भेडसावणार आहे.वाढत्या गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी, भविष्यात उद्भवणाऱ्या वाहतूक कोंडीवर मात करण्यासाठी प्रस्तावित एमआयडीसी पोलिस स्टेशन उभारणीच्या प्रस्तावास तातडीने मंजूरी द्यावी आणि आवश्यक अधिकारी, कर्मचाऱ्यांचे मनुष्यबळ आणि बांधकामासाठी निधी उपलब्ध करून देण्याचे साकडे यावेळी आ.हिरेंनी मुख्यमंत्री फडणवीस यांना घातले आहे.

# नाशिकचे औद्योगिक क्षेत्र विस्तारणार

## आयमा आणि सिपा यांच्यात महत्वपूर्ण सामंजस्य करार




**नाशिक ।** नाशिकच्या औद्योगिक क्षेत्राला आंतरराष्ट्रीय स्तरावर विस्तारण्याची सुवर्णसंधी उपलब्ध झाली आहे. अंबड इंडस्ट्रीज अँड मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन (आयमा) आणि कॅमेरून इन्व्हेस्टमेंट अँड प्रमोशन एजन्सी (CIPA) यांच्यात नुकताच महत्त्वपूर्ण सामंजस्य करार पार पडला. हा करार नाशिकसह संपूर्ण उत्तर महाराष्ट्रातील उद्योजकांसाठी नव्या दिशा उघडणारा ठरणार आहे.

आयमा सभागृहात पार पडलेल्या या विशेष बैठकीत कॅमेरूनचे इन्व्हेस्टमेंट अँड प्रमोशन डायरेक्टर जनरल बोमा डोनट्स, आयमाचे अध्यक्ष ललित बूब, तसेच नाशिकमधील प्रमुख औद्योगिक संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते. या कार्यक्रमाची सुरुवात भारतीय परंपरेनुसार शाल आणि स्मृतिचिन्ह देऊन कॅमेरूनच्या प्रतिनिधींच्या स्वागताने झाली. यावेळी कॅमेरूनमधील उद्योग, गुंतवणूक आणि व्यापाराच्या संधींबाबत माहितीपर चित्रफीत दाखवण्यात आली. त्यानंतर बोमा डोनट्स आणि ललित बूब यांनी परस्पर सहकार्याचा करार स्वाक्षरीसह पूर्ण केला. या प्रसंगी भारतातील कॅमेरून उच्चायुक्तालयातील हर एक्सलन्सी श्रीमती साईलव्ही मिशेल, कॅमेरून बोर्डचे अध्यक्ष डॉ. डायन, गुंतवणूक संचालक इमॅन्युअल, निमा अध्यक्ष आशिष नहार, लघुउद्योग भारतीचे निखिल तापडिया, सीआयआयचे रमेश शाळीग्राम, आयमाचे हर्षद बेळे आदी मान्यवर उपस्थित होते. बोमा डोनट्स यांनी आपल्या भाषणात सांगितले की, "कॅमेरूनमध्ये पायाभूत सुविधा, कृषी प्रक्रिया, सौरऊर्जा, आरोग्य आणि शिक्षण क्षेत्रात गुंतवणुकीसाठी भरपूर संधी आहेत. तसंच, कॅमेरून गुंतवणूकदारांसाठी १० वर्षांसाठी करसवलतींसह अनेक आकर्षक योजना देते. नाशिक आणि कॅमेरूनच्या हवामानात साम्य असल्यामुळे येथे उद्योग उभारणे सोपे व फायदेशीर ठरेल." कॅमेरूनमध्ये गुंतवणूक करणाऱ्यांसाठी शासन स्तरावर सवलती मिळवून देण्याची जबाबदारी आम्ही पार पाडू. आम्ही नाशिकच्या उद्योजकांचे स्वागत करू."असा विश्वास कॅमरून चे बोमा डोनट्स यांनी व्यक्त केले. आयमा नाशिकच्या उद्योजकांना जागतिक व्यासपीठावर पोहोचवण्यासाठी कटिबद्ध आहे. कॅमेरूनमध्ये उद्योग स्थापण्यासाठी आम्ही सर्वतोपरी सहकार्य करू. तसेच, कॅमेरूनमधील उद्योजकांनीही नाशिकमध्ये गुंतवणूक करावी, असे आवाहन "ललित बूब यांनी केले. सुमारे १७ सदस्यीय कॅमेरून प्रतिनिधी मंडळाने नाशिकच्या औद्योगिक क्षमतेचा आढावा घेतला. या चर्चासत्रात दोन्ही देशांमधील धोरणात्मक गुंतवणूक, सहकार्याच्या संधी आणि व्यापारी भागीदारी याबाबत मुद्देसूद चर्चा झाली. मंचावर वेदांत राठी, राजेंद्र वडनेरे, मनिष रावल, राहुल गांगुर्डे, रवींद्र झोपे यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते. सूत्रसंचालन जगदीश पाटील यांनी केले.या ऐतिहासिक करारामुळे नाशिकच्या उद्योगविश्वाला आंतरराष्ट्रीय स्तरावर नवे क्षितिज खुले झाले असून, कॅमेरूनसारख्या उभरत्या अर्थव्यवस्थेत नाशिकच्या उद्योजकांना अनंत संधी उपलब्ध होतील, असा विश्वास या बैठकीत व्यक्त करण्यात आला. यामुळे भविष्यात दोन्ही देशांमधील आर्थिक सहकार्य आणखी बळकट होईल, हे निश्चित.

**महाराष्ट्र शासन**
**सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था सिन्नर**
**पत्ता- श्री. सिन्नर व्यापारी सहकारी बँक (अवसायक) इमारत, सिन्नर ता. सिन्नर जि. नाशिक**

## जाहीर समन्स

**वादी : लोकनेते शंकरराव बाळाजी वाजे ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या., डुबेरे, ता सिन्नर, जि नाशिक** यांनी मा. सहा. निबंधक सहकारी संस्था, सिन्नर या कार्यालयाकडे संस्थेच्या थकबाकीदार व त्यांचे जामीनदार यांच्या विरुद्ध महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये वसुली प्रमाणपत्रे मिळवण्यासाठी दि.११/०३/२०२५ रोजी दावे दाखल केलेले आहेत या सर्व थकबाकी व त्यांचे जामीनदार यांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी संधी देऊन दि.२७/०३/२०२५, १७/०४/२०२५ रोजी मासहा. निबंधक सह. संस्था, सिन्नर पत्ता-श्री. सिन्नर व्यापारी सहकारी बँक (अवसायक) इमारत, सिन्नर ता. सिन्नर जि. नाशिक या कार्यालयात सुनावणीसाठी बोलावण्यात आले होते. परंतु खालील कर्जदार/जमीनदार यांना सुनावणी नोटीस दिलेल्या पत्यावर आर. पी.डी द्वारे पाठवूनही ते सुनावणीसाठी हजर राहिलेले नाहीत. तरी त्यांना शेवटची संधी देऊन त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी मा. सहा. निबंधक, सह, संस्था, सिन्नर, पत्ता- श्री. सिन्नर व्यापारी सहकारी बँक (अवसायक) इमारत, सिन्नर ता. सिन्नर जि. नाशिक या कार्यालयात दि.२९/०४/२०२५ वार- मंगळवार रोजी दुपारी ०१.०० वाजता सुनावणीसाठी बोलाविण्यात येत आहे. तरी ते याहीवेळी सुनावणीस गैरहजर राहिल्यास सदरील दाव्याबाबत यांचे काहीही म्हणणे नाही, असे गृहीत धरून त्यांचे विरुद्ध वसुली प्रमाणपत्र बाबतचा दावा निकाली काढण्यास येतील याची नोंद घ्यावी.

**प्रतिवादी :**

| अ. क्र. | कर्जदार/जामीनदारांचे नाव | कर्जदार/जामीनदार पत्ता | दावा क्रमांक | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|
| १) | **कर्जदार :** नंदकिशोर शरद चव्हाण<br>**जामीनदार**- संकेत कैलास वाजे<br>**जामीनदार**- गगन देवनदास केशवाणी | माधव पार्क, शांतानगर, सरदवाडीरोड, सिन्नर<br>मु.पो. डुबेरे, ता. सिन्नर<br>वाजे पेट्रोल पंप, सिन्नर | २९३/२०२४-२५ | ३,०६,०८८/- |
| २) | **कर्जदार :** दत्तू काशिनाथ हारक<br>**जामीनदार**- योगेश पंढरीनाथ हारक<br>**जामीनदार**- विठ्ठल पोपट हारक | मु.पो. शिवडे, ता. सिन्नर.<br>मु.पो. शिवडे, ता. सिन्नर.<br>मु.पो. शिवडे, ता. सिन्नर. | २९७/२०२४-२५ | १,७१,५६१/- |
| ३) | **कर्जदार :** रविंद्र बाळू हारक<br>**जामीनदार**- मुरलीधर रामजी हारक<br>**जामीनदार**- पुंजाराम वसंत हारक | मु.पो. शिवडे, ता. सिन्नर.<br>मु.पो. शिवडे, ता. सिन्नर.<br>मु.पो. शिवडे, ता. सिन्नर. | ३००/२०२४-२५ | ५,६७,११४/- |
| ४) | **कर्जदार :** दिलीप केरू हांडोरे<br>**जामीनदार**- जगन्नाथ रेवजी आरोटे<br>**जामीनदार**- रविंद्र भाऊराव तांबे | मु. श्रीरामपूर, पो. पंचाळे, ता. सिन्नर<br>मु. महाजनपूर, पो. दहीवाडी, ता. सिन्नर<br>मु.पो. गोंदे, ता. सिन्नर | २९५/२०२४-२५ | ८,८५,३३३/- |
| ५) | **कर्जदार :** जालिंदर भास्कर हांडोरे<br>**जामीनदार**- दिपक अशोक सोनवणे<br>**जामीनदार**- नितीन ज्ञानदेव नरोडे | मु. श्रीरामपूर, पो. पंचाळे, ता. सिन्नर<br>मु. कुंदेवाडी, पो. मुसळगाव, ता. सिन्नर<br>मु. पतळेवाडी (रामपूर), ता. सिन्नर | २९४/२०२४-२५ | ३,९७,२६६/- |
| ६) | **कर्जदार :** नंदू त्र्यंबक खोळंबे<br>**जामीनदार**- विठ्ठल केरूजी सोनवणे<br>**जामीनदार**- भाऊसाहेब किसन अनवट | मु.पो. मनेगाव, ता. सिन्नर<br>मु.पो. मनेगाव, ता. सिन्नर<br>अनवट मळा, बारागाव पिंप्री रोड, सिन्नर | २९६/२०२४-२५ | ४,८१,३४०/- |
| ७) | **कर्जदार :** परशराम किसन तांबे<br>**जामीनदार**- कमल परशराम तांबे<br>**जामीनदार**- सूर्यभान सजन शिंदे | मु.पो. गोंदे, ता. सिन्नर<br>मु.पो. गोंदे, ता. सिन्नर<br>मु.पो. गोंदे, ता. सिन्नर | २९८/२०२४-२५ | १४,५९,१८४/- |
| ८) | **कर्जदार :** विष्णू माधव काकड<br>**जामीनदार**- संतोष बाळकृष्ण सालमुठे<br>**जामीनदार**- अशोक त्र्यंबक गरगटे | नाशिक वेस, सिन्नर<br>नाशिक वेस, सिन्नर<br>नाशिक वेस, सिन्नर | २९९/२०२४-२५ | ४,९५,५७९/- |

दि.१७/०४/२०२५.

सही/- **(संजय गिते)**
**मा. सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, सिन्नर,**
**ता. सिन्नर, जि. नाशिक.**

# भूदान चळवळ



भूदान चळवळ (जमीन भेट चळवळ), ज्याला रक्तहीन क्रांती म्हणूनही ओळखले जाते, ही भारतातील एक स्वयंसेवी जमीन सुधारणा चळवळ होती. गांधीवादी विनोबा भावे यांनी आजच्याच दिवशी म्हणजे १८ एप्रिल १९५१ रोजी पोचमपल्ली गावात सुरुवात केली. भूदान चळवळीने श्रीमंत जमीनदारांना त्यांच्या जमिनीचा काही भाग स्वेच्छेने भूमिहीन लोकांना देण्यास प्रवृत्त करण्याचा प्रयत्न केला. भावे यांनी सर्वोदय चळवळ आणि ग्राम स्वराज्यातून तात्विक प्रेरणा घेतली.

--------------------

भूमिहीन मजुरांना लहान भूखंड देण्यात आले होते ज्यावर ते स्थायिक होऊ शकतील आणि त्यांची पिके घेऊ शकतील. हा कायदा अशा प्रकारे पारित करण्यात आला की लाभार्थ्याला जमीन विकण्याचा किंवा ती बिगर-कृषी कारणांसाठी किंवा वनीकरणासाठी वापरण्याचा अधिकार नव्हता. उदाहरणार्थ, महाराष्ट्र राज्य भूदान कायद्याच्या कलम २५ मध्ये असे म्हटले आहे की लाभार्थ्याने (जो भूमिहीन असावा) फक्त उदरनिर्वाह शेतीसाठी जमीन वापरावी. जर मालकाने एक वर्षापेक्षा जास्त काळ जमीन कसली नाही किंवा ती बिगर-कृषी कामांसाठी वापरण्याचा प्रयत्न केला तर सरकारला ती जप्त करण्याचा अधिकार असेल.

भावे यांना शेतकऱ्यांनी शेतीसाठी बैल, ट्रॅक्टर किंवा इतर यंत्रांचा वापर सोडून द्यावा अशी इच्छा होती. हिंदीमध्ये याला ऋषी-खेती म्हणतात. भावे यांना लोकांनी कांचन-दानाच्या स्वरूपात पैशाचा वापर सोडून द्यावा अशीही इच्छा होती. या चळवळीला काँग्रेसचा पाठिंबा होता . १९५३ मध्ये भूदान चळवळीत सामील होण्यासाठी जे.पी. नारायण यांनी सक्रिय राजकारणातून माघार घेतली.

भावे यांनी जमीन मालकांना त्यांच्या जमिनीचा एक तुकडा देण्यास भाग पाडण्यासाठी पायी भारत पादाक्रांत केला. त्यांना पहिले यश १८ एप्रिल १९५१ रोजी आंध्र प्रदेशातील नलगोंडा जिल्ह्यातील पोचमपल्ली गावात मिळाले (आता तेलंगणा) जे कम्युनिस्ट चळवळीचे केंद्र होते. ते तेलंगणा शेतकरी चळवळीचे कळस होते. स्थानिक जमीनदारांविरुद्ध शेतकऱ्यांनी हिंसक संघर्ष सुरू केला होता.

चळवळीच्या आयोजकांनी भावे यांची पोचमपल्ली येथे राहण्याची व्यवस्था केली होती, जिथे सुमारे ७०० कुटुंबे राहतात, त्यापैकी दोन तृतीयांश कुटुंबे भूमिहीन होती. भावे यांनी हरिजन वसाहतीला भेट दिली. दुपारपर्यंत गावकरी त्यांच्याभोवती जमू लागले. हरिजनांनी चाळीस कुटुंबांसाठी ८० एकर (३२ हेक्टर) जमीन, चाळीस ओली, चाळीस कोरडी अशी मागितली. भावे यांनी विचारले, जर सरकारकडून जमीन मिळवणे शक्य नसेल, तर गावकरी स्वतः काही करू शकत नाहीत का?

व्ही. रामचंद्र रेड्डी यांनी सुरुवातीला त्यांच्या ३,५०० एकर (१४ किमी २ ) जमिनीपैकी १०० एकर (४० हेक्टर) जमीन दान केली. नंतर, त्यांनी ८०० एकर दान केली. ते सामाजिक सुधारणांमध्ये सामील झाले. त्यांच्यानंतर, त्यांच्या मुलांच्या मदतीने भूदान ट्रस्ट चळवळीअंतर्गत जमीन दान चळवळ चालू राहिली. हैदराबादचे ७ वे निजाम मीर उस्मान अली खान यांनीही त्यांची १४,००० एकर वैयक्तिक जमीन भूदान चळवळीला दान केली.

राजा बहादूर गिरिवार नारायण सिंह, सीबीई आणि रांका (गढवा झारखंड) येथील राजा यांच्यासह इतर जमीन मालकांनी भूदान उपक्रमासाठी एकत्रित १०२,००१ एकर (४१२.७८ किमी २ ) एकर जमीन दान केली, जी भारतातील सर्वात मोठी देणगी आहे. नमुदग इस्टेटचे राजा बहादूर यांनीही भूदान उपक्रमासाठी १.०१ लाख एकर जमीन दान केली.

रामगढ राजचे महाराजा कामाख्या नारायण सिंह बहादूर यांनी २ लाख एकर जमीन विनोबा भावे आणि इतरांना बिहार भूदान यज्ञ कायद्यांतर्गत, खटल्याच्या संस्थेच्या आधी दान केली, जी कोणत्याही राजाची सर्वात मोठी देणगी ठरली. दरभंगा राजचे महाराजाधिराज कामेश्वर सिंह जी यांनी भूदान चळवळीत १.१७ लाख एकर जमीन दान केली.

विनोबा भावे यांच्या सूरजगड भेटीदरम्यान, त्यांचे स्वागत मुख्याध्यापक रामबिलास शर्मा यांनी केले, ज्यांनी १९५० च्या दशकाच्या उत्तरार्धात आणि १९६० च्या दशकाच्या सुरुवातीला झुनझुनू जिल्ह्यात भूदान चळवळीचा प्रसार करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली होती.

या चळवळीचा प्रारंभिक उद्देश स्वेच्छेने देणग्या मिळवणे आणि भूमिहीनांना वाटणे हा होता परंतु लवकरच सर्व खाजगी जमिनीच्या १/६ भागाची मागणी करण्यात आली. १९५२ मध्ये, चळवळीने ग्रामदान (भेट म्हणून दिलेले गाव किंवा संपूर्ण गावाचे दान) ही संकल्पना व्यापक केली आणि जमिनीच्या सामान्य मालकीचा पुरस्कार करण्यास सुरुवात केली. ग्रामदान अंतर्गत येणारे पहिले गाव उत्तर प्रदेशातील हमीरपूर जिल्ह्यातील मंगरोथ होते . दुसरे आणि तिसरे ग्रामदान १९५५ मध्ये ओरिसामध्ये झाले.

ही चळवळ गावदान किंवा ग्रामदान चळवळीत विकसित झाली आणि भारतात आणि भारतात दोन्ही ठिकाणी सर्वोदय समाज (सर्व सामाजिक-आर्थिक-राजकीय व्यवस्थेचा उदय) स्थापन करण्याच्या व्यापक चळवळीचा एक भाग होती.

१९६० च्या दशकापर्यंत, चळवळीने गती गमावली होती. सर्वोदय समाज सामाजिक परिवर्तनासाठी दबाव निर्माण करणारी जनआंदोलन उभारण्यात अपयशी ठरला. तथापि, नैतिक द्विधा मनःस्थिती निर्माण करून, जमीनदारांवर दबाव आणून आणि भूमिहीनांना अनुकूल परिस्थिती निर्माण करून या चळवळीने महत्त्वपूर्ण योगदान दिले.

■ ■ ■

# बुलडोझर चालविणे म्हणजे बहादुरकी नव्हे



उत्तरप्रदेशच्या प्रयागराज विकास प्राधिकरणाने केलेली बुलडोझर कारवाई अमानवी, बेकायदेशीर आणि मानवी हक्कांना बाधा पोहोचविणारी आहे. कारवाईमुळे आपला विवेक डळमळीत झाला असून प्रशासनाने सहा आठवड्याच्या आत प्रत्येकाला १० लाखांची भरपाई द्यावी असा आदेश सर्वोच्च न्यायालयाने १ एप्रिलला दिला.

न्या. अभय एस. ओक आणि न्या. उज्वल भुयान यांच्या न्यायालयाने कारवाईवर सुनावणी करताना म्हटले की, देशातील लोकांची निवासी घरे अशा प्रकारे पाडता येत नाही.आम्ही हे संपूर्ण प्रकरण बेकायदेशीर म्हणून नोंदवत आहोत.देशातील कोणतीही सरकार असो फक्त बुलडोझरची कारवाई केल्याने किंवा चालविल्याणे कोणीही मोठ होत नाही किंवा कोणतेही समाधान निघत नाही किंवा बुध्दीमान होत नाही किंवा बहादुर होत नाही. माणूस हा बुध्दीजीवीप्राणी आहे त्यामुळे आपल्या बुद्धीचा वापर विचारपूर्वक, जाणिवपूर्वक व योग्य व्हायला पाहिजे आणि त्याचा गैरवापर होऊ नये याकडेही तेवढेच तिक्ष्ण लक्ष देणे गरजेचे आहे. याचे जिवंत उदाहरण आपण प्रयागराजमध्ये पाहीले. ही बुलडोझरची घटना अंगावर शहारे आणणारी व १४० कोटी जनतेला स्तब्ध करणारी दिसून आली. या कारवाईत माणुसकीच्या संपूर्ण सिमा ओलांडल्याचे दिसून आले. उत्तर प्रदेशात झोपडपट्टीवरील बुलडोझर कारवाई दरम्यान पुस्तके छातीशी कवटाळून धावत घराबाहेर पडणाऱ्या शाळकरी मुलीचा व्हिडिओ पाहून सर्वांनाच धक्का बसला आहे, असे सर्वोच्च न्यायालयाने नमूद केले.

प्रयागराजमधील कारवाई प्रकरणी सुनावणी करतांना न्यायालयाने समाजमाध्यमांवर मोठ्या प्रमाणात व्हायरल झालेल्या आंबेडकर नगरमधील जलालपूरा येथील झोपडपट्टीवरील कारवाईच्या या व्हिडिओची दखल घेतल्याने हे अमानवी कृत्य लक्षात आले. प्रयागराज विकास प्राधिकरणाने पाडकामाची कारवाई अमानवी पध्दतीने केली, असे निरीक्षण न्यायमूर्ती अभय ओक आणि उज्ज्वल भुयान यांच्या खंडपीठाने नोंदवले. आपल्या देशात कायद्याचे राज्य आहे आणि नागरिकांची निवासस्थाने अशा प्रकारे पाडली जाऊ शकत नाहीत असेही सर्वोच्च न्यायालयाने सुनावले.

कोणतीही कारवाई असो त्याचा सखोल अभ्यास करूनच केली पाहिजे. देशातील राज्य सरकारांना वाटत असेल की ज्या-ज्या ठिकाणी अवैधरित्या झोपडपट्ट्या वसलेल्या आहेत. त्या-त्या ठिकाणची संपूर्ण शहानिशा सरकारने करावी व संपूर्ण झोपडपट्टी वासियांसाठी सर्वप्रथम राहण्याची व्यवस्था करावी जेणेकरून उत्तरप्रदेशातील घटनेचा पुनरावृत्ती होणार नाही. याचीही काळजी संपूर्ण राज्य सरकारांनी घेणे गरजेचे आहे. राज्य सरकारांनी देशातील बाहुबली समजणाऱ्या राजकीय पुढाऱ्यांच्या घरावर बुलडोझर अवश्य चालविला पाहिजे. धक्कादायक बाब म्हणजे २५१ खासदारांवर गुन्हेगारी खटले दाखल आहेत, तरीही ते स्वतःला लोकप्रतिनिधी म्हणतात. असोसिएशन ऑफ डेमोक्रॅटिक रिफॉर्म्सच्या (एडीआर) अहवालात असे दिसून आले की देशातील ४५ टक्के आमदारांवर गुन्हेगारी खटले दाखल आहेत ही धक्कादायक बाब समोर आली आहे. अशाप्रकारे आजी-माजी आमदार-खासदारांवर जर गुन्हेगारी खटले असतील व त्यांच्याजवळ करोडोंची संपत्ती असेल तर देश कंगाल होणार नाही तर काय?

आज देशातील ८० टक्के आजी-माजी आमदार-खासदार-मंत्री यांच्या जवळ करोडोंची चल-अचल संपत्ती आहे. सोबतच खंडणी वसूलीसाठी अनेक आका सुध्दा यांनी पोसुन ठेवले आहेत. आज आपण यांचा विचार केला तर देशातील ८० टक्के मुठभर राजकीय पुढाऱ्यांजवळ करोडो रुपयांची चल-अचल संपत्ती आहे ही संपत्ती देशाच्या १४० कोटी जनतेला ५ वर्षे पुरेल इतकी आहे. परंतु कायदे-कानुन बनविणारे हेच असल्याने यांच्यावर कठोर कारवाई होत नाही किंवा बुलडोझर सुध्दा चालत नाही ही स्वतंत्र भारताची शोकांतिका आहे.न्या.अभय ओक व न्या.उज्वल भुयान यांच्या न्यायपीठाने सांगितले की घटनेच्या कलम-२१ नुसार निवाऱ्याचा मूलभूत अधिकार आहे. नागरिकांची घरे अशा प्रकारे पाडली जाऊ शकत नाहीत. म्हणजेच अन्न,वस्त्र आणि निवारा आवश्यक आहे.यातील निवारा किती महत्त्वाचा आहे ही बाब प्रयागराजच्या घटनेवरून लक्षात येते.देशातील राज्य सरकारांना खरोखरच बुलडोझर कारवाई करायची असेल तर माफिया राज चालविणाऱ्यांवर करावी, खंडणी वसूल करणाऱ्यांवर व त्यांना खतपाणी घालणाऱ्या राजकीय पुढाऱ्यांवर करावी, भ्रष्टाचाऱ्यांवर करावी, भ्रष्ट अधिकाऱ्यांवर करावी. याचे स्वागत देशातील तळागाळातील संपूर्ण लोक करतील. गरीब व सर्वसामान्यांनजवळ रहाण्यापुरते फक्त स्वतःचे घर असते किंवा किरायाने रहातात किंवा झोपडीत रहातात.

यांच्या तुलनेत राजकीय पुढारी, भ्रष्टाचारी यांचा विचार केला तर गरीब व सर्वसामान्य व्यक्ती शुन्य असल्याचे दिसून येते. कोणतीही बुलडोझर कारवाई करतांना सामाजिक बांधिलकी ठेवून करावी जेणेकरून कोणाचेही घर हिसकावल्या जाणार नाही किंवा कोणी उघड्यावर कोणी येणार नाही याची काळजी अवश्य घ्यावी. कारण निवाऱ्याचा मूलभूत अधिकार सर्वांनाच आहे हेही लक्षात घेतले पाहिजे.

■ ■



**रमेश कृष्णराव लांजेवार**
**स्वतंत्र पत्रकार, नागपूर.**
**९९२१६९०७७९**

# डालडा

हार्टांग्ज कंपनीने १९२६ साली डालडा ह्या नावाची मक्तेदारी घेतली. अस्तित्वात आल्यापासून पाच वर्षांच्या आत शिवडीच्या फॅक्टरीत डालडा बनायला सुरुवात झाली. १९३७ साली प्रकाश टंडन नावाच्या एका भारतीयाला बोर्डावर घेऊन लिव्हरनी आपले हेतू स्पष्ट केले आणि त्यानंतर हिंदुस्थान लिव्हरच्या अश्वमेधाचा घोडा अडवायला कुणीच धजावलं नाही. स्वैंपाकघरात एकदा डालडा आला आणि नंतर कायमचा तेथेच राहिला.

डालडा या नावाचा एक वेगळाच किस्सा आहे. सुरुवातीला हे वनस्पती तूप भारतात आयात केलं जायचं ह्यडाडा अँड कंपनीह्नमार्फत. लिव्हरला स्वतःचा मालकी हक्क दाखवायचा होता. मग त्यात तडजोड म्हणून एल जोडून डालडा नाव तयार झालं.

डालडा म्हटल्यावर नाक मुरडणारी माणसं रांगेत उभं राहून डालडा आणायला लागली. तसं आपल्याकडे डालडा काही नवीन नव्हतं. पण त्याला स्वैंपाकघरात मान्यता नव्हती. पण नंतर हळुहळू तेल किंवा तूप म्हणजे वनस्पती तूप मिळणे, हेच परमोच्च भाग्याचे लक्षण आहे; हे कळल्यावर असल्या शंका मनात येणेच बंद झाले.

स्वैंपाकघरात एकदा डालडा आला आणि नंतर कायमचा तेथेच राहिला. याचे श्रेय जाते हिंदुस्थान लिव्हरच्या चिवट मार्केटिंगला. सुरुवातीला हातगाडीवर स्टोव्ह आणि कढईचा संसार मांडून एक माणूस डालड्यात पुऱ्या तळून दाखवायचा आणि जमलेल्या गर्दीला आग्रहाने खायला घालायचा. त्यानंतर डालड्यात बनवायच्या पाककृतींचं पुस्तकं पण आलं.

डालडा म्हणजे काय तर हायड्रोजिनेटेड तेल. तेलापासून बनवलेलं तूप. म्हणून वनस्पती तूप. दिसायला




साजूक तुपासारखं. रंगाने आकर्षक आणि चवीने एकदम बुद्दू. साधारण तेलाच्या रेणू शृंखलेतल्या रिकाम्या शिटा हायड्रोजनच्या रेणूंनी भरून काढल्या की झालं वनस्पती तूप तयार. पॅलॅडीयम नावाच्या एका धातूच्या मदतीने हे स्थित्यंतर सहजशक्य होते. कारण आकारमानाच्या नऊशे पट हायड्रोजनचे रेणू वाहून नेण्याची क्षमता या धातूत आहे.

हायड्रोजिनेशन केल्यावर तेलाचं जे काही होतं त्याला म्हणायचं वनस्पती तूप. त्यात थोडासा बदल करून- जीवनसत्त्वाची भर घालून हिंदुस्थान वनस्पती मॅन्युफॅक्चरिंग कंपनीने पहिल्यांदा डालडा भारतात आणला. नंतर या कंपनीचं नाव हिंदुस्तान युनिरलिव्हर झालं.

१९६५-१९७१ ची दोन युद्धं झाली. सत्तर, एकाहत्तर, बहात्तरची वर्षे लागोपाठ अवर्षणाची गेली आणि डालडा पण काळ्या बाजारात गेलं. लोकसभेत डालडाच्या वाढत्या भावावर आणि दुर्भिक्षावर अनेक चर्चा झडल्या आणि डालडा रेशन कार्डावर मिळायला लागलं. राहणीमान बेचव झालं, पण तगून राहण्याची गरज त्यापेक्षा मोठी होती.

दादर स्टेशनला उतरल्यावर सामंतांच्या दुकानातल्या काचबंद पेटीतल्या लोण्याच्या प्रचंड आकारमानाच्या गोळ्याकडे बघून सुस्कारा सोडून लोक पुढे निघून जाताना बघितली आहेत. खानदेश-कोइंबत्तूर-बेळगाव ही लोण्याची घराणी आजही कसाबसा जीव तगवून उभी आहेत.

डालडाच्या स्पर्धेत अनेक नवीन ब्रॅण्ड आले आहेत. पत्र्याच्या डब्यातलं डालडा प्लॅस्टिकच्या पिशवीत मिळायला लागलं. नव्वदीच्या नंतर हेल्थकॉन्शस पिढी मिळवती झाली आणि नव्या मध्यमवर्गीय कुटुंबात डालडाची गरज संपली. कधी न ऐकलेल्या तेलबियांचं तेल घरात आलं. डालडाने पण डालडा ॲक्टिव्ह या नावाखाली पुन्हा एकदा स्वैंपाकघर काबीज करण्याचा प्रयत्न केला, पण तोपर्यंत नव्या सुनांनी आणि नव्या तेलांनी जम बसवला होता. या नव्या तेलाची जाहिरात करणाऱ्या कमनीय बाया कदाचित लिव्हर कंपनीला मिळाल्या नसतील. काही वर्षांपूर्वी लिव्हरनी डालडा ब्रॅण्ड विकून टाकला.

पामच्या झाडाचं चित्र असलेला डालडाचा पिवळा डबा हे कधीच न विसरता येणारे मार्केटिंग आयकॉन आहे आणि डालडाच्या रिकाम्या डब्यात रुजलेले तुळशीच्या रोपट्याचे चित्र म्हणजे आपल्या सामाजिक राहणीमानाच्या स्थित्यंतरात कसाबसा जीव धरून राहिलेल्या संस्कृतीचं आयकॉन आहे.

■ ■ ■

# शिक्षण कसे हवे?

वैधानिक दृष्टीने चारित्र्यनिर्मितीचे शिक्षण, त्यातून जीवननिर्मिती व मानवनिर्मिती, अन् त्यानुसारच विचारांची एकरूपता या पाच गोष्टींचे आजच्या विद्यार्थ्यांना शिक्षण मिळाल्यास अन् त्यांचे पालन विद्यार्थ्यांनी, शिक्षकांनी व पालकांनी केल्यास माणूस आदर्श होवु शकतो !

हल्लीचे शिक्षण म्हणजे विद्यार्थ्यांच्या डोक्यात कोंबलेली केवळ माहिती आहे, असे म्हणावयास हरकत नाही. आणि ही डोक्यात शिरलेली माहिती न पचल्यामुळे काहींच्या बाबतीत तर आपल्याला त्यांच्या सर्व जीवनभर गोंधळ उडत असलेला दिसून येतो.

असे होवु नये, असे आपल्याला वाटत असेल तर,जीवननिर्मिती, मानवनिर्मिती आणि चारित्र्ययांची निर्मिती करणारे आणि त्यानुसार विचार एकजीव करणारे शिक्षण हवे आहे. विद्यार्थ्यांनी केवळ हे पाच विचार पचवले आणि आपल्या जीवनात त्यांचे पालन केले, तर तुम्ही ईतर कुठल्याही व्यक्ती पेक्षा जास्त शिक्षित असाल. यात शंका नाही. हेच शिक्षण हे आजच्या विद्यार्थ्यांच्या व पुढे राष्ट्राच्या आदर्शांना धरून असेल यातही तीळमात्र शंका नाहीत.

बरेच शिक्षकांच्या म्हणण्यानुसार, आजचा तरुण विद्यार्थी हा विनाशकारी होत चालला आहे. त्याला त्या दुष्प्रवृत्तीपासून परावृत्त करण्याकरता जगभरातील शिक्षणतज्ञांनी मूल्यशिक्षणावर (value education) अधिष्ठीत अभ्यासक्रम सुरू व्हावा असे सांगितले आहे.

त्यांच्यानुसार मूल्यशिक्षणामुळे विद्यार्थ्यांमधील आसुरी प्रवृत्तींचा नाश होऊन तो आदर्श नागरिक होईल, असा या शिक्षण शास्त्रज्ञांचा दावा आहे.

या दृष्टीने विचार केल्यास, भारतात जे जे क्रांतीकारक झाले, जे संत झाले, जे देशभक्त स्वातंत्र्यासाठी लढले आणि त्यासाठी हुतात्मा झाले, जे शास्त्रज्ञ झाले, जे समाजाच्या उन्नतीसाठीच जगले, ज्यांनी समाजाच्या उत्थानासाठी संघटना निर्माण करण्यास आपले जीवन वाहिले, त्या सर्वांचे पूर्ण चरित्र हे तरुण पिढीला, लहान मुलांना अभ्यासासाठी ठेवले पाहिजेत. यांच्या कथा तरुणांसमोर आल्या पाहिजेत. तरच भावी पिढीला भविष्याचे जीवन आदर्श मिळू शकेल.

आपले जीवन हे शुद्ध आचरणाचे, प्रामाणिक, पारदर्शी तसेच कष्ट आणि मेहनत करणारे अन् देशभक्तीपूर्ण असावे.त्यामुळे देशासाठी जगणे आणि मरणे, याची प्रेरणा मिळेल, असेच शिक्षण हवे, तरच देश वैभवशाली होईल.

त्यासाठीच आपल्याला चारित्र्यसंपन्न तरुण पिढी निर्माण करणे गरजेचे आहे.आणि त्यासाठी सत्य, प्रामाणिकपणा असलेले शिक्षण हवेत. आज देशातील आतंकवाद, भ्रष्टाचार, महागाई, लोकसंख्या विस्फोट, बेरोजगारी, पर्यावरण, पाणीटंचाई सारखे प्रश्न उद्या अराजक निर्माण करतील. त्याला चारित्र्य निर्माण करणारे शिक्षण हेच उत्तर आहे.

**उच्चशिक्षित असण्यापेक्षा सुसंस्कारांचे शिक्षण महत्त्वाचे**

सध्याची मुले आणि तरुण यांना हॅरी पॉटर वाचून संस्कारीत पिढी निर्माण होणार असे आपल्याला वाटत असेल तर कुठेतरी आपणच चुकीच्या विचार पद्धतीला घेवून पुढे जात तर नाही ना! हा प्रश्न प्रत्येकानी स्वतःला विचारण्यासारखा आहे. आणि त्या मिळालेल्या उत्तरातच जीवन आदर्श शोधण्यासारखे सुद्धा आहे.

■ ■ ■



**प्रफुल्ल क. दाते**

## नाथ संप्रदायाचे आद्यनाथः श्री मच्छिंद्रनाथ

नाथ संप्रदाय हा भारतातला शैव संप्रदाय आहे. नाथ संप्रदायांचा काळ हा दहाव्या ते बाराव्या शतकाच्या आसपासचा आहे .बरेच संशोधक हा काळ वेगवेगळा समजतात. नाथ शब्दाचा अर्थ रक्षण करता किंवा स्वामी असा होतो. आदिनाथ म्हणजे शिव, महादेवापासून याचा उगम झाला म्हणून त्याला नाथ संप्रदाय नाव मिळाले.

या नाथ संप्रदायाची व्याप्ती संपूर्ण भारतभर आहे. नवनारायणांनी नवनाथांच्या रूपात अवतार घेतला. कवी नारायण यांनी माशाच्या ( मच्छी) पोटी जन्म घेतला. त्यामुळे धमार्चा उदय होईल ,लोक न्यायाने आणि सत्याने राहतील यासाठी हा अवतार होता. नाथ संप्रदायाची स्थापना मच्छिंद्रनाथांनी केली आणि गोरक्षनाथांनी ती पुढे वाढवत नेली.. नवनाथांची दीक्षा घेतलेल्या व्यक्तीला आपल्या नावासमोर नाथ शब्द लावता येतो. नवनाथ म्हणजे, मच्छिंद्र नाथ हे आद्य प्रवर्तक दुसरे गोरक्षनाथ( मच्छिंद्रनाथांचे शिष्य) आणि तिसरे गहिनीनाथ. या गहिनीनाथांमुळे वारकरी संप्रदायाची पताका रोवली गेली. कारण गहिनीनाथ हे निवृत्तीनाथांचे गुरु होते. आणि निवृत्तीनाथ हे ज्ञानेश्वर महाराजांचे गुरु होते. त्यामुळे वारकरी संप्रदायाचे मूळ हे नाथ संप्रदायात आहे.

चौथे जालिंदरनाथ. जालिंदरनाथ हे मच्छिंद्रनाथांचे गुरुबंधू आणि थोर सिद्ध होते. पाचवे कानिफनाथ म्हणजे यांचा जन्म हत्तीच्या कानातून झाला. त्यांनी धमार्चे आणि संस्कृतीचे रक्षण केले. सहावे आहे भर्तरी नाथ. सातवे रेवणनाथ. रेवा नदीच्या काठी बाळ रूपात मिळाले. आठवे नागनाथ यांना अग्निहोत्र नारायणाचा अवतार म्हटले गेले. नववे आहे चर्पटीनाथ. हे गोरक्षनाथांचे शिष्य होते.

हा नाथ संप्रदाय श्री दत्त संप्रदाय म्हणून ओळखला जातो. दत्तगुरूंनी श्री मच्छिंद्रनाथांचे गुरूपद स्वीकारले आणि त्यांना उपदेश केला. त्यानंतर मच्छिंद्रनाथांनी भारतभर भ्रमण करून नवनाथ एकत्र आले आणि त्यांनी शिष्य परंपरा पुढे चालू ठेवली आणि जगात लोकांचे कल्याण केले. मच्छिंद्रनाथ तीर्थक्षेत्रासाठी निघाले. तीर्थक्षेत्राच्या भ्रमंतीवर निघाले असताना वणी येथील सप्तशृंगी गडावर पोहोचले व आई सप्तशृंगीला पाहून नतमस्तक झाले आणि तिच्या आज्ञेने आणि आशीर्वादाने याच ठिकाणी त्यांनी शाबरी विद्येचे कवित्व केले. त्यासाठी सात दिवसांचे अनुष्ठान केले. मच्छिंद्रनाथांच्या शाबरी विद्येची शक्ती एवढी होती की साक्षात हनुमंताला सुद्धा युद्धात हार मानावी लागली होती.

मच्छिंद्रनाथांनी भारतभर धर्माचा प्रसार- प्रचार केला. शिष्य परंपरा वाढवली. ते देवीचे उपासक होते .ज्या कायार्साठी मच्छिंद्रनाथांनी अवतार घेतला, ते कार्य संपूवन त्यांनी मायंबा येथे संजीवन समाधी घेतली. चैत्र कृष्ण पंचमी ही मच्छिंद्रनाथांची पुण्यतिथी आहे. त्यांच्या चरणी नतमस्तक होऊया.

■ **सौ. माधवी पत्की, नागपूर.**

**वाचक लिहितात**

## यापलिकडे राजकारण नाही का?

देश आणि राज्यातले राजकारण कोणत्या स्तराला जात आहे? युवा पिढीला हे राजकारणी कोणता संदेश देवू इच्छित आहेत? हे समजायला मार्ग नाही. टीव्हीवर बातम्यांचे चॅनल सुरू करा, एकदुसऱ्यांवर नेत्यांनी घेतलेले तोंडसुख तेवढे दिसते. डिबेट पहा, एकमेकांचे कपडे फाडण्यात पुढाऱ्यांना आनंद येतो. वर्तमानपत्र उघडले की याचे त्याला शिव्याशाप आणि त्याच्याकडून याचा उद्धार, एवढेच काय ते वाचायला मिळते.

उद्धव ठाकरे यांची शिवसेना दुभंगल्यापासून स्वतः उद्धव ठाकरे, संजय राऊत, आदित्य ठाकरे सत्ताधाऱ्यांवर तूटून पडताहेत. दुसरीकडे, एकनाथ शिंदे स्वतः आणि त्यांच्या गटाचे नेते तसेच भाजपाचे पुढारी उद्धव ठाकरे गटाचे कपडे उतरवण्यात धन्यता मानतात. त्यांनी हिंदुत्व सोडले, त्यांचे हिंदुत्व बेगडी... इतकेच काय ते तुणतुणे वाजवले जाते. प्रश्न हा पडतो की, केवळ हिंदुत्व हाच या देशासमोरचा सर्वात मोठा प्रश्न आहे का? देशात आणि राज्यात इतर दुसऱ्या कोणत्याच समस्या उरल्या नाहीत का? बेरोजगारी, शेतकरी आत्महत्या, नवे प्रकल्प उभे न राहणे, गरीब आणि निराधारांचे प्रश्न बासनात गुंडाळून केवळ एकदुसऱ्यावर चिखलफेक करणाऱ्या या सर्वपक्षीय नेत्यांची कीव येते.

■ **विशाल सोनकांबळे, नागपूर.**

# उष्माघातापासून बचावासाठी करा घरगुती उपाय

उन्हाळ्याला सुरूवात झाली आहे. उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये कडक उन्हामुळे अनेकांना उष्मघाताच्या समस्या होतात. उष्मघातामुळे अनेक लोकांना खूप त्रास होतो. उन्हाळा सुरू होताच तुम्हाला अनेक प्रकारच्या समस्या होतात.

वातावरणातील उष्णतेमुळे, शक्तपणा जाणवतो किंवा उन्हामुळे शरीर डिहायड्रेट होते आणि कधीकधी असे होते की एखाद्याला रुग्णालयात दाखल करावे लागते. अशा परिस्थितीत, काही गोष्टी लक्षात ठेवल्या पाहिजेत.

उन्हाळ्यात तुमच्या आहाराकडे विशेष लक्ष देणे गरजेचे असते. आहार तज्ञांच्या नुसार, उन्हाळा सुरू होताच दिवसभरात ४-५ लिटर पाणी पिणे आरोग्यासाठी फायदेशीर ठरते. तुमच्या शरीराला हायड्रेटेड ठेवण्यासाठी जास्तीत जास्त फळांचा आहारात समावेश करा.



**सूर्यकिरणे थेट डोक्यावर पडली तरच स्ट्रोकचा धोका**

उष्माघातापासून बचाव करण्यासाठी सर्वप्रथम, जेव्हा तुम्ही कुठेही बाहेर जाल तेव्हा तुमचे डोके झाकून घ्या. दुपारच्या सूर्यप्रकाशाचे तीव्र सूर्यकिरणे थेट डोक्यावर पडली तरच स्ट्रोकचा धोका खूप जास्त असतो.

दुपारी सॅलड आणि डाळी यासारख्या गोष्टी जास्त खा. या ऋतूत पपई आणि टरबूज सर्वात फायदेशीर असतात. दररोज कच्चा कांदा खा आणि दर तासाला किमान एक ग्लास पाणी प्यायला विसरू नका.

भाज्यांमध्ये, भोपळा किंवा हिरव्या पालेभाज्या सारख्या भाज्या खाण्याचा प्रयत्न करा. कारण त्यात ९०% पाणी असते. जास्त धान्य खाऊ नका. सॅलडने पोट भरण्याचा प्रयत्न करा. भोपळा आणि पालकाचा रस तसेच सत्तू पिऊ शकता. सफरचंदाचा रस घेवू शकता.

उन्हाळ्यात बाहेर जाता तेव्हा तुमचे डोके झाकून ठेवा. जर गाडी चालवत असाल तर गाडी चालवताना हेल्मेट घाला, बाहेरून घरी आल्यानंतर लगेच थंड पाणी पिऊ नका. तुमच्या शरीराला खोलीच्या तापमानावर थोडा आराम द्या. त्यानंतरच पाणी प्या. जर तुम्ही या गोष्टी लक्षात ठेवल्या तर तुम्ही उष्माघातापासून नक्कीच सुरक्षित राहाल. त्यासोबतच प्रत्येक अर्ध्या तासाने पाणी प्यावे.

■ ■ ■

## अशोकायन



**प्रा. अशोक सारडा**
**मेहकर**
**(९४२१३९४३३९)**

### रोड रुंदीकरण समस्या

वाढती लोकसंख्या व
वाहनांचे वाढते प्रमाण
प्रशस्त रोड असावेत
ही काळाची गरज जाण ..

कराल आज दुर्लक्ष
तर भोगाल त्याची फळे
अपघात होतील असंख्य
क्रासिंगला येतील अडथळे . .

रोज - रोटी कुणाचीही
शासनाने घेऊ नये हिरावून
भाडेपट्ट्याने पर्यायी जागा
द्यावी उपलब्ध करून .. !

## एचडीएफसी बँक परिवर्तनच्या ग्रामीण विकास उपक्रमांतर्गत
# २९८ सीमावर्ती गावांना सामावून घेण्यात आले

**मुंबई, १७एप्रिल :** एचडीएफसी बँक या भारतातील सर्वात मोठ्या खाजगी क्षेत्रातील बँकेने आपल्या सीएसआर शाखा परिवर्तन अंतर्गत ग्रामीण विकास उपक्रमांतर्गत देशभरातील २९८ सीमावर्ती गावांना सामावून घेतले आहे. हे गावांचे समूह आसाम, अरुणाचल प्रदेश, बिहार, गुजरात, हिमाचल प्रदेश, जम्मू आणि काश्मीर, लडाख, राजस्थान, सिक्कीम, उत्तर प्रदेश आणि उत्तराखंड या राज्यांच्या सीमावर्ती भागात वसलेली आहेत. येत्या काही वर्षांत अशा आणखी १५० सीमावर्ती गावांपर्यंत आपली पोहोच वाढविण्याची बँकेची योजना आहे. हे उपक्रम सीमा क्षेत्र विकास कार्यक्रम आणि व्हायब्रंट व्हिलेजिस प्रोग्राममध्ये नमूद केलेल्या राष्ट्रीय विकास ध्येयांशी सुसंगत आहेत.



हिमालयाच्या उत्तर आणि ईशान्य दिशेकडील आणि देशाच्या पश्चिमेस वाळवंटी प्रांतांच्या सीमेवर वसलेल्या गावांना बऱ्याचदा खडतर भूभाग, आवश्यक सेवांपर्यंत मर्यादित पोहोच आणि त्यांच्या दुर्गम जागांमुळे आर्थिक असुरक्षितता यांसारख्या समस्यांना तोंड द्यावे लागते. या प्रदेशात गरजेनुसार कार्य करून परिवर्तनने येथील सुमारे पाच लाख लोकांच्या जीवनावर सकारात्मक परिणाम केला आहे.

या क्षेत्रात बँकेने दोन मुख्य प्रकारचे प्रकल्प लागू केले आहेत:

१) सर्वांगीण ग्रामीण विकास कार्यक्रम : याच्या अंतर्गत ३६-४८ महिन्यांच्या कालावधीत १५-२० जवळपासच्या गावांच्या समूहावर लक्ष केंद्रित करण्यात येते. यात ग्रामीण विकास, शिक्षण, कौशल्य विकास, आर्थिक समावेशकता, आरोग्य आणि स्वच्छता आणि नैसर्गिक संसाधन व्यवस्थापन सारख्या विविध पैलूंचा समावेश आहे.

२) फोकस्ड डेव्हलपमेंट प्रोग्राम : हा उपक्रम हस्तक्षेपाच्या विशिष्ट क्षेत्रांना लक्ष्य बनवतो, ज्यामुळे एका क्षेत्रात सकेंद्रित परिणाम दिसतो.

एचडीएफसी बँकेचा परिवर्तन उपक्रम विविध सीमावर्ती प्रदेशात राहणाऱ्या ग्रामीण समुदायांना सक्षम बनविण्याबाबत वचनबद्ध आहे, जसे की- अरुणाचल प्रदेशातील लोअर दिबांग व्हॅली आणि शी योमी; आसाममधील बक्सा आणि उदलगुडी; बिहारमधील किशनगंज, पश्चिम चंपारण आणि मधुबनी; गुजरातमधील बनासकांठा, कच्छ आणि पाटण; लडाख; मणिपूरमधील चंदेल; मेघालयातील ईस्ट जयंतिया हिल्स; पंजाबातील फाझिलका आणि पठाणकोट; राजस्थानातील बाडमेर; सिक्कीममधील ग्यालशिंग वेस्ट आणि पेक्योंग; उत्तर प्रदेशातील पिलिभीत; आणि उत्तराखंडमधील चमोली.

प्रस्तुत उपक्रमाविषयी बोलताना एचडीएफसी बँकेचे डीएमडी कैझाद भरूचा म्हणाले, टेक्नॉलॉजी-सक्षम शिक्षण, सुधारित कृषी उत्पादकता, अक्षय ऊर्जा आणि आजीविकेच्या संधींपर्यंत पोहोच प्रदान करून आम्ही भारताच्या सीमावर्ती गावांमध्ये अर्थपूर्ण प्रभाव निर्माण करण्याबाबत वचनबद्ध आहोत. राष्ट्रीय विकास लक्ष्यांशी सुसंगत राहून आम्ही स्थानिक समुदाय, स्वयंसेवी संस्था आणि सरकारी संस्थांशी भागीदारी करतो आणि असे समर्थ, आत्मनिर्भर आणि ऊर्जावान समुदाय घडवतो, जे देशाच्या आर्थिक आणि सामाजिक जडणघडणीत योगदान देतात.

एचडीएफसी बँकेचे कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटीचे प्रमुख नुसरत पठाण म्हणाले, ग्रामिक विकासाप्रती एक सर्वंकष दृष्टिकोन असणे हे केवळ इष्ट नाही, तर त्याची आत्यंतिक गरज आहे, विशेषतः सीमावर्ती भागांमध्ये. आम्ही याची खातरजमा करतो की, एका क्षेत्रातील प्रगती इतर क्षेत्रांमधील सकारात्मक परिणामांना मजबूती देईल आणि ते परिणाम वाढवेल आणि त्यायोगे आमच्या कार्याचा प्रभाव जास्तत जास्त दिसेल.

# आयडीएफसी फर्स्ट बँक बोर्डाने ७,५०० कोटी रुपयांच्या निधी संकलनाला मान्यता दिली

**मुंबई, १७ एप्रिल :** आयडीएफसी फर्स्ट बँकेच्या संचालक मंडळाने आज झालेल्या बैठकीत जागतिक वाढीच्या गुंतवणूकदार वॉरबर्ग पिंकस एलएलसीची संलग्न कंपनी करंट सी इन्व्हेस्टमेंट्स बी.व्ही. ला अंदाजे रु.४,८७६ कोटी रुपयांच्या इक्विटी कॅपिटल (सीसीपीएस) आणि अबू धाबी इन्व्हेस्टमेंट अथॉरिटी (एडीआयए) ची पूर्ण मालकीची उपकंपनी असलेल्या प्लॅटिनम इन्व्हिक्टस बी २०२५ आरएससी लिमिटेडला अंदाजे रु.२,६२४ कोटी रुपयांच्या इक्विटी कॅपिटल (सीसीपीएस) ला मान्यता दिली. प्रस्तावित इश्यूज शेअरहोल्डर आणि नियामक मंजुरींच्या अधीन आहेत.

गेल्या सहा वर्षांत, आयडीएफसी फर्स्ट बँकेने पायाभूत सुविधांवर लक्ष केंद्रित केलेल्या डीएफआयच्या वारशापासून ते आधुनिक, तंत्रज्ञानावर आधारित, संपूर्ण भारतातील, सार्वत्रिक बँक बनण्यात यशस्वी परिवर्तन घडवून आणले आहे. या प्रक्रियेत, त्यांनी भारतातील एक आघाडीची खाजगी क्षेत्रातील बँक बनण्यासाठी वितरण, तंत्रज्ञान आणि प्रतिभेमध्ये लक्षणीय गुंतवणूक केली आहे.

या काळात, ठेवींमध्ये ६ पट वाढ झाली, कर्जे आणि कर्जे दुप्पट झाली आणि कॅसा गुणोत्तर ८.७% वरून ४७.७% पर्यंत लक्षणीयरीत्या सुधारले आहे. आर्थिक वर्ष १९ मध्ये १,९४४ कोटी रुपयांचा तोटा होता, तो आर्थिक वर्ष २४ मध्ये २,९५७ कोटी रुपयांच्या नफ्यात पोहोचला. तथापि, मायक्रोफायनान्समधील उद्योगव्यापी आव्हानांमुळे आर्थिक वर्ष २५ च्या ९ महिन्यांत नफा कमी झाला, ज्याचा बँकेने चांगला सामना केला आहे. या निधी उभारणीसह, एकूण भांडवली पर्याप्तता १६.१% वरून १८.९% पर्यंत वाढेल (३१ डिसेंबर २०२४ रोजी बँकेच्या भांडवली स्थितीवर मोजले जाणारे सीईटी-१ गुणोत्तर १६.५%), बँकेचा ताळेबंद मजबूत करेल आणि मजबूत आणि स्वयंपूर्ण नफा वाढीसाठी ती स्थानबद्ध करेल.

आयडीएफसी फर्स्ट बँकेचे व्यवस्थापकीय संचालक आणि सीईओ व्ही. वैद्यनाथन म्हणाले, पहिल्या दिवसापासूनच, आम्ही भारतात जागतिक दर्जाची बँक उभारण्याच्या दीर्घकालीन दृष्टिकोनासह बँकेचा पाया रचला आहे. आम्ही ग्राहकांसाठी सहानुभूतीची संस्कृती निर्माण करत आहोत आणि उच्च दर्जाची ग्राहक सेवा देण्याचा प्रयत्न करत आहोत. आम्ही तांत्रिकदृष्ट्या प्रगत आहोत आणि अत्याधुनिक सेवा देत राहतो.

बँकेने नफ्यात पाऊल ठेवले आहे आणि आता ती एका महत्त्वाच्या टप्प्यावर आहे, जिथे आमची उत्पन्न वाढ ओपेक्स वाढीपेक्षा सातत्याने जास्त राहण्याची अपेक्षा आहे, ज्यामुळे ऑपरेटिंग लीव्हरेजमध्ये सुधारणा होईल. गुंतवणुकीच्या टप्प्यात असलेले अनेक व्यवसाय मोठ्या प्रमाणात नफा कमावतील अशी आम्हाला अपेक्षा आहे.

वॉरबर्ग पिंकस परत येणे आणि एडीआयए च्या पूर्ण मालकीच्या उपकंपनीचे आमचे भागधारक म्हणून स्वागत करणे खूप छान आहे. आमच्यावर आणि आमच्या भविष्यातील विकास योजनांवर विश्वास ठेवल्याबद्दल आणि अस्थिर जागतिक परिस्थितीतही आमच्यात गुंतवणूक केल्याबद्दल आम्ही त्यांचे आभार मानतो. ग्राहकांना आवडणारी आणि मजबूत युनिट इकॉनॉमिक्सद्वारे समर्थित एक मजबूत, आदरणीय फ्रँचायझी तयार करूनच आम्ही आमच्या भागधारकांना शाश्वत दीर्घकालीन परतावा देऊ असा आमचा विश्वास आहे.

विशाल महादेविया, व्यवस्थापकीय संचालक, प्रमुख आशिया प्रायव्हेट इक्विटी आणि जागतिक सह-प्रमुख वित्तीय सेवा, वॉरबर्ग पिंकस म्हणाले, आम्हाला विश्वास आहे की भारतीय बँकिंग क्षेत्र एक रोमांचक संधी सादर करते आणि दीर्घकालीन वाढीसाठी सज्ज आहे. वॉरबर्ग पिंकसमध्ये, अपवादात्मक संघांसोबत भागीदारी करण्याचा आमचा दीर्घ इतिहास आहे. आम्ही आयडीएफसी फर्स्ट बँक टीमला त्यांच्या सुरुवातीच्या काळापासून एक दशकाहून अधिक काळ ओळखतो आणि बँकेची उभारणी जवळून पाहिली आहे. वाढीच्या पुढील टप्प्यात आणि शाश्वत आरओई सुधारणांमध्ये त्यांना पाठिंबा देण्यासाठी आयडीएफसी फर्स्ट बँक टीममध्ये पुन्हा गुंतवणूक करण्यास आम्हाला उत्सुकता आहे.

एडीआयएच्या प्रायव्हेट इक्विटीज विभागाचे कार्यकारी संचालक हमद शाहवान अल धाहेरी म्हणाले, आयडीएफसी फर्स्ट बँकेने भारतातील आघाडीच्या खाजगी क्षेत्रातील बँकांपैकी एक म्हणून स्वतःला दृढपणे स्थापित केले आहे, ज्याला अनुभवी व्यवस्थापन पथकाचे पाठबळ आहे. गेल्या काही वर्षांत त्यांनी त्यांचे तंत्रज्ञान आणि शाखा पायाभूत सुविधांचा विस्तार केला आहे आणि भविष्यासाठी ते चांगल्या स्थितीत आहे. ही गुंतवणूक बँकेच्या सतत वाढीला पाठिंबा देण्यासाठी आहे, ज्यामुळे देशातील वित्तीय उत्पादनांची वाढती मागणी पूर्ण करता येईल.

## सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवाच्या संकेतस्थळाचे गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांच्या हस्ते उद्घाटन!

**पणजी (गोवा), १७ एप्रिल :** सनातन संस्थेचे संस्थापक सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत बाळाजी आठवले यांचा ८३ वा जन्मोत्सव आणि सनातन संस्थेचे रौप्य महोत्सवी वर्ष या निमित्ताने फर्मागुडी, फोंडा, गोवा येथे १७ ते १९ मे २०२५ या कालावधीत सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवाचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवाच्या SanatanRashtraShankhnad.in या इंग्रजी भाषेतील संकेतस्थळाचे उद्घाटन गोवा राज्याचे मुख्यमंत्री श्री. प्रमोद सावंत यांच्या हस्ते पर्वरी, गोवा येथील मुख्यमंत्री कार्यालयात करण्यात आले.



या वेळी मुख्यमंत्र्यांनी संकेतस्थळाचे अवलोकन केले, तसेच कार्यक्रमासाठी शुभेच्छा दिल्या. या वेळी या सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवाच्या स्वागत समितीतील पू. पृथ्वीराज हजारे, सनातन संस्थेचे राष्ट्रीय प्रवक्ते श्री. चेतन राजहंस, हिंदु जनजागृती समितीचे राष्ट्रीय प्रवक्ते श्री. रमेश शिंदे, तसेच श्री. नारायण नाडकर्णी, श्री. मधुसूदन कुलकर्णी आणि अधिवक्ता राजेश गावकर असे उपस्थित होते.

या संकेतस्थळावर सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवाविषयी माहिती उपलब्ध करून देण्यात येणार आहे. सध्या सनातन राष्ट्राचा उद्देश; सनातन राष्ट्राचा शंखनाद करताना भगवान श्रीकृष्णाचे बोधचिन्ह; सनातन संस्थेचे संस्थापक सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत बाळाजी आठवले यांचा परिचय; सनातन संस्थेची माहिती; कार्यक्रमाला उपस्थित रहाणारे संत, महंत, विविध राज्यांचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, प्रतिष्ठित व्यक्ती यांची माहिती; सांस्कृतिक कार्यक्रम; लोककला आदींची चित्रे प्रातिनिधिक चित्रे ठेवण्यात आली आहेत. पुढे कार्यक्रमाच्या दृष्टीने वेळोवेळी अधिकची माहिती या संकेस्थळावर उपलब्ध करून देण्यात येणार आहे. तसेच सनातन संस्थेच्या वतीने या महोत्सवासाठी धर्मदान करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## वीर हनुमान: एका आईच्या प्रेमाची कसोटी, मारुतीसाठी अंजनीचे बलिदान!

**मुंबई, १७ एप्रिल :** सोनी सबवरील वीर हनुमान मालिकेत छोट्या कुतुहलाने भरलेल्या आणि व्रात्य मारूतीचे एका बलशाली, दिव्य योद्ध्यात रूपांतर होण्याची कहाणी उलगडत आहे. पुराणकथा, ॲक्शन आणि भावना यांचा सुंदर गोफ विणत ही मालिका भारताच्या अत्यंत प्राचीन कथेला आकर्षक स्वरूपात प्रस्तुत करते. सर्वांनाच आकर्षित करणाऱ्या या मालिकेत आन तिवारी बाल मारुतीची भूमिका करत आहे, सायली साळुंखे अंजनीची, आरव चौधरी केसरीची तर माहिर पांधी वाली आणि सुग्रीव या दोघांची भूमिका करताना दिसत आहे. अलीकडच्या भागांमध्ये प्रेक्षकांनी पाहिले की आपल्या शक्तींवर प्रभुत्व प्राप्त करण्याच्या मारुतीची प्रयत्नांत विघ्न आणण्याचा वालीचा कुटिल कट त्याच्यावरच उलटतो, जेव्हा मारुती करुणा आणि सुजाणता यांचा पक्ष घेऊन हिंसेचा विरोध करतो आणि आपल्या वडिलांना म्हणजे केसरीला कर्तव्यापेक्षा सहानुभूतीला प्राधान्य देण्याची गळ घालतो.



आगामी भागांमध्ये, मारुतीच्या प्रवासाला एक भयानक वळण मिळते कारण वाली कालदंताला मारुतीचे अपहरण करून त्याला पाताळात आणण्याची आज्ञा देतो. कालदंत एक मायावी रूप घेऊन मारुतीला भुलवतो आणि तलातलाच्या अंधाऱ्या राज्यात त्याला अडकवतो. मारुती स्वतःकडे असलेल्या आठ सिद्धींपैकी अणिमा सिद्धीचा उपयोग करून सूक्ष्म रूप धरण करतो आणि कालदंताच्या शरीरात जाऊन त्याला हरवतो. पण, हा विजय त्याला खूप महागात पडतो, कारण तो पुन्हा आपल्या मूळ रूपात येऊ शकत नाही. याचा फायदा घेऊन पातालकलीचे सामर्थ्य लाभलेला कालदंत मारुतीला असा शाप देतो की, त्याच्या आईने, अंजनीने आपल्या जीवनाचे बलिदान दिले, तरच मारुती आपल्या मूळ रूपात येऊ शकेल.

अंजनी आपल्या मुलासाठी हे मोठे बलिदान देईल का की हनुमान आपल्या आईचा जीव वाचवण्यासाठी सदैव सूक्ष्म रूपात राहणे पसंत करेल?

अंजनीची भूमिका करणारी सायली साळुंखे म्हणते, मला वाटते, एक अभिनेत्री म्हणून प्रत्येक भूमिका मला पटकथेच्या पलीकडे जाऊन काही तरी शिकवते. वीर हनुमान मालिकेत अंजनीची भूमिका करण्याचा अनुभव तर विशेषच आहे. एक माता म्हणून अंजनीचे प्रेम आणि तिचा त्याग आपल्याला हेलावून सोडतो. मी जेव्हा हे दृश्य केले की, जेव्हा अंजनीला हे समजते की तिने स्वतःच्या जीवाचे बलिदान दिले तरच हनुमानाला त्याचे मूळ रूप परत मिळेल, तेव्हा ते माझ्या अंतःकरणाला भिडले. मला माझ्या आईची प्रकर्षाने आठवण झाली आणि हे आठवले की माझ्या सगळ्या सुख-दुःखात ती कशी माझ्या पाठीशी निःस्वार्थपणे उभी राहिली आहे. त्या व्यक्तिगत आठवणीमुळे त्या दृश्यातील भावना फारच अस्सल स्वरूपात व्यक्त झाल्या आहेत. अंजनी आणि मारुती यांच्यातील नाते इतके निर्मळ आहे! आणि मला ते पडद्यावर साकारण्याची संधी मिळाल्याबद्दल माझ्या मनात कृतज्ञता आहे. आम्ही ज्या भावना, जे प्रेम व्यक्त करण्याचा प्रयत्न केला आहे, त्या भावना प्रेक्षकांच्या हृदयाला देखील भिडतील असे वाटते.

## अखिल भारतीय मारवाडी महिला परिषद नागपूर शाखेने वर्धमान नगर चौकात चप्पल आणि टॉवेल वाटप



**नागपूर, १७ एप्रिल :** यावर्षीही, अखिल भारतीय मारवाडी महिला संमेलन नागपूर शाखेने नागपूरच्या कडक उन्हापासून ये-जा करणाऱ्यांना दिलासा देण्यासाठी वर्धमान नगर चौकात चप्पल आणि टॉवेलचे वाटप केले. येणाऱ्या-जाणाऱ्यांना ताक, फळे, टरबूज, काकडी इत्यादींचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या म्हणून माजी नगरसेविका आणि ललिता पब्लिक स्कूलच्या संचालिका चेतना जी टांक उपस्थित होत्या. संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती किरण सराफ आणि सचिव श्रीमती रजनी अग्रवाल यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. दरवर्षी उन्हाळ्यात वर्धमान नगर चौकातील पिण्याच्या पाण्याच्या स्टॉलवर कडक उन्हापासून आराम मिळावा म्हणून संस्थेकडून हा प्रकल्प हाती घेतला जातो.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अध्यक्षा सौ.किरण सराफ, सचिव रजनी अग्रवाल, उपाध्यक्ष माया शर्मा, सुषमा अग्रवाल, पुष्पा अग्रवाल, उमा गोयल, निशा बाजोरिया, स्वाती अग्रवाल, निर्मला गोयंका, शीतल गोयल, सुनैना शर्मा, शीतल अग्रवाल, रचना अग्रवाल, जयश्री वैरागी, जयश्री वैशाख आदी उपस्थित होते.

## आनंद इंगळे आणि श्वेता पेंडसे 'या' नाटकातून रंगभूमीवर पहिल्यांदाच येणार एकत्र

**मुंबई, १७ एप्रिल :** मराठी रंगभूमीला गौरवशाली परंपरा लाभली आहे. अनेक प्रतिभावान नाटककारांनी, लेखक -दिग्दर्शकांनी आपल्या वैविध्यपूर्ण नाट्यकृतींनी प्रेक्षकांची मने जिंकत रंगभूमीचा एक काळ गाजवला. तेव्हाची अनेक नाटकं आज इतक्या वर्षांनंतरही नाट्य रसिकांच्या आणि निर्माता- दिग्दर्शकांच्या मनावर गारुड करून आहेत. यातील काही नाटकांना पुनरुजीवीत करण्याचे धाडस आजचे काही निर्माते करताना दिसताहेत. जुने ते सोने या उक्तीप्रमाणे काही जुन्या नाटकांचे पुनरुज्जीवन करून ती नव्या संचात सादर केली जात आहेत. अशा या क्लासिक नाटकांच्या निमित्ताने प्रेक्षकवर्ग पुन्हा मराठी नाटकांकडे वळू लागला आहे. या यादीत शेखर ढवळीकर लिखित आणि विजय केंकरे दिग्दर्शित नकळत सारे घडले या नाटकाचा समावेश झाला आहे. प्रत्येक पिढीचं एक मत असतं, एक दृष्टिकोन असतो. कोण बरोबर? कोण चूक? पिढ्यांमधल्या वाढलेल्या अंतराचा हा तिढा सोडवायचा तरी कसा? यावर भाष्य करत नकळत सारे घडले मनोरंजक नाट्य आपल्या प्रत्येकालाच स्वतःकडे - विविध नाते संबंधांकडे आणि एकूणच आपल्या मूल्यव्यवस्थेकडे पहायची एक निराळी दृष्टी देते.

## आज का अंदाज

**शुक्रवार १८ एप्रिल २०२५**

**पत्थर फोड एकच**

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | ३ | ६ | ९ | २ | ५ | ६ | ७ |
| ११० | १४८ | १५० | १३५ | १२९ | २३० | २४० | १२४ |
| २२८ | ३४६ | २६८ | ३६० | २४६ | ३५७ | ३६७ | २७८ |
| ३३६ | ६७० | ३३० | ५६८ | ५८९ | ४५६ | ४४८ | ३७७ |
| २५ | ३५ | ६१ | ९१ | २३ | ५३ | ६१ | ७१ |
| २७ | ३७ | ६० | ९४ | २० | ५० | ६४ | ७४ |
| २८ | ३८ | ६४ | ९० | २६ | ५६ | ६९ | ७९ |

**१८ एप्रिल : सर्व बाजारांसाठी**

| | | | |
|---|---|---|---|
| १० | ४० | ७९ | ८९ |
| १२ | ४२ | ७३ | ८३ |
| १६ | ४६ | ७५ | ८५ |

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी जबरदस्त पास होणारे चान्सेस मिळतील.

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४

## दीपिका कक्कडनं पहिल्या लग्नातून झालेल्या मुलीला सोडलं? नवरा शोएबनं सांगितलं सत्य

**मुंबई, १७ एप्रिल :** छोट्या पडद्यावरील अभिनेता शोएब इब्राहिम आणि त्याची पत्नी दीपिका कक्कड हे नेहमीच चर्चेत असतात. त्यांचे व्लॉग्स हे चांगलेच चर्चेत राहतात. या व्लॉगमध्ये ते त्यांचं आयुष्य आणि काय काय करतात ते दाखवताना दिसतात. तर नुकताच त्यांनी एक व्लॉग शेअर केला असून त्यात त्यांनी चाहत्यांना किंवा त्यांच्यावर प्रश्न उपस्थित करणाऱ्या लोकांना सडेतोड उत्तर दिली आहेत. त्यावेळी अनेकांनी म्हटलं की दीपिकानं आधीच्या लग्नातून झालेल्या मुलीला सोडलं होतं. अशा अनेक रिपोर्ट आल्या आहेत ज्यात दावा करण्यात आला आहे की तिनं कधीच तिच्या पहिला बाळाविषयी काही चर्चा केली नाही. मात्र, दोघांनी या सगळ्या अफवा असल्याचं म्हटलं आणि दीपिकाची कोणतीही मुलगी नाही असं सांगितलं.

दरम्यान, सततच्या चाहत्यांच्या प्रश्नांमध्ये शोएब इब्राहिमनं एका अशा प्रश्नाचा उल्लेख केला जो त्यांना गेल्या अनेक वर्षांपासून सतवत आहे. त्यांनी सांगितलं की कधी-कधी यामुळे खूप चिडचिड होते. कोणी असं कसं सांगू शकतं? त्यानंतर त्यांनी एका चाहत्यानं विचारलेला प्रश्न वाचला, त्यात म्हटलं होतं की दीपिकाला पहिल्या लग्नातून एक मुलगी आहे. तर त्यावर तुम्ही उत्तर का देत नाही आहात?

## राशीभविष्य

**मेष :** आर्थिक व्यवहारात काळजी घ्या. नोकरी मिळवण्याचे प्रयत्न यशस्वी होतील. अनपेक्षित लाभ होऊ शकतो. व्यावसायिक प्रवास यशस्वी होईल. घरात सुख-शांती राहील.

**वृषभ :** आज तुम्हाला एखाद्या नातेवाईकाकडून चांगली बातमी मिळेल. कर क्षेत्रात कनिष्ठ अधिकारी आणि उच्च अधिकाजयांशी जवळीक वाढेल. बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये काम करणाजया लोकांना बढती मिळेल.

**मिथुन :** कुटुंबातील शुभ कार्यक्रमात भाग घ्याल. भेटवस्तू मिळतील. धोकादायक कामे टाळा. प्रवास आनंददायी राहील. नोकरीत अधीनस्थांना फायदा होईल. व्यवसायात नवीन करार होतील.

**कर्क :** आज तुम्हाला व्यावसायिक संपर्कांचा फायदा होईल. तुम्हाला कुठेतरी अनपेक्षित लाभ मिळू शकतो. व्यवसायात वाढीसाठी हा काळ योग्य आहे. इतर चांगले साहित्य आणि कपडे मिळण्याची शक्यता आहे.

**सिंह :** घरात लग्नाची बोलणी सुरु होऊ शकतात. तुमच्यासाठी लग्नाचे प्रस्ताव येऊ शकतात. जर विवाहित असाल, तर पार्टनरसोबत बाहेर फिरायला जाण्याचा विचार कराल. अनपेक्षित लाभ होऊ शकतो.

**कन्या :** .स्टार्टअपमध्ये गुंतवणूक केली असेल, तर त्यातून चांगला नफा मिळण्याची शक्यता आहे. ते आशावादी राहतील. मित्रांबरोबरचे संबंध मधुर होतील. शासकीय अडचणी येऊ शकतात. वाद टाळा.

**तुळ :** कला, संगीत आणि माध्यमांमध्ये काम करणाजया व्यक्तींना कोणाचे तरी सहकार्य मिळेल. राजकारणात काम करणाजयांनी जपून काम करण्याची गरज आहे. एखाद्या प्रभावशाली व्यक्तीची मदत मिळेल.

**वृश्चिक :** घरातील एखादा सदस्य तुमच्यासाठी काहीतरी खास बेत आखेल. डोळ्यांना त्रास होऊ शकतो. आरोग्यावर खर्च होईल. कर्ज घ्यावे लागेल. इतरांच्या भांडणात पडू नका. वाद वाढवू नका.


**धनु :** नोकरीसंबंधी कामासाठी विदेशात जाण्याची संधी मिळू शकते. कुटुंबात तुमच्याबद्दल उत्साहाचे वातावरण राहील. कृषी क्षेत्रात प्रगती होईल. मित्र आणि नातेवाईकांची भेट होईल.

**मकर :** प्रेमसंबंधात अनुकूलता राहील. घरात पाहुण्यांचे आगमन होईल. गोड बातमी मिळेल. आत्मविश्वास वाढेल. अपेक्षित कामांना विलंब होईल. कुटुंबातील शुभ कार्यक्रमात सहभागी होण्याची संधी मिळेल.

**कुंभ :** समाजात प्रतिमा सुधारेल. त्यांच्याबद्दल आदर वाढेल. कुटुंबातील सदस्यांसोबत बाहेर जाण्याचा विचार करु शकता. त्रास, भीती आणि बेचैनीचे वातावरण निर्माण होऊ शकते.

**मीन :** क्रीडा जगताशी संबंधित लोकांना लक्षणीय यश मिळेल. व्यवसाय ठीक चालेल. बोलण्यावर नियंत्रण ठेवा. घरात मतभेद संभवतात. व्यवसायात कठोर परिश्रम फायदेशीर ठरतील.

## शब्दकोडे क्रमांक २०८८



**आडवे शब्द:-**
१) शाळेचे प्रमुख
५) सूर्याचे एक नाव
७) रागावलेला
११) सापाने त्यागलेली त्वचा
१२) सुळे
१४) प्रशाला
१५) नंतर
१६) नेता, चित्रपटाचा हिरो
१७) नूतन
१८) चुणीदार पट्टी
१९) जानकीपती
२०) खरकट्याचा ढीग
२३) सूर्य
२५) रजनी
२७) जन्ममृत्यू
३०) सेवक
३२) पंजाब मधील दोन नद्यांची नावे
३४) बारीक झणझण
३६) मृत्यू
३७) व्याज आकारणीतील द.सा.द.शे.
४१) मयूर
४२) निमग्न
४३) यज्ञ
४४) कबूतर
४५) रतिचा पती
४७) उद्याच्या नंतरचा दिवस
४८) अथवा, किंवा
४९) शर्त, परंतु, अट
५०) एक रंगीत कंदमूळ
५१) कोथिंबीरीचे बी
५२) पाणी
५४) झाडाभोवतीचा कट्टा
५५) निर्धन झालेला, दरिद्री
५६) कच्चाच्या विरुद्ध
५८) खांदा, खांद्याचा सांधा
६०) बुद्धीने कमी असलेला
६१) मीठ
६२) उसनवार
६६) निष्णात(गुन्हेगार)
६८) अफवा
६९) एक द्विदल धान्य
७०) झकास
७१) लेखणी
७२) प्रस्थान करणे
७३) वेल
७५) पुरुष
७६) चांदी
७७) गाणे
७८) गुणांची चाहा करणारा

**उभे शब्द:-**
१) ज्याला बोलता येत नाही असा
२) सुप्रसिद्ध
३) घागरा
४) रेशमी धोतर
५) शपथ
६) रविवार
७) कलकत्त्याचे नवीन नाव
८) चरण
९) तालुक्यातील सरकारी महसुलीचे काम बघणारा अधिकारी
१०) मोठे गाव
१३) दृष्टीभेट
१८) स्वयंपाक घरातील एक छिद्राचे साहित्य
१९) वंदनाचा एक शब्द
२१) टप्प्याटप्प्याने केलेला प्रवास
२२) हजार शेराचे वजन
२४) कापड विणून तयार करणारा
२६) बैलाच्या नाकात ओवलेली दोरी
२८) मोठे घर, राजवाडा
२९) विरोध, प्रतिबंध
३१) सवतीबद्दलचा आकस
३३) वीरगती
३५) बटाटा वा साबुदाण्याचा तळलेला रूचकर पदार्थ
३८) उपकरण
३९) एखादा घोटाळा दाबून टाकणे दाबणे
४०) एक प्रकारचा लांब अंगरखा
४४) डोळ्यावरील उघडझापीचा अवयव
४६) किंमत
५०) छ. शिवाजी महाराजांना राज्याभिषेक करणारा ब्राह्मण
५१) हादरा, धडक
५३) पहारेकरी
५४) बसण्याची फळी
५६) अनुमती, मान्यता
५७) गावाची हद्द
५९) हवा, वारा
६२) पिता
६३) नूतन, जुनाच्या विरुद्ध
६४) शिक्षक
६५) दहावी रास
६६) मृत्यू नसलेला
६७) निकट, जवळ
७०) चिंतन
७४) दह्याचे पातळसर पेय

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



# समृद्धी महामार्गावरील अपघातात दोन ठार

## मालवाहतूक ट्रकला पेट्रोल टँकर धडकल्याने झाला अपघात

(राम सुरसे यांजकडून)

**वावी ।** नागपूर मुंबई समृद्धी महामार्गावर अपघाताची मालिका सुरूच असताना सिन्नर तालुक्यातील मलढोण शिवारात चॅनल नंबर ५४५ वर बुधवार दि.१७ रोजी मध्यरात्री १ वाजेच्या सुमारास झालेल्या अपघातात दोन्ही गाड्यांचे चालक जागीच ठार झाले असून गाडीत इतर प्रवासी नसल्याने अधिकचा अनर्थ टळला.

समृद्धी महामार्गावर मलढोण शिवारात मध्यरात्री झालेल्या भीषण अपघाताची माहिती समृद्धी महामार्गावरील वाहतूक नियंत्रण कक्षाचे अधिकारी मिलिंद सरवदे यांना मिळताच त्यांनी शिर्डी सिन्नर गोंदे येथील वाहतूक नियंत्रण कक्ष विभागशी संपर्क साधून घटनेची माहिती देत वावी पोलिसांनाही खबर दिली



छत्रपती संभाजी नगर येथून बियरच्या बाटल्यांनी भरलेला मालट्रकचे टायर पंचर झाल्याने चालकाने मळढोण शिवारात रस्त्यावर ट्रक क्र.एम.एच.२०-सीटी-२९३२ उभा केला व पंक्चर काढण्याचे काम चालू असताना त्याच वेळेत भरदाव वेगात नागपूर ते मुंबईकडे जाणारा जिओ कंपनीचा रिकामा असलेला पेट्रोल टँकर एम.एच.२९-बीई-२५१९ उभ्या असलेल्या बियरच्या ट्रकवर जाऊन जोराचा आदळल्याने भीषण अपघात घडला यामध्ये ट्रक चालक (नाव समजू शकले नाही हे ठार झाले) तर मागून भरधाव वेगात येणाऱ्या जिओ कंपनीचा पेट्रोल टँक चालक विजेंद्र मनी तिवारी हे सुद्धा अपघातात मयत झाले.

शिर्डी येथील वाहतूक शाखेच्या रुग्णवाहिकेत दोन्ही मयत चालकांना सिन्नर येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल केले असून वावी पोलीस वाहन मालक व नातेवाईकांशी संपर्क साधत आहे. नासिक उत्पादन शुल्क विभागाचे अधिकारी घटनास्थळी पंचनामा करणार असून बियर बॉटल बॉक्स किती असून कुठे चालल्या होत्या याचा तपास करणार असल्याची माहिती पोलिसांनी दिली. ट्रक चालकाची ओळख पटविण्याचे काम चालू असून ट्रकच्या नंबर वरून नातेवाईक व मालकाशी संपर्क पोलीस करत आहे. पुढील तपास वावी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक विजय कोठावळे हवालदार लगड तपास करीत आहे.

# प्रहार सैनिक कल्याण संघाचे इगतपुरी रत्न पुरस्कार जाहीर

## २७ एप्रिलला घोटी येथे पुरस्कारांचे होणार वितरण






**बेलगाव कुऱ्हे ।** प्रहार सैनिक कल्याण संघाचे पुरस्कार नुकतेच जाहीर झाले असून, विविध क्षेत्रात योगदान देऊन बहुमोल कामगिरी करणाऱ्या गुणिजनांचा इगतपुरी रत्न गौरव पुरस्कार सन्मान सोहळा २७ एप्रिल रोजी घोटी आडवन रोडवरील मातोश्री लॉन्स येथे सायंकाळी ६ वाजता आयोजित करण्यात करण्यात आला आहे.

कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजक प्रहार सैनिक कल्याण संघाचे जिल्हाध्यक्ष तथा माजी सैनिक विजय कातोरे यांनी केले आहे. या पुरस्कारात सामाजिक, शैक्षणिक, कृषी, पत्रकार, राजकीय, दिव्यांग, पोलिस, वैद्यकीय, अध्यात्मिक आणि ज्यांनी आपल्या मुलांना मातृभूमीच्या रक्षणासाठी आर्मीत पाठवले आहे त्यांचे आई-वडील आदींचा पुरस्काराने यथोचित सन्मान होणार आहे. वैद्यकीय क्षेत्रातून डॉ. महेंद्र शिरसाठ, डॉ सजन दुभाषे, आध्यात्मिक क्षेत्रात हभप धनंजय महाराज गतीर, आदर्श शेतकरी गोकुळ जाधव, सामाजिक क्षेत्रातील विनोद नाठे, वैशाली गोसावी, आशा सेविका मंदाबाई ढगे, बंटी पगारे, सुभाष गायकर, ॲड दिलीप खातळे, पोलिस दलातील योगेश यंदे, सैनिक विलास मांडे, ज्येष्ठ पत्रकार के. टी. राजोळे, प्रहार सेवक सपन परदेशी यांना हा पुरस्कार जाहीर झाला आहे. या पुरस्काराचा उद्देश देश हितासाठी चांगल्या व्यक्तिंना एकत्र आणणे व त्यांच्या कार्याचे कौतुक करणे होय. इगतपुरी रत्न गौरव पुरस्कार हा इतर पुरस्कारा पेक्षा आगळा वेगळा पुरस्कार आहे. कारण तो देशसेवा करणाऱ्या सैनिकांच्या हस्ते प्रदान करण्यात येतो. या पुरस्कारासाठी कुठल्याही पुरस्कारार्थीकडून पैसे किवा कुठलाही मोबदला घेतला जात नसल्याचे आयोजक माजी सैनिक विजय कातोरे यांनी सांगितले.

# मुक्त विद्यापीठात पंधरा प्रशिक्षणार्थींना पाच महिन्यांची मुदतवाढ

## 'मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण' योजना

**नाशिक ।** महाराष्ट्र राज्य शासनाच्या 'मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेस' सहा महिन्यांवरून अकरा महिन्यांची मुदतवाढ मिळाल्यानंतर यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने त्वरित त्याची अंमलबजावणी सुरु केली आहे. विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांनी या योजनेंतर्गत यापूर्वी नियुक्त १५ प्रशिक्षणार्थींना पुढील पाच महिने पुनर्नियुक्त करण्याचे निर्देश विद्यापीठ प्रशासनास दिले आहे.

प्रशिक्षणार्थी उमेदवारांना प्रत्यक्ष कामाचा अनुभव यावा, त्याच्यात कौशल्य वृद्धी व्हावी व त्यांना विविध क्षेत्रात रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात असा या योजनेचा उद्देश आहे. गेल्या माहे ऑगस्ट २०२४ मध्ये राज्य शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या निर्देशानुसार विद्यापीठाच्या व्यावसायिक शिक्षण व कौशल्य विकास विद्याशाखेने महाराष्ट्र शासनाच्या www.rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर विद्यापीठाची नोंदणी केली. त्यानंतर सदर आंतरवासियता स्वरूप योजनेसाठी या प्रशिक्षणार्थींची निवड करण्यात आली. त्यांना विद्यापीठ मुख्यालयात व विद्यापीठाच्या विविध विभागीय केंद्रात सहा महिने कालावधीसाठी प्रशिक्षणार्थ म्हणून रुजू करण्यात आले. आता नवीन शासकीय आदेशानुसार या सर्व प्रशिक्षणार्थींची अधिकच्या पाच महिन्यांसाठी पुनर्नियुक्ती करण्यात येत आहे. त्यासाठीची अंतिम मुदत ही येत्या ३० एप्रिल २०२५ पर्यंत आहे. संबंधित इच्छुक प्रशिक्षणार्थींनी याची नोंद घ्यावी असे आवाहन विद्यापीठाचे कुलसचिव दिलीप भरड व विद्यापीठाच्या व्यावसायिक शिक्षण व कौशल्य विकास विद्याशाखेचे संचालक प्रा. जयदीप निकम यांनी केले आहे.

# नाशिक जिल्हा टेनिस व्हॉलीबॉल स्पर्धा अन् निवड चाचणी संपन्न

## येवला, सटाणा, एकलहरेसह शहरातील खेळाडूंचा सहभाग



**नाशिक ।** नाशिक जिल्हा टेनिस व्हॉलीबॉल असोसिएशनच्या वतीने आणि जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय नाशिक यांच्या सहकार्याने दि. १५ आणि १६ एप्रिल दरम्यान जिल्हा स्पर्धा, निवड चाचणीचे आयोजन करण्यात आले होते.

या स्पर्धेमध्ये मिनी गट आणि यूथ गट या दोन वयोगटांचा समावेश होता. विभागीय क्रीडा संकुल येथे पार पडलेल्या या स्पर्धेत सटाणा, येवला, एकलहरे तसेच नाशिक शहरातील विविध शाळा महाविद्यालयातील एकूण ५६ खेळाडूंनी सहभाग नोंदवला. या स्पर्धेत मिनी गटामध्ये मुलींमध्ये पोदार स्कुलच्या संघाने विजेतेपद पटकावले तर सटाणा संघ उपविजयी ठरला. मिनी मुलांच्या गटामध्ये माध्यमिक विद्यालय, एकलहरे आणि राधिका



इंटरनॅशनल स्कुल, येवला यांच्यामध्ये झालेल्या अंतिम सामन्यात माध्यमिक विद्यालय, एकलहरे संघाने चांगला खेळ करून विजेतेपद पटकावले तर येवला संघ उपविजेता ठरला. युथ गटामध्ये मुलांच्या झालेल्या अंतिम सामन्यात एन.टी.पी.एस.स्पोर्ट्स क्लबच्या संघाने सटाणा संघाचा पराभव करून विजेतेपद मिळविले. या स्पर्धेतील कामगिरीच्या आधारे खेळाडूंची प्राथमिक निवड करण्यात अली आहे. या निवड झालेल्या खेळाडूंचे सराव शिबीर १७ ते २० एप्रिल दरम्यान पार पडणार आहे. यानंतर अंतिम निवड झालेले खेळाडू दिनांक २२ आणि २३ एप्रिल दरम्यान वर्धा येथे आयोजित २६ व्या महाराष्ट्र राज्य अजिंक्यपद स्पर्धेत नाशिक जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करतील. या स्पर्धेला क्रीडा संघटक आणि नाशिक जिल्हा टेनिस व्हॉलीबॉल असोसिएशनचे अध्यक्ष अशोक दुधारे, सचिव आनंद खरे यांनी भेट देऊन खेळाडूंना शुभेच्छा दिल्या. या स्पर्धा यशस्वी करण्यासाठी टेनिस व्हॉलीबॉल महाराष्ट्र असोसिएशनचे नाशिक विभाग सचिव किरण घोलप, राष्ट्रीय प्रशिक्षक गणेश कलुंगल, प्रज्वल पिंपळकर, अभिजित सोनावणे, बंडू जमदाडे, क्रीडा शिक्षक भीम औताडे, क्रीडा शिक्षक कातकाडे यांनी परिश्रम घेतले.

# सिडको विभागीय कार्यालयांतर्गत येणाऱ्या वृक्षांना रंगरंगोटीस सुरुवात

**सिडको ।** सिडको विभागीय कार्यालयाच्या अंतर्गत येणाऱ्या परिसरातील वृक्षांना गेरू व चुना मारण्याचे काम सध्या सुरू असून, या उपक्रमामुळे परिसराच्या सौंदर्यात लक्षणीय वाढ होत आहे. सुमारे बारा हजार रुपयांचा खर्च करून हा उपक्रम राबवण्यात येत आहे. सिडकोतील मुख्य रस्त्यांच्या दुतर्फा असलेल्या झाडांना हा गेरू व चुना लावण्यात येत आहे, त्यामुळे परिसर अधिक आकर्षक आणि स्वच्छ भासत आहे.

वृक्षांना गेरू व चुना मारण्यामागे केवळ सौंदर्य वाढवण्याचा हेतू नसून त्यामध्ये पर्यावरणीय आणि जैविक महत्त्व देखील आहे. गेरू व चुन्याचा लेप झाडांच्या बुंध्याला लावल्याने झाडांना उधळी (फूलगळ, पानगळ) कमी होते, कीटक आणि बुरशीजन्य रोग टळतात, तसेच उष्णतेपासून झाडांचे संरक्षण होते. या रंगकामामुळे झाडांचा बुंधा थेट उन्हाच्या संपर्कात येत नाही, त्यामुळे झाडांची वाढही चांगली होते. सिडकोतील रस्त्यांलगत असलेल्या अनेक झाडांना गेल्या काही वर्षांत योग्य देखभाल मिळाली नव्हती. त्यामुळे झाडांच्या बुंध्यावर



बुरशी, किड, आणि रोगांची लागण होण्याचे प्रमाण वाढले होते. त्यामुळे या वर्षी ग्रीष्म ऋतूच्या सुरुवातीलाच सिडको विभागीय कार्यालयाने हे काम सुरू केले आहे. या उपक्रमासाठी स्थानिक ठेकेदारांची मदत घेण्यात आली असून, त्यांनी अत्यंत काटेकोर आणि शिस्तबद्ध पद्धतीने काम सुरू केले आहे. गेरू व चुना योग्य प्रमाणात मिसळून तयार केलेला लेप झाडांच्या बुंध्याला एकसंध लावला जात आहे. काही ठिकाणी यासोबतच खतपाणी आणि फांद्यांची छाटणीही केली जात आहे. सिडको परिसरातील नागरिकांनी या उपक्रमाचे स्वागत केले असून, अनेकांनी झाडांची देखभाल करणे ही प्रशासनाची जबाबदारी असून त्यासाठी अशा छोट्या पण उपयुक्त उपक्रमांचे कौतुक केले आहे. काही रहिवाशांनी सोशल मीडियावर फोटो शेअर करत या उपक्रमाचे समर्थन केले आहे.

> वृक्ष ही आपली संपत्ती आहे. त्यांचे संरक्षण व संवर्धन ही सर्वांची जबाबदारी आहे. गेरू व चुना फासल्याने झाडांचे आरोग्य टिकते आणि शहराचे सौंदर्यही खुलते. यापुढील काळातही असे उपक्रम सातत्याने राबवले जातील. या उपक्रमामुळे परिसरात एक सकारात्मक वातावरण निर्माण झाले आहे. लहान मुलांपासून वृद्धांपर्यंत सर्वजण झाडांच्या संरक्षणाबाबत जागरूक होत आहेत. सार्वजनिक ठिकाणची स्वच्छता, वृक्षांचे संगोपन आणि पर्यावरणपूरक जीवनशैली याकडे नागरिकांचा कल वाढत आहे.
>
> **– प्रशांत परब, उद्यान निरीक्षक**

# 'कलापूर्णम तीर्थ' येथे विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन

## श्रीमद् विजय रत्नसुंदरसूरिश्वरजी महाराजांची पावन उपस्थिती




**देवळाली कॅम्प ।** देवळाली कॅम्पमधील बालगृह रोड, लाम रोड येथे वसलेल्या "कलापूर्णम तीर्थ" या पवित्र स्थळी, जैन धर्मातील मूळ नायक मुनीसूरत दादा यांच्या भव्य मंदिराची निर्मिती करण्यात आली आहे.

या मंदिरात दि. १८, १९ आणि २० एप्रिल २०२५ रोजी श्रीमद् विजय रत्नसुंदरसूरिश्वरजी महाराज यांच्या उपस्थितीत विविध प्रवचन व धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या तीन दिवसीय कार्यक्रमांमध्ये दररोज सकाळी ९.३० ते १२ वाजेपर्यंत आणि दुपारी २.३० ते संध्याकाळी ५ वाजेपर्यंत पूजनीय महाराज आपल्या अनुयायांना आगम जैन धर्मातील मूलतत्त्वे व सिद्धांत यावर आधारित प्रवचन देणार आहेत. या प्रवचनांमध्ये २४ तीर्थंकरांनी दिलेले संदेश व त्याचे आजच्या जीवनातील महत्त्व विशद केले जाणार आहे. या कार्यक्रमासाठी १००० हून अधिक भाविकांनी नोंदणी केली असून, त्यांनी "जैन धर्म परीक्षा" उत्तीर्ण करून सहभाग सुनिश्चित केला आहे.

### पूजनीय महाराज यांचा परिचय

श्रीमद् विजय रत्नसुंदर-सूरिश्वरजी महाराज हे एक जगप्रसिद्ध जैनाचार्य असून पद्मभूषण पुरस्कार आणि गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्स मध्ये स्थान मिळवले आहे. ते एक राजप्रतिबोधक अध्यात्मिक गुरू असून त्यांनी सामाजिक सुधारणा, नैतिक शिक्षण, व्यसनमुक्ती व अहिंसेच्या प्रचारासाठी जीवन समर्पित केले आहे. त्यांचे प्रवचन समाज कल्याणावर आधारित असून नवतरुणांना धर्माशी जोडण्यासाठी त्यांनी विविध माध्यमातून कार्य केले आहे.

## महत्त्वाचे

### कॅनरा बँकेच्या नाशिक प्रादेशिक कार्यालयात डॉ. आंबेडकरांना अभिवादन

**नाशिक ।** कॅनरा बँकेच्या नाशिक येथील प्रादेशिक कार्यालयात ऑल इंडिया कॅनरा बँक




एस.सी/एस.टी एम्प्लॉईज असोसिएशनच्यावतीने भारतीय घटनेचे शिल्पकार विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीच्या निमित्ताने अभिवादनाचा कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी कॅनडा बँकेच्या नाशिक प्रादेशिक कार्यालयाचे असिस्टंट जनरल मॅनेजर डी. अनिल कुमार, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे अभ्यास मंडळ सदस्य प्रोफेसर डॉ.धीरज झाल्टे, ऑल इंडिया कॅनडा बँक एस.सी/एस.टी एम्प्लॉईज असोसिएशनचे माजी अध्यक्ष शरद कांबळे प्रमुख पाहुणे पाहून म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात डॉ.आंबेडकर व छत्रपती शिवराय यांच्या प्रतिमा पूजनाने झाली. या प्रसंगी प्रा. डॉ.धीरज झालटे यांनी सर्वांचे बाबासाहेब या विषयावर आपले विचार मांडून डॉ. बाबासाहेब आंबेडकर सर्व व्यापी कसे आहेत व भारतातील प्रत्येक नागरिकाच्या विकासासाठी त्यांनी कशा प्रकारे योगदान दिलेले आहे हे उपस्थितांना पटवून सांगितले. याप्रसंगी डी. अनिलकुमार, शरद कांबळे यांनी आपल्या मनोगतातून उपस्थितांना मार्गदर्शन करून जयंतीनिमित्त शुभेच्छा दिल्या.कार्यक्रमाचे प्रास्ताविक ऑल इंडिया कॅनरा बँक एस.सी/एस.टी कर्मचारी संघटनेच्या मध्यवर्ती समितीचे सदस्य गजानन खरात यांनी करून कार्यक्रमाची भूमिका मांडली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विनिता बाफना यांनी केले.सर्व उपस्थितांना संघटनेकडून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा भेट म्हणून देण्यात आली. जयंतीच्या निमित्ताने नाशिकच्या शालिमार चौकातील डॉ.आंबेडकरांच्या पुतळ्याला अभिवादन करण्यासाठी येणाऱ्या अनुयायांना १४ एप्रिल रोजी संध्याकाळी संघटनेच्या वतीने पाण्याचा बाटल्या वितरण करण्यात आल्या. तसेच लहान मुलांना शैक्षणिक साहित्याचे किट वितरीत करून एक चांगला समाज उपयोगी उपक्रम राबवण्यात आला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ऑल इंडिया कॅनरा बँक एस.सी/एस.टी एम्पलॉइज असोसिएशनचे नाशिक प्रादेशिक विभागाचे सेक्रेटरी मनोज कवर, संजीव रत्नपारखी,प्रमोद गायकवाड, प्रदीप पागेरे, विनिता बाफना यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी, सभासद तसेच प्रादेशिक कार्यालयातील कर्मचारी व अधिकारी वर्गाने परिश्रम घेतले.

### रविवारी 'योग जीवन पद्धती' शिबिर

**नाशिक ।** योगविद्या गुरुकुल अंतर्गत योग विद्याधामतर्फे 'योग जीवन पद्धती' या विषयावर शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.



रविवारी (दि.२०) सकाळी ९ ते दुपारी १ वाजेपर्यंत हा उपक्रम होईल. कॉलेज रोडवरील बीवायके महाविद्यालयाच्या प्रांगणात गुरुदक्षिणा सभागृहात होणाऱ्या या शिबिरात विविध कार्यक्रम होणार असून दुपारी १२ वाजता प्रमुख मार्गदर्शक डॉ. विश्वास मंडलिक यांचे 'योग जीवन पद्धती' या विषयावर भाषण होईल. सर्वांनी सहभागी व्हावे असे आवाहन प्रकल्प प्रमुख अध्यक्ष मनोहर कानडे, उपाध्यक्षा नलिनी कड, डॉ. पुरुषोत्तम पुरी, प्रदीप पाटील, मानसी शिंदे, गौरव शिरोडे, मानसी देशपांडे, सर्व कार्यकारिणी सदस्यांनी केले आहे.

### श्रीक्षेत्र कोपरगावला १९ पासून गुरुचरित्र पारायण सप्ताह

**निफाड ।** श्री स्वामी समर्थ सेवा, आध्यात्मिक विकास व बालसंस्कार केंद्र (दिंडोरी प्रणीत) कोपरगाव-१ (गोदाकाठ) येथे श्री स्वामी समर्थ पुण्यतिथी अखंड नाम, जप, यज्ञ सप्ताह दि.२० ते २६ एप्रिल २०२५ या कालावधीत होणार असून, कार्यक्रमाची रूपरेषा पुढील प्रमाणे आहे अशी माहिती श्री स्वामी समर्थ अध्यात्मिक विकास व बालसंस्कार केंद्र दिंडोरी प्रणित कोपरगाव १ गोदाकाठच्या सेवेकरी तसेच सिन्नर तालुका महिला वारकरी मंच उपाध्यक्ष वर्षा कोकाटे यांनी दिली आहे. दि. १९ एप्रिल ग्रामदेवता निमंत्रण, मंडल मांडणी, अग्नीप्रदीपन व पूर्वतयारी, दि. २० एप्रिल मंडल स्थापना, स्थापित देवता हवन, अग्निस्थापना व नित्य स्वाहाकार, दि.२१ एप्रिल नित्य स्वाहाकार, गणेश याग/मनोबोध याग, दि.२२ एप्रिल नित्य स्वाहाकार, चंडी याग, बुधवार दि. २३ नित्य स्वाहाकार, श्री स्वामी याग, दि. २४ एप्रिल नित्य स्वाहाकार, श्री गिताई याग, विष्णु याग दि. २५ एप्रिल नित्य स्वाहाकार, रुद्र याग/मल्हारी याग, दि.२६ एप्रिल नित्य स्वाहाकार, बली पूर्णाहूती, सत्यदत्त पूजन श्री स्वामी समर्थ पुण्यतिथी सांगता समारोह स. १०.३० महाआरती व अखंड नाम-जय-यज्ञसप्ताह सांगता होणार आहे.



# शेअर बाजारात सलग चौथ्या दिवशी तेजी

## सेन्सेक्स 1509 अंकांनी वधारला

**मुंबई, दि. १७ प्रतिनिधी**

भारतीय शेअर बाजारांमध्ये आज १७ एप्रिल रोजी सलग चौथ्या दिवशी मोठी वाढ झाली. सेन्सेक्स १५०९ अंकांनी वधारला. तर निफ्टीने पुन्हा २३,८०० चा टप्पा ओलांडला. या वाढीमुळे गुंतवणूकदारांना ४.५ लाख कोटी रुपयांचा नफा झाला. बँकिंग, तेल आणि वायू आणि दूरसंचार शेअर्समध्ये सर्वाधिक वाढ दिसून आली. स्मॉलकॅप आणि मिडकॅप निर्देशांक अर्धा टक्क्याने वाढले.

तज्ज्ञांचे म्हणणे आहे की, परदेशी गुंतवणूकदारांनी भारतीय बाजारात पुन्हा खरेदी सुरू केली आहे. याशिवाय, अमेरिका आणि भारत यांच्यातील व्यापार कराराच्या शक्यतेमुळे गुंतवणूकदारांच्या भावना सुधारल्या आहेत. सेन्सेक्स १,५०८.९१ अंकांनी वाढून ७८,५५३.२० वर बंद झाला. निफ्टी ४१४.४५ अंकांनी किंवा १.७७ टक्क्यांनी वाढून २३,८५१.६५ वर स्थिरावला. बीएसईवर सूचीबद्ध कंपन्यांचे एकूण बाजार भांडवल आज १७ एप्रिल रोजी ४१९.४९ लाख कोटी रुपयांवर पोहोचले, जे त्याच्या मागील व्यापार दिवशी म्हणजेच बुधवार, १६ एप्रिल रोजी ४१५ लाख कोटी रुपये होते. सूचीबद्ध कंपन्यांचे



**सेन्सेक्स 78,553**

**निफ्टी 23,851**

बाजार भांडवल आज सुमारे ४.४९ लाख कोटी रुपयांनी वाढले आहे. सेन्सेक्समधील ३० पैकी २८ शेअर्स वाढीसह बंद झाले. यामध्ये आयसीआयसीआय बँक, भारती एअरटेल, सन फार्मा आणि स्टेट बँक ऑफ इंडियाचे शेअर्स ३.२८ टक्क्यांपासून ते ३.६८ टक्क्यांपर्यंत वाढीसह बंद झाले.

सेन्सेक्समधील फक्त २ शेअर्स घसरणीसह बंद झाले. टेक महिंद्राचे शेअर्स ०.२४ टक्क्यांनी आणि मारुती सुझुकीचे शेअर्स ०.०४ टक्क्यांनी घसरून बंद झाले.

आयटी क्षेत्रातील दिग्गज कंपनी विप्रोच्या शेअरमध्ये आज मोठी घसरण दिसून येत आहे. आज, शेअर ६ टक्क्यांनी घसरून २३२ रुपयांवर आला, जो बुधवारी २४८ रुपयांवर बंद झाला होता. कंपनीने बुधवारी तिमाही निकाल जाहीर केले, ज्यामध्ये कंपनीच्या महसुलावर आणखी दबाव येण्याचा अंदाज आहे. कंपनीने आर्थिक वर्ष २०२५-२६ च्या पहिल्या तिमाहीत (आर्थिक वर्ष २६ च्या पहिल्या तिमाहीत) आयटी सेवा व्यवसाय महसूल २,५०५ दशलक्ष डॉलर ते २,५५७ दशलक्ष डॉलर दरम्यान असण्याचा अंदाज वर्तवला आहे.

# "आम्ही हिंदूंपेक्षा वेगळे" : पाकिस्तान लष्करप्रमुखांनी पुन्हा ओकले भारताविरुद्ध विष!

**इस्लामाबाद, १७ वृत्तसंस्था**

"तुम्ही तुमच्या मुलांना पाकिस्तानच्या निर्मितीची गोष्ट सांगितली पाहिजे. आपल्या पूर्वजांना वाटायचे की आपण हिंदूंपेक्षा प्रत्येक बाबतीत वेगळे आहोत. आपल्या चालीरीती, आपला धर्म, आपली विचारसरणी, सर्वकाही त्यांच्यापेक्षा वेगळे आहे. आपण एक नाही तर दोन राष्ट्रे आहोत. आम्ही हिंदूपेक्षा वेगळे आहोत. आपण पाकिस्तानच्या उभारणीसाठी खूप त्याग केले आहेत", अशा शब्दांमध्ये एका सार्वजनिक कार्यक्रमात पाकिस्तानचे लष्करप्रमुख जनरल सय्यद असीम मुनीर यांनी भारताविरुद्ध विष ओकले.



१३ लाखांचे भारतीय लष्कर आणि त्यांचं सर्व सुसज्ज शस्त्रसाठा जर आपल्याला घाबरवू शकत नाही. जगातील कोणतीही ताकद काश्मीरला पाकिस्तानपासून वेगळं करू शकत नाही, अशी वल्गनाही त्यांनी केली.

ओव्हरसीज पाकिस्तानी कन्व्हेन्शनमध्ये सय्यद असीम मुनीर म्हणाले, "पाकिस्तानच्या निर्मिती ही हिंदू आणि मुस्लिमांतील मूलभूत फरक असल्याने झाली आहे. आपल्या पूर्वजांचा विश्वास होता की जीवनाच्या प्रत्येक पैलूमध्ये आपण हिंदूंहून वेगळे आहोत. आपला धर्म वेगळा आहे, आपले रीतिरिवाज वेगळे आहेत, आपली परंपरा, विचार, आकांक्षा हे सगळं हिंदूंपेक्षा वेगळं आहे. पाकिस्तानच्या निर्मितीची गोष्ट तुम्ही आपल्या मुलांना नक्की सांगितली पाहिजे. कृपया पाकिस्तानची ही कहाणी कधीही विसरू नका. तुमच्या भावी पिढ्यांना हे सांगा. जेणेकरून त्यांना पाकिस्तानशी असलेले त्यांचे नाते जाणवेल. ती कधीही कमकुवत नसावी, मग ती तिसरी पिढी असो, चौथी पिढी असो किंवा पाचवी पिढी असो."

१३ लाखांचे भारतीय लष्कर आणि त्यांचं सर्व सुसज्ज शस्त्रसाठा जर आपल्याला घाबरवू शकत नाही, अशा वल्गना करत पाकिस्तानच्या शत्रूंना वाटते का की, फक्त १५०० दहशतवादी देशाचे भाग्य बदलतील? पण दहशतवादी पाकिस्तानी लष्कराला पराभूत करू शकतील का? बलुचिस्तानमधील दहशतवाद्यांविरुद्ध आम्ही कठोर कारवाई करणार आहोत. दहशतवाद्यांच्या दहा पिढ्याही बलुचिस्तान व पाकिस्तानचं नुकसान करू शकणार नाहीत, असा दावाही त्यांनी केला. तसेच पाकिस्तान कधीही काश्मीर वेगळे करू शकत नाही. कोणतीही शक्ती काश्मीरला पाकिस्तानपासून वेगळे करू शकणार नाही, अशी वल्गनाही त्यांनी केली.

# महाराणा प्रताप यांच्या पुतळ्याचे राजनाथ सिंह यांच्या हस्ते छत्रपती संभाजीनगरात अनावरण

**छ.संभाजीनगर दि. १७ प्रतिनिधी**

केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह हे शुक्रवार, १८ एप्रिल २०२५ रोजी छत्रपती संभाजीनगर येथे येत असून, त्यांच्या हस्ते कॅनॉट गार्डन येथे वीर शिरोमणी महाराणा प्रताप यांच्या भव्य पुतळ्याचे अनावरण होणार आहे. या एतिहासिक सोहळ्याला राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचीही प्रमुख उपस्थिती असेल.



हा कार्यक्रम दुपारी १२ वाजता प्लेस सिडको परिसरात आयोजित करण्यात आला आहे. महाराणा प्रताप यांच्या शौर्य आणि पराक्रमाचे स्मरण करणारा हा पुतळा शहराच्या सांस्कृतिक आणि एतिहासिक वारशात भर घालणारा ठरणार आहे. या सोहळ्यासाठी शहरात जोरदार तयारी सुरू असून, स्थानिक प्रशासनाने सर्व व्यवस्था चोख ठेवली आहे.

महाराणा प्रताप यांनी मेवाडच्या स्वातंत्र्यासाठी मुगलांविरुद्ध केलेला लढा इतिहासात अजरामर आहे. त्यांच्या या पुतळ्याच्या अनावरणाने नव्या पिढीला त्यांच्या त्याग आणि शौर्याची प्रेरणा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. या कार्यक्रमाला स्थानिक नागरिक, राजकीय नेते आणि सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. राजनाथ सिंह यांच्या भेटीमुळे शहरात उत्साहाचे वातावरण आहे. हा सोहळा छत्रपती संभाजीनगरच्या इतिहासात एक महत्त्वाचा टप्पा ठरेल, अशी भावना नागरिकांमध्ये आहे.



**पुणे-सातारा हायवेवर वॉल्वो बसला भीषण आग लागल्याची घटना घडल्याने परिसरात एकच खळबळ उडाली पुण्यातील खेड शिवापूरजवळ अचानक बसला आग लागली, त्यात बस जळून खाक झाली. या बसमधून २० ते २५ प्रवाशी प्रवास करत होते, आग लागल्याचे लक्षात येताच प्रवाशांनी बसमधून बाहेर उड्या मारल्या. व्हॉल्वो बस दुर्घटनेत काहीजण किरकोळ जखमी झाले असून रस्त्यावर बघ्यांची गर्दी जमली होती. दरम्यान, आगीच्या घटनेसंदर्भात अग्निशमन दलास पाचारण करण्यात आले आहे. मात्र, आगीचा भडका वाढल्याने अग्निशमन गाडी येण्यापूर्वीच बस जळून खाक झाली. दरम्यान, सध्या राज्यात उन्हाचा कडाका वाढला असून दुपारच्या सुमारास वाहनेही तापत आहेत. त्यामुळे, या बसला आग उन्हामुळे इंजिन गरम होऊन लागली की नेमकी कशामुळे लागली हे अद्याप कळू शकले नाही.**

# सर्वेक्षण पुन्हा होणार असल्याने महात्मा फुलेवाडा स्मारकाचे काम रखडणार

**पुणे, दि. १७ प्रतिनिधी**

महात्मा फुलेवाडा स्मारकाचे भूसंपादन रखडले आहे. यापूर्वी फक्त स्मारक परिसरातील इमारतींचे सर्वेक्षण झाले आहे. या ठिकाणी राहणारे घरमालक व भाडेकरू यांच्या मागण्यांचा अद्याप विचार झाला नाही. त्यामुळे त्यांच्या नेमक्या काय मागण्या आहेत ? त्यांना मोबदला कसा दिला जाईल, याबाबत परिसरातील नागरिकांशी चर्चा करून पुन्हा सर्वेक्षण केले जाणार असल्याची माहिती पालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी दिली. या सर्व बाबींना उशीर होणार असल्याने स्मारकाचे काम लांबणीवर पडणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

राज्य शासनाच्या माध्यमातून पालिकेमार्फत महात्मा फुलेवाडा स्मारकाच्या विस्तारीकरणाचे काम केले जाणार आहे. मात्र, हे काम संथ गतीने सुरू असल्याने अनेकांनी याबद्दल नाराजी व्यक्त केली होती. सध्या पालिकेने स्मारकाचे काम पूर्ण करण्याच्या दृष्टीने पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले म्हणाले, स्मारकालगतचे जागामालक आणि भाडेकरू यांच्या विविध मागण्या आहेत. त्यांचे पुनर्वसन



कसे केले जाणार? त्यांना मोबदला द्यावा की टीडीआर किंवा पर्यायी जागा द्यावी? यावर विचार सुरू आहे. १९९२ साली महापालिकेने या भागाचे सर्वेक्षण केले होते. त्या वेळी ९१ मिळकती बाधित होणार असल्याचे समोर आले होते. यामध्ये जागामालक आणि भाडेकरू यांचा समावेश आहे. त्या वेळी स्मारक परिसरातील इमारतींचा सर्व्हे करण्यात आला होता. मात्र, मूळ जागामालक व भाडेकरू यांची संख्या मोठी असल्याने त्यांच्याशी चर्चा सुरू आहे. त्यामुळे त्यांचे सर्वेक्षण होईल. जागा ताब्यात घेताना सक्तीचे भूसंपादन न करता जागामालकांना आवश्यक तो मोबदला देऊन या जागा ताब्यात कशा मिळतील, यासाठी महापालिका प्रयत्नशील राहणार असल्याचे भोसले म्हणाले.

महात्मा फुलेवाडा स्मारकाचे भूसंपादन करण्यासाठी पालिकेत तीन ते चार वर्षे सलग काम करत असणाऱ्या तसेच या प्रक्रियेची माहिती असणाऱ्या उपायुक्त दर्जाच्या अधिकाऱ्याची नेमणूक केली जाणार आहे. अजून या अधिकाऱ्याची निवड करण्यात आलेली नाही. ही निवड लवकरच केली जाणार असून, स्मारक परिसराचे सर्वेक्षण करून मागण्या निश्चित केल्यावर भूसंपादन प्रक्रिया पार पाडली जाणार असल्याची माहिती आयुक्त भोसले यांनी दिली.

महात्मा फुलेवाडा आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले स्मारक या दोन वास्तू एकत्रित जोडण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला असून, वाडा परिसरातील काही खासगी जागा ताब्यात घेतल्या जाणार आहेत. या वास्तूंचे एकत्रीकरण व विस्तारासाठी ९१ मिळकती बाधित होणार आहे,. त्याचे क्षेत्रफळ पाच हजार ३१० चौरस मीटर आहे. यामध्ये २५१ मालक आणि ८०१ भाडेकरू आहेत. या सर्वांशी चर्चा करून त्यांच्या जागा ताब्यात घेण्याचा महापालिकेचा प्रयत्न असल्याचे आयुक्त डॉ. भोसले यांनी स्पष्ट केले.

# महिलेने प्रियकराच्या मदतीने केली पतीची हत्या; सर्पदंशाचा रचला बनाव

**मेरठ, दि. १७ वृत्तसंस्था**

उत्तर प्रदेशच्या मेरठमध्ये काही दिवसांपूर्वी मर्चंट नेव्ही अधिकारी सौरभ राजपूतची हत्या झाल्याची घटना घडली. या घटनेने संपूर्ण देशभरात खळबळ उडाली होती. या घटनेला काही दिवस होत नाही तोच आता आणखी एक खळबळजनक हत्याकांड मेरठमधूनच उघडकीस आलं आहे. एका महिलेने आणि तिच्या प्रियकराने मिळून तिच्या पतीचा गळा दाबून हत्या केली आणि सर्पदंशाने मृत्यू झाल्याचं नाटक केलं. मात्र, या संपूर्ण प्रकरणाचा पर्दाफाश पोलिसांनी केला आहे.

रविता नावाच्या महिलेने तिच्या प्रियकराबरोबर मिळून तिच्या पतीची हत्या केली. मात्र, पतीच्या हत्येचा ज्या प्रकारचा कट रचला होता, हे जेव्हा समोर आलं तेव्हा सर्वांनाच धक्का बसला. सर्वात आधी महिलेने तिच्या पतीचा गळा दाबून खून केला. त्यानंतर आपल्या पतीला सापाने चावा घेतल्याचा बनाव रचला. जेणेकरून आपल्या पतीचा मृत्यू हा सापाने चावा घेतल्यामुळे झाला हे सांगता येईल यासाठी हा संपूर्ण बनाव रचला. मात्र, पतीच्या मृतदेहाचं जेव्हा शवविच्छेदन करण्यात आलं तेव्हा धक्कादायक माहिती समोर आली.

झाले असे की, महिलेने तिच्या पतीचा झोपेतच गळा दाबून हत्या केली. त्यानंतर सर्पदंशाने मृत्यू झाल्याचं नाटक करण्यासाठी पतीच्या बेडवर एक जिवंत साप आणून सोडला. त्यानंतर अमित कश्यप ऊर्फ मिक्की हा मृत व्यक्ती त्याच्या बेडवर आढळून आला. तेव्हा त्याच्या खोलीत एक जिवंत साप आढळून आला. पण जेव्हा मृतदेहाचे शवविच्छेदन करण्यात आले. तेव्हा शवविच्छेदन अहवालात अमितचा मृत्यू विषबाधेमुळे नाही तर गुदमरल्यामुळे झाल्याचे उघड झालं. त्यामुळे पोलिसांना हत्येचा संशय आला आणि पोलिसांनी तपासाची सूत्र फिरवली. यानंतर पोलिसांनी पत्नी रविता आणि तिचा प्रियकर अमरदीप या दोघांना अटक केली आणि संपूर्ण प्रकरणाचा खुलासा झाला.

या घटनेबाबत पोलिसांनी माहिती देताना सांगितलं की, "अमरदीपने महमूदपूर शिखेडा गावातील एका सर्पमित्राकडून १००० रुपयांना एक साप खरेदी केला होता. हत्येच्या रात्री दोघांनी अमित झोपेपर्यंत वाट पाहिली आणि नंतर त्याचा गळा दाबून खून केला. मात्र, या संपूर्ण प्रकरणाबाबत कोणाला हत्येचा संशय येऊ नये म्हणून त्यांनी साप त्याच्या खोलीत ठेवला. पोलीस तपासात असं दिसून आलं की रविता आणि अमरदीप यांचे एका वर्षापासून प्रेमसंबंध होते. अमितबरोबर मजूर म्हणून काम करणारा अमरदीप वारंवार त्याच्या घरी येत असे. अमितला अलिकडेच त्याच्या पत्नीच्या विवाहबाह्य संबंध समजले होते. तो त्याला विरोध करू लागला होता. मात्र, पती प्रेमसंबंधात अडसर ठरत असल्यामुळे पत्नी आणि तिच्या प्रियकराने त्याच्या हत्येचा कट रचला. तेच पकडले जाऊ नये म्हणून त्यांनी गुगल आणि युट्यूबवर हत्येच्या तंत्रांचा शोधही घेतला होता, अशी माहिती तपासात समोर आल्याचं पोलिसांनी सांगितलं.

# दिनेश माहेश्वरी 23 व्या विधि आयोगाचे अध्यक्ष, पुण्याचे ॲड. हितेश जैन यांची सदस्यपदी निवड

**नवी दिल्ली, दि. १७ वृत्तसंस्था**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती दिनेश माहेश्वरी यांची २३व्या विधी आयोगाच्या अध्यक्षपदी नेमणूक केली, तर पुण्याचे ज्येष्ठ अधिवक्ता हितेश जैन यांना सदस्य नेमण्यात आले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंगळवारी बहुप्रतीक्षित २३व्या विधी आयोगाच्या नेमणुकीवर शिक्कामोर्तब केले.

सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती दिनेश माहेश्वरी यांची आयोगाच्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे, तर पुण्याचे ज्येष्ठ अधिवक्ता हितेश जैन आणि वाराणसी हिंदू विद्यापीठाचे प्रोफेसर डी. पी. वर्मा यांची पूर्णवेळ सदस्य म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. २३व्या आयोगाचा कार्यकाळ ३१ ऑगस्ट २०२७ पर्यंत राहणार आहे. २२व्या विधी आयोगात अध्यक्षांसह सहा सदस्य होते. परंतु, २३व्या आयोगात अध्यक्षांसह केवळ तीन सदस्य आहेत ही विशेष बाब आहे.

# 'झापुक झुपूक' सिनेमाचा रोमांचक ट्रेलर झाला रिलीज!!

बाईपण भारी देवा चित्रपटाच्या भरघोस यशानंतर जिओ स्टुडिओज् आणि केदार शिंदे ही सुपरहीट जोडी २५ एप्रिल २०२५ रोजी 'झापुक झुपूक' हा कौटुंबीक मनोरंजन करणारा सिनेमा घेऊन पुन्हा एकदा प्रेक्षकांना भेटण्यास येत आहेत. नुकतच या सिनेमाचा धमाल ट्रेलर रितेश देशमुख ने रिलीज केला आहे. आणि रिलीझ होताच हा ट्रेलर सोशल मीडियावर धुमाकूळ घालत आहे. विशेष म्हणजे अभिनेता रितेश देशमुखचा सूरज चव्हाण खूप मोठा चाहता आहे आणि आज बिग बॉस सीजन ५ च्या यशानंतर रितेश सूरजच्या या खास क्षणी सामील झाला आहे. दिग्दर्शक केदार शिंदे ह्यांनी बिग बॉस च्या वेळीच सूरज सोबत एक चित्रपट बनवण्याचं ठरवलं होतं आणि आता ते अमलात आणून २५ एप्रिल रोजी फिल्म रिलीज ही होतेय.





सिनेरंग

सूरज चव्हाण अभिनित 'झापुक झुपूक' ह्या सिनेमाचं ट्रेलर आनंदाची मेजवानी घेऊन आलाय. रोमांस, ॲक्शन , ड्रामा या सर्व गोष्टींवर प्रकाशझोत टाकणारा हा चित्रपट आहे. हा ट्रेलर अनेकांचं लक्ष वेधून घेत आहे. विशेष म्हणजे तरुणांमध्ये या सिनेमाची क्रेज जास्त पहायला मिळते. सूरज चव्हाणची स्टाईल आणि धमकेदार डायलॉग्स अख्ख्या महाराष्ट्रात आता गाजणार आहे. ट्रेलर मध्ये दोन कमाल गाण्यांची झलक सुद्धा पहायला मिळते. त्यातील एक गाणं नक्कीच ह्या पुढे हळद गाजवणार. त्याचसोबत सुरज आणि जुई भागवत ची छान जोडी अजून आकर्षक करते. फॅमिली एंटरटेनमेंटचा जबरदस्त तडका असलेल्या "झापुक झुपूक" चित्रपटाची टीम संपूर्ण महाराष्ट्राचं मनोरंजन करायला सज्ज आहे. 'झापुक झुपूक' चित्रपटात सूरज सोबत जुई भागवत, इंद्रनील कामत, हेमंत फरांदे,पायल जाधव,दीपाली पानसरे, तसेच पुष्कराज चिरपुटकर, मिलिंद गवळी हे मुख्य भूमिकेत झळकणार आहेत.

लोकरंजन



# "छबी" 9 मेपासून संपूर्ण महाराष्ट्रात

कोकणात फोटोग्राफी करणाऱ्या फोटोग्राफरला आलेल्या गूढरम्य अनुभवाची थरारक गोष्ट छबी या चित्रपटातून उलगडणार आहे. या चित्रपटाचा अतिशय रंजक टीझर लॉंच करण्यात आला असून, छबी हा चित्रपट ९ मेपासून सर्वत्र प्रदर्शित होणार आहे. केके फिल्म्स क्रिएशन, उप्स डिजिटल एंटरटेन्मेंट यांनी "छबी" या चित्रपटाची निर्मिती केली आहे. जया तलक्षी छेडा निर्माता आहेत. चित्रपटाचं लेखन आणि दिग्दर्शन अद्वैत मसूरकर यांच असून त्यांचा दिग्दर्शक म्हणून पहिलाच चित्रपट आहे. चित्रपटात ध्रुव छेडा, सृष्टी बाहेकर, अनघा अतुल, रोहित लाड, ज्ञानेश दाभणे , अपूर्वा कवडे या नव्या दमाच्या कलाकारांसह अभिनेता समीर धर्माधिकारी, अभिनेते मकरंद देशपांडे, अभिनेत्री शुभांगी गोखले, राजन भिसे, जयवंत वाडकर,संकेत मोरे, संजय कुलकर्णी, लीना पंडित असे अनुभवी कलाकार आहेत. त्यामुळे चित्रपटाची अभिनयाची बाजू खणखणीत आहे यात शंका नाही.

फोटोग्राफी स्पर्धेसाठी एक तरूण फोटोग्राफर कोकणातल्या गावात फोटो काढतो. मात्र त्या फोटोमध्ये कुणीच नसतं. हे असं का झालं याचा नाट्यमय शोध "छबी" या चित्रपटात आहे. गूढरम्य आणि नावीन्यपूर्ण कथानक, परिणाकारक पार्श्वसंगीत या मुळे हा टीझर प्रेक्षकांना गुंतवून ठेवतो, तसंच चित्रपटाविषयी उत्सुकताही वाढवतो. आजवर चित्रपटांमधून फोटोग्राफरची, एखाद्या फोटोची गोष्ट फारशी मांडली गेलेली नाही. अशा कथानकाला गूढरम्यतेची पार्श्वभूमी असल्यानं "छबी" हा सध्याच्या चित्रपटांमध्ये नक्कीच वेगळा प्रयत्न ठरणार आहे.

# 'वध' चित्रपटाचा दुसरा भाग लवकरच चित्ररसिकांच्या भेटीला!

२०२२ साली प्रेक्षकांनी पसंतीची मोहोर उमटविलेल्या 'वध' या उत्कंठापटाचा बहुप्रतिक्षित सिक्वेल- 'वध २'चे चित्रीकरण पूर्ण झाले आहे. ख्यातनाम अभिनेता संजय मिश्रा आणि प्रसिद्ध अभिनेत्री नीना गुप्ता यांचा कसदार अभिनय पुन्हा एकदा 'वध २' चित्रपटात पाहायला मिळेल- या सिक्वेलमध्ये प्रेक्षकांपर्यंत मूळ चित्रपटाचे सार पुढे नेण्याचा जोमाने प्रयत्न करण्यात आला आहे. 'वध २' चित्रपटातही आत्मनिरीक्षणात्मक स्वर, नैतिक ताण आणि भावनिक गुंतागुंत कायम असल्याचे दिसून येईल. त्याच संकल्पनेद्वारे या चित्रपटाची कथा नव्या रहस्यात कसा प्रवेश करते, हे दिसून येईल.'वध २' हा चित्रपट जसपाल सिंग संधू यांनी दिग्दर्शित केला आहे आणि लव रंजन व अंकुर गर्ग यांच्या 'लव फिल्म्स'द्वारे या चित्रपटाची निर्मिती करण्यात आली आहे.



नीना गुप्ता यांनी मनोगत व्यक्त करताना म्हटले, "इतक्या वेगळ्या आशयाची कथा सापडणे हे खरोखरच दुर्मिळ आहे. जसपाल सिंग संधू यांच्याकडे सत्य आणि ताण यांच्याकडे पाहण्याची दृष्टी आहे, ज्यामुळे ते एक उत्तम कथाकार गणले जातात. 'वध-२' या चित्रपटात सहभागी होत पुन्हा एकदा या प्रवासाचा भाग असल्याचा मला खूप अभिमान वाटतो आणि 'वध २'मध्ये प्रेक्षकांकरता आम्ही बरेच काही सादर करत आहोत, हे लक्षात घेता त्यांच्या प्रतिसादाबाबत मी उत्सुक आहे."'वध- २' हा चित्रपट २०२५ साली प्रदर्शित होईल.

संकलन –संयोजन
**सुबोध रणशेवरे**
संपर्क -९८३३१४६३५६
ईमेल -subodh.ranshevre @rediffmail.com

# आर्य समाज मंदिरांमध्ये वैदिक किंवा हिंदू पद्धतीने केलेला विवाह कायदेशीर, उच्च न्यायालयाचा निर्णय

**प्रयागराज, दि. १७ वृत्तसंस्था**

आर्य समाज मंदिरांमध्ये कुठल्याही पुरुष आणि महिलेने हिंदू किंवा वैदिक पद्धतीने केलेला विवाह हा हिंदू मॅरेज ॲक्टनुसार कायदेशीर आहे असा निर्णय अलाहबाद न्यायालयाने दिला आहे. हिंदू विवाह कायदा १९५५ च्या कलम ७ मध्ये अशी नोंद आहे की वैदिक किंवा हिंदू रिती रिवाजांप्रमाणे लग्न झाल्यास तो कायदेशीर मानला जाईल. ते लग्न एखाद्या घरी झालं असेल, मंदिरात झालं असेल किंवा कार्यालयात झालं असेल तरीही हा विवाह कायदेशीर असेल. हा संदर्भ देत न्यायलयाने हा महत्त्वाचा निर्णय दिला आहे.

न्यायमूर्ती अरुण कुमार सिंह देशवाल यांच्या पीठाने असं म्हटलं आहे की आर्य समाज मंदिरात वैदिक पद्धतीने किंवा हिंदू चाली रितींप्रमाणे विवाह केल्यास तो कायदेशीर आहे. कन्यादान, पाणीग्रहण, सप्तपदी, भांगेत कुंकू भरण्याचा विधी आणि मंत्रोच्चार हे हिंदू चाली रितींनुसार विवाह संस्कार पूर्ण करतात. हिंदू विवाह कायदा १९५५ च्या कलम ७ नुसार अशा पद्धतीने मंदिरात झालेला विवाहही कायदेशीर असेल. न्यायालयाने असंही म्हटलं आहे की आर्य समाज मंदिराने किंवा त्या विश्वस्त मंडळाने मंदिरात लग्न झाल्याचं प्रमाणपत्र दिलं असेल तर प्राथमिकदृष्ट्या तो महत्त्वाचा कागद नाही. पण तो अगदीच वाया गेलेला कागद नसेल. कारण मंदिरात लग्न लावणारे जे पुरोहित होते त्यांच्याद्वारे या प्रमाणपत्राची वैधता सिद्ध करता येईल.

# कर्नाटक सरकारला राज्यपालांचा दणका; मुस्लीम आरक्षणावर असहमती दर्शवत विधेयक राष्ट्रपतींकडे पाठवले


**बंगळुरू, दि. १७ वृत्तसंस्था**

कर्नाटकमधील सरकारी कंत्राटांमध्ये मुस्लिमांना आरक्षण मिळणार की नाही हे आता राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू ठरवतील. राज्य सरकारने हे विधेयक पारित करून राज्यपालांकडे पाठवलं होतं. मात्र या विधेयकाचा चेंडू राज्यपालांनी राष्ट्रपतींच्या कोर्टात टाकला आहे. नुकत्याच झालेल्या कर्नाटकच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात राज्यातील सिद्धरामय्या सरकारने हे विधेयक पारित केलं होतं. या विधेयकात कर्नाटक सरकारने विविध सरकारी विभाग, संस्था आणि संस्थांतर्गत येणाऱ्या सर्व सार्वजनिक कामांच्या कंत्राटांपैकी चार टक्के आरक्षण श्रेणी-२ ब अंतर्गत मुस्लीम समुदायासाठी दिलं आहे. २ कोटींपर्यंतचे सरकारी कंत्राट आणि १ कोटीपर्यंतच्या वस्तू व सेवा खरेदी कंत्राटांमध्ये हे आरक्षण असणार आहे. कर्नाटक सरकारने दिलेल्या या आरक्षणाला विरोधी पक्ष भाजपाने जोरदार विरोध केला आहे. तसेच यावर राज्यपालदेखील कर्नाटक सरकारशी असहमत आहेत. म्हणूनच त्यांनी याबाबतचा निर्णय घेण्यासाठी विधेयक राष्ट्रपतींकडे पाठवलं आहे. कर्नाटकचे राज्यपाल थावरचंद गहलोत म्हणाले, "आपलं संविधान धर्माच्या आधारावर आरक्षण देण्यास परवानगी देत नाही." यापूर्वी कर्नाटकमधील विरोधी पक्षांनी, म्हणजेच भारतीय जनता पार्टी व जनता दलाने (सेक्युलर) राज्यपालांना याप्रकरणी निवेदन देऊन त्यांचा विरोध स्पष्ट केला होता. तसेच हे विधेयक असंवैधानिक असल्याचं म्हटलं होतं. या विधेयकामुळे समाजाचे ध्रुवीकरण होईल, अशी भितीदेखील भाजपा व जेडीएसने व्यक्त केली होती. आता या प्रकरणी राष्ट्रपती निर्णय घेतील.

# जगातील सर्वात प्रभावी व्यक्तींच्या यादीत भारतीय वंशाची एकमेव महिला

**नवी दिल्ली, दि. १७ वृत्तसंस्थाआ**

'टाइम' मॅगेझीनने २०२५ मधील जगातील १०० सर्वाधिक प्रभावी व्यक्तींची यादी नुकतीच जाहीर केली. या यादीत अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प, प्रसिद्ध उद्योगपती एलॉन मस्क, बांग्लादेशच्या अंतरिम सरकारचे मुख्य सल्लागार मोहम्मद युनूस यांच्यासह जगभरातील विविध क्षेत्रातील दिग्गजांना स्थान देण्यात आलं आहे. विशेष बाब म्हणजे, 'टाइम' मॅगेझीनच्या यादीत भारतातील एकाही व्यक्तीचा समावेश नाही. रेश्मा केवलरमानी या यादीत स्थान मिळविणाऱ्या भारतीय वंशाच्या एकमेव महिला आहेत. २०२४ मध्ये, बॉलिवूड अभिनेत्री आलिया भट्ट आणि ऑलिंपिक कुस्तीगीर साक्षी मलिक यांचा जगातील १०० प्रभावी व्यक्तींच्या यादीत समावेश होता.



रेश्मा केवलरमानी या अमेरिकेतील बायोटेक्नॉलॉजी कंपनी 'Vertex Pharmaceuticals'च्या मुख्य कार्यकारी अधिकारी आहेत. 'टाइम' मॅगेझीनच्या यादीत समाविष्ट झालेल्या त्या एकमेव भारतीय वंशाच्या महिला आहेत. रेश्मा यांचा जन्म मुंबईत झाला आणि वयाच्या ११ व्या वर्षी त्या कुटुंबासहीत भारतातून अमेरिकेत स्थायिक झाल्या. १९८८ मध्ये रेश्मा यांनी अमेरिकेतील बेस्टन विद्यापीठातून वैद्यकीय शिक्षण पूर्ण केलं. मॅसॅच्युसेट्स जनरल हॉस्पिटलमधून फेलोशिप घेतल्यानंतर, २०१५ मध्ये त्यांनी हार्वर्ड बिझनेस स्कूलमधून जनरल मॅनेजमेंटमध्ये पदवी घेतली.

२०१८ मध्ये रेशमा व्हर्टेक्स फार्मास्युटिकल्समध्ये मुख्य वैद्यकीय अधिकारी म्हणून रुजू झाल्या. २०२० मध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून त्यांची नियुक्ती झाली. रेशमा केवलरामणी यांच्या नेतृत्वाखाली व्हर्टेक्सने एक एतिहासिक टप्पा गाठला. अमेरिकेच्या अन्न आणि औषध प्रशासनाने (FDA) पहिल्यांदाच CRISPR तंत्रज्ञानावर आधारित सिकल सेल आजारावर उपचार करणाऱ्या औषधाला मान्यता दिली. रेशमा अमेरिकेच्या 'Ginkgo Bioworks' या बायोटेक कंपनीच्या संचालक मंडळावरही कार्यरत आहेत.

महासागर NASHIK Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak at S. R. publication, Mohan - Arjun Compund, Godown No. 8, 9 & 10, Near Ghartan Pada, Vaishali Nagar Last Bus Stop, Dahisar (E),Mumbai - 400068 and Published From 'ANANDI', KOTWAL PARK, TILAKWADI, APP. VED MANDEER, DHAMANKAR CORNER, NASHIK 422002 , Editor - SHRIKRISHNA TANSUKHDAS CHANDAK Executive Editor- Sanju Pawar, Resident Editor- Jayant Mahajan.

महासागर नाशिक हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी एस. आर. प्रिंटर्स, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडावून नं. ८,९,१०, घरटन पाडा, वैशाली नगर, दहिसर ईस्ट, मुंबई येथे मुद्रीत करून 'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२ . येथून प्रकाशित केले. कार्यकारी संपादक - संजू पवार (मो. नं. ९८९०१०९९७८) निवासी संपादक - जयंत महाजन (९४२०६९१४२०) Email : mumbaimahasagar@gmail.com